कामगारपुढारी

# ना. म. जोशी

यांचें चरित्र

मराठी ग्रंथ संग्रहालय
२५७२
संग्रहालय ठाणें स्थळप्रत.
विः
नों: दिः
REFBK-0009542

लेखक

विष्णु कृष्ण जोशी, एम्. ए.

( सेवानिवृत्त मुख्याध्यापक, छबिलदास लल्लूभाई
मुलांचें हायस्कूल, दादर, मुंबई २८ )

पॉप्युलर बुक डेपो, मुंबई ७

मूल्य दोन रुपये

मुद्रक :
**के. एल्. एन्. राव**
मुंबई वैभव प्रेस,
वल्लभभाई पटेल रोड,
मुंबई ४

आवृत्ति पहिली १९५७

प्रकाशक :
**ग. रा. भटकळ**
पॉप्युलर बुक डेपो,
मुंबई ७

ना. म. जोशी यांचें हें चरित्र



त्यांच्या मातुश्री
श्री. राधाबाई यांना
लेखकानें अत्यंत आदरपूर्वक
अर्पण केलें आहे.

# प्रस्तावना

कै० नारायण मल्हार जोशी यांचें नांव हिंदुस्थानांतील कामगार चळवळीच्या इतिहासांत चिरकाल राहील यांत शंका नाहीं. त्यांच्या ७५ वर्षांच्या जीवनाचा वृत्तांत या पुस्तकांत दिला आहे तो वाचकांस बोधप्रद होईल अशी मला खात्री आहे.

जोशीबुवांची व माझी ओळख पुष्कळ वर्षांची होती. ते व त्यांचे दोघे बंधू यांनीं महाराष्ट्रामध्यें चांगली कीर्ति संपादन केली होती. त्यांचे वडील बंधू प्रो. माधवराव जोशी हे व मी कांहीं काल फर्ग्युसन कॉलेजमध्यें एका वर्गांत होतों. ते गाढे संस्कृतज्ञ असून पुष्कळ वर्षे जुनागडच्या बहाउद्दिन कॉलेजमध्यें संस्कृत भाषेचे प्रोफेसर होते. त्यांच्या रसाळ व अस्खलित वक्तृत्वाची आठवण अजून पुष्कळांना आहे. नारायणरावांचे धाकटे बंधु वामनराव यांना मराठी वाङ्मयांत कायमचें स्थान मिळालेलें आहे. त्यांनीं लिहिलेल्या कादंबऱ्या व तात्त्विक ग्रंथ यांत त्यांचा बुद्धिवाद व त्यांची ध्येयनिष्ठा दिसून येते. त्यांनीं हिंगणें व इतर ठिकाणीं केलेलें शिक्षणकार्य फार महत्त्वाचें आहे. त्यांच्या अकालिक निधनामुळें मराठी वाङ्मयाची फार हानी झालेली आहे.

नारायणरावांनीं आपलें कार्यक्षेत्र आपल्या बंधूंच्यापेक्षां निराळें निवडलें होतें. कांहीं वर्षें मास्तरकी केल्यावर ना. गोपाळराव गोखले यांनीं नुकतीच स्थापिलेली सर्व्हंटस ऑफ इन्डिया सोसायटी नांवाची जी संस्था तीमध्यें त्यांनीं प्रवेश केला. या संस्थेचें ब्रीद म्हणजे स्वार्थत्यागी वृत्तीनें पडेल तें देशकार्य करणें हें होय, व त्याप्रमाणें ते सर्व आयुष्यभर वागले. मुंबईमध्यें त्यांना पाठविण्यांत आल्यावर त्यांनीं निरनिराळ्या सामाजिक राजकीय व इतर चळवळींत भाग घेतला. हिंदी लोकांची सर्व बाजूंनीं प्रगति व्हावी हें रानडे-गोखले यांचे ध्येय त्यांनीं आपल्यापुढें ठेवलें, व प्रत्येक काम त्यांनी उत्तम रीतीनें केलें. कांहीं दिवस त्यांनीं एक छापखाना चालविला, पत्र—पंडित झाले, सोशल सर्व्हिस लीगसारख्या सामाजिक संस्थेचें धुरीणत्व पत्करिलें, व सिव्हिल लिबर्टिज् यूनियनमध्यें पुढाकार घेतला. कोणच्याही लोकोपयोगी चळवळीला त्यांचा नेहमीं सक्रीय पाठिंबा मिळे.

या सर्व क्षेत्रामध्यें नारायणरावांनीं जरी भरीव कामगिरी केली असली

तरी त्यांनीं मजुरांच्या हितासाठीं जें काम केलें त्यामुळें त्यांची सर्व भारतभर किंबहुना जगभर कीर्ति झाली. मुंबईंतील मजूर वर्ग फार मागासलेला; त्यामध्यें संघटना नव्हती म्हणूनच त्यांची पिळणूक करून भांडवलदारांनीं अलोट संपत्ति मिळविली. कामगारांमध्यें संघटनाशक्ति उत्पन्न झाली म्हणजे त्यांची स्थिती आपोआपच सुधारेल या भावनेनें नारायणरावांनीं ट्रेड युनियन चळवळ सुरू केली व ती उत्तम नांवारूपाला आणिली. परंतु कामगारांना जसे हक्क मिळावयास पाहिजेत त्याप्रमाणेंच त्यांच्यावर जबाबदाऱ्याही असतात हें ते विसरले नाहींत, म्हणून ते कम्युनिझमसारख्या आत्यंतिक मतप्रणालीपासून अलिप्त राहिले. कामगारांचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास असे व त्यांचा सल्ला ते आदरानें ऐकत. हिंदुस्थानांतील कामगार चळवळीचे ते अनभिषिक्त पुढारी असें त्यांना सर्वजण मानीत. कामगारांचे प्रतिनिधि म्हणून दिल्लीच्या कायदे मंडळांत त्यांना सरकारनें कित्येक वर्षें नेमिलें होतें, परंतु सरकारनें नेमलेले म्हणून त्यांना मिंधेपणा कधीं शिवला नाहीं व कौंसिलापुढें येणाऱ्या सर्व प्रश्नांवर ते स्वतंत्रपणें व निर्भिडपणें आपले विचार मांडीत असत व बहुधा मतदानाच्या वेळीं सरकारविरोधी पक्षांतच ते दिसत असत.

पहिलें महायुद्ध संपल्यावर राष्ट्रसंघाबरोबरच कामगार संस्था (आय्. एल. ओ.) स्थापण्यांत आली. तीवर नारायणरावांनीं हिंदी मजुरांचे प्रतिनिधी म्हणून कित्येक वर्षें काम केलें, व त्या नात्यानें त्यांनीं परदेशच्या पुष्कळ वाऱ्या केल्या. ‘ आय्. एल. ओ. ’च्या गव्हर्निंग बॉडीवरही ते बरेच वर्षें होते. जगांतील सर्व कामगार पुढाऱ्यांच्या मनांत त्यांच्याविषयीं फार आदर असे. त्यांचें हें जिनीव्हा येथील कार्य मी पुष्कळ पाहिलें आहे, व त्यांच्यामुळें आम्हां सर्व भारतीयांना अभिमान वाटे.

साधी राहाणी, स्पष्टवक्तेपणा, सर्वांबद्दल व विशेषत: दलित वर्गाबद्दल निस्सीम कळकळ, कोणच्याही लोकोपयोगी कामांविषयीं सक्रिय सहानुभूती, एक विडी सोडल्यास निर्व्यसनी वृत्ति, दुसऱ्यास आपणाकडून होईल ती मदत करण्याची सदैव तयारी, राष्ट्राच्या सर्वांगीण उन्नतीविषयीं अमर्याद आस्था वगैरे गुणांमुळें नारायणरावांचें चरित्र आदर्शभूत असें झालेलें आहे. ह्या ग्रंथावरून त्यांची स्मृती पुष्कळ वर्षें राहील असा भरंवसा वाटतो.

पुणें, १२ आक्टोबर १९५५ **र. पु. परांजपे**

# लेखकाचें निवेदन

श्री. नारायण मल्हार जोशी, कामगार पुढारी, व सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीचे सभासद यांचें चरित्र आपण लिहावें अशी कल्पना आज बरीच वर्षें माझ्या मनांत घोळत होती. तिची वाच्यता मी नानांच्या जवळ चारपांच वर्षांपूर्वी केली होती. त्यावेळीं ते मला म्हणाले, 'माझें चरित्र लिहिण्याचें तुम्हांला जमणार नाहीं. माझ्याबरोबर ज्यानें आज बरीच वर्षें विविध क्षेत्रांत काम केलें आहे अशाच मनुष्यास तें चांगल्या रीतीनें लिहितां येईल.' यानंतर ही कल्पना जराशी बाजूला पडल्यासारखी झाली. जून १९५२ मध्यें त्यांचा सत्कारसमारंभ झाला त्यावेळीं सत्कारकमिटीतर्फे त्यांच्या चरित्रलेखनाची व्यवस्था होणार आहे असें जाहीर झाल्याचें मला स्मरतें. एका गृहस्थाचा विचार तें चरित्र इंग्रजींत लिहिण्याचा आहे. दुसरे एक गृहस्थ तें चरित्र गुजराथींत लिहिणार आहेत असें मी ऐकतों. नानांचा सत्कारसमारंभ झाल्याला आज चार वर्षें पुरी झालीं. पण त्यावेळीं जाहीर केल्याप्रमाणें अजून त्यांचें एकहि चरित्र प्रसिद्ध झालें नाहीं. अशा परिस्थितींत माझ्या पूर्वीच्या कल्पनेनें पुनः एकदां उचल खाल्ली. चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १८७६, तारीख ४ एप्रिल १९५४ रोजीं नानांचे चरित्र लिहिण्याचा मी मनाशीं संकल्प केला. नानांनीं आतांपर्यंत मला व माझ्या कुटुंबाला पुष्कळ मदत केलेली आहे. त्या मदतीबद्दलची कृतज्ञता व्यक्त करणें हा हें चरित्र लिहिण्यांतला एक हेतु आहे. दुसरा हेतु त्यांचें स्फूर्तिदायक उदाहरण आमच्या तरुण पिढीपुढें ठेवणें हा आहे. एका खेड्यामध्यें, मध्यम स्थितींतल्या भिक्षुक घराण्यामध्यें जन्माला आलेला एक मनुष्य विशिष्ट ध्येयप्रेरित होऊन सततोद्योगानें व चिकाटीनें केवढा मोठा होऊं शकतो, व केवढी मोठी समाजाची व विशेषतः दरिद्रीनारायणाची व दलितांची सेवा करूं शकतो याचें नानांचें चरित्र हें एक उत्तम उदाहरण आहे. त्याच्या-पासून आमच्या तरुण पिढीला आपल्या समाजाची व राष्ट्राची निरपेक्ष सेवा करण्याची स्फूर्ति मिळावी हा हें चरित्र लिहिण्याचा मुख्य हेतु आहे. वेळींच आपल्या आयुष्याचें ध्येय ठरविणें व तें प्राप्त करून घेण्यासाठीं सततोद्योग चालू ठेवणें हा नानांच्या चरित्राचा ओजस्वी संदेश आहे. त्यांच्या चरित्रांत नेत्रदीपक व रोमांचकारी अशा फार थोड्या घटना आहेत. परंतु त्यांची

भूमिका स्थितप्रज्ञ कर्मयोग्याची होती. निधर्मी (Secular) हा शब्द अलिकडे आपल्या कानांवर यायला लागला आहे. परंतु अस्सल भिक्षुकांच्या घराण्यांत जन्माला येऊनसुद्धां नाना सर्व आयुष्यभर निधर्मी होते, ही गोष्ट आपण अवश्य ध्यानांत ठेवली पाहिजे. याचा अर्थ ते सर्व धर्मांच्या, पंथाच्या व जातींच्या व पक्षांच्या लोकांशी समानतेनें वागत. सहिष्णुता, सहकारिता व तडजोड हें त्यांचे स्थायीभाव होते. ते जातीयवादी ( Communalist ) केव्हांही नव्हते. भिक्षुकांच्या घराण्यांत जन्माला येऊन सुद्धां जोशीवतन बंद करण्याच्या बिलाला त्यांनीं पाठिंबा दिला ही एकच गोष्ट ते जातीयवादी नव्हते हें सिद्ध करण्यास पुरेशी आहे. ह्या सर्व गुणांची आज आपल्या राष्ट्राला अतिशय जरुरी आहे. हे गुण तरुणांनीं आत्मसात् करावेत म्हणून नानांचें चरित्र लिहिले जाणें व त्यांचें परिशीलन तरुण पिढीकडून होणें अवश्य आहे.

चरित्र लिहिण्याच्या विचारानें जेव्हां पुनः उचल खाली त्यानंतर थोडेच दिवसांनीं नाना आपले थोरले चिरंजीव धोंडोपंत यांच्याकडे दादरला शारदाश्रम-मध्यें आले होते. तेथें त्यांना मी तारीख २ ऑक्टोबर १९५४ रोजीं भेटलों व म्हणालों. 'मी तुमचें चरित्र लिहावयास घेणार आहे, या कामीं तुम्हीं मला शक्य ती मदत करा. या खेपेला त्यांनीं माझ्या इच्छेला संमति दिली. ते म्हणाले 'माझें चरित्र लिहायचें असेल तर ( १ ) 'साधने' मध्यें माझ्या चरित्र विषयक कांहीं लेख थोड्याच वर्षांपूर्वी आले आहेत, ते वाचून पहा, जरूर तर ते "साधना" ऑफिसमध्यें जाऊन उतरून घ्या, कारण माझ्याकडे ते अंक असतील असें वाटत नाहीं. ( २ ) श्री. डी. सी. होम नांवाच्या एका गृहस्थांनीं माझ्या चरित्र विषयक कांहीं लेख थोड्या वर्षांपूर्वी "भारत ज्योती" मध्यें प्रसिद्ध केले आहेत. ते नजरेखालीं घाला. ( ३ ) पुण्यास सर्व्हंटस ऑफ ईंडिया सोसायटीच्या ऑफिसमध्यें सभासदांच्या सामाहिक अहवालाच्या फायली आहेत त्या वाचून पहा, त्यांतील जरूर ते उतारे उतरून घ्या. आणि नंतर लिहावयास सुरवात करा. मी त्यांना म्हटलें "जसजसा मजकूर लिहून होईल तसतसा मी तुम्हांला वाचून दाखवीन. व त्यामध्यें तुम्हीं सुचवाल त्या दुरुस्त्या करीन म्हणजे लिहिलेला मजकूर विश्वसनीय ठरेल."

माझ्या मनांतून चरित्रलेखनाचें व प्रकाशनाचें काम त्यांच्या हयातींत व्हावें असें होतें, म्हणून मी साधन सामुग्रीच्या जुळवाजुळवीला लागलों.

'साधने' मधील चार लेख मला त्यांचे चिरंजीव श्री. वसंतराव यांच्याकडून मिळाले. बाकीचे मी 'साधना' ऑफीसमध्यें जाऊन उतरून घेतले. हे लेख त्यांनीं स्वतः सांगितलेले श्री. थत्ते नांवाच्या गृहस्थांनीं लिहून घेतलेले व नंतर नानांनीं त्यांत सांगितलेल्या दुरुस्त्या केल्यानंतर 'साधने' मध्यें प्रसिद्ध झालेले आहेत. मी विचारलें 'हे लेख म्हणजे जवळ जवळ तुमचें आत्मचरित्र आहे, तेव्हां तुम्हीच आपलें आत्मचरित्र कां लिहित नाहीं?' तेव्हां ते म्हणाले, "विष्णुपंत, हें पहा, माझ्या अंगांत तेवढी हिंमत राहिली नाहीं." त्यानंतर श्री. डी. सी. होम यांचे भारतज्योती मधले लेखहि मला त्यांचे चिरंजीव श्री. वसंतराव यांचेकडून मिळाले. वरीलें तीन साधनाखेरीज खालील साधनें माझ्याजवळ उपलब्ध होतीं. (१) वा. म. जोशी यांचें श्री. ना. म. पटवर्धन यांनी लिहिलेलें चरित्र. (२) वा. म. जोशी यांचे श्री. राजाराम प्रल्हाद कानिटकर यांनीं लिहिलेलें चरित्र. (३) विविधवृत्ताच्या १२ सप्टेंबर १९३७ च्या अंकांत प्रसिद्ध झालेलें नानांचें स्वभावचित्र. (४) स्वतः नानांनीं कांहीं वर्षांपूर्वीं तयार केलेलें आपलें चरित्र विषयक त्रोटक टिपण. (५) सोशल सर्व्हिस लीग त्रैमासिकाचे जानेवारी १९५१ ऑक्टोबर १९५४ व जुलै, १९५५ चे अंक व (६) प्रा. ओतुरकरांचा 'हिंदुस्थानचा सोपपत्तिक इतिहास'. एवढ्या साधनसामुग्रीच्या साहाय्यानें मी चरित्र लेखनाला सुरवात केली. माझ्या हस्तलिखिताचीं सत्तर पानें मी नानांना दादर येथें शारदाश्रमांत तारीख ८।४।१९५५ रोजीं वाचून दाखविलीं. ७१ ते १०७ पानें त्यांच्या घरीं मॅाडेल हाऊसमध्यें तारीख २० एप्रिल १९५५ रोजीं वाचून दाखविलीं.

तारीख १५ मे १९५५ रोजीं सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीच्या सभासदांचे साप्ताहिक अहवाल वाचण्याकरतां व त्यांमधील जरूर ते उतारे उतरून घेण्याकरतां, मीं चार दिवसांच्या सवडीनें पुण्यास गेलों. सोसायटीच्या कचेरींत जाऊन चौकशी करतां १९३७ ते १९४० सालांच्या साप्ताहिक अहवालांच्या फाइली कचेरींत असून बाकीच्या फाइली बाहेरगांवीं गेल्याचें कळलें. त्यामुळें थोडीशी निराशा झाली. पुण्यांतील मुक्काम फुकट जाऊं नये म्हणून उरलेल्या मुदतींत नाना सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीचे सभासद झाले त्या १९०९ सालापासून ते सोसायटींतून निवृत्त झाले त्या १९४० सालापर्यंतचे वार्षिक अहवाल व मध्यवर्ति कायदे मंडळाचे दोन तीन वर्षांचे असेंब्ली डिबेट्स् वाचून

काढलें. हे असेंब्ली डिबेट्स् कायदे मंडळांतील कामकाजाचे विस्तृत अहवाल असून ज्याला नानाचें फार मोठें चरित्र लिहावयाचें असेल त्याला ह्या डिबेट्स्‌चा चांगला उपयोग होण्यासारखा आहे. मी जें चरित्र लिहिणार आहे तें छोटें असणार आहे व त्याची किंमत दोन रुपयांबाहेर जाऊं नये अशी माझी इच्छा आहे. वार्षिक अहवालांतील माहिती मला उपयुक्त वाटली. त्यांतील व १९३७ ते १९४० च्या साप्ताहिक अहवालाच्या फायलींतून कांहीं माहिती उतरून घेऊन १९०९ ते १९३६ पर्यंतच्या साप्ताहिक अहवालांच्या फायली पुण्यास आल्यानंतर पुन: केव्हांतरी वाचावयाच्या असें ठरवून तारीख २२ मे १९५५ रोजीं दादरला परत आलों. पुण्याच्या भेटींत काय झालें तें नानांना सांगण्याकरतां मुंबईस आज जाऊं उद्या जाऊं म्हणतां म्हणतां तारीख ३० मे रोजीं संध्याकाळीं एकाएकी त्यांच्या आकस्मिक निधनाची वार्ता कानावर आली. याच्या आधीं त्यांना भेटावयाला गेलों नाहीं याबद्दल वाईट वाटलें. पण त्याला मी तरी काय करणार ! इतक्या लवकर त्यांचें निधन होईल याची मलाच नव्हे तर कोणालाच कल्पना नव्हती. परंतु या अकल्पित घटनेमुळें त्यांच्या हयातींत त्यांचें चरित्र प्रकाशित करण्याची आकांक्षा फोल ठरली. “मनसा चिंतितं कार्यं दैवमन्यत्र चिन्तयेत् ” या म्हणीचा मात्र या अनुभवानें प्रत्यय आला व असें वाटूं लागलें कीं यापुढें तरी हें काम शक्य तितक्या लवकर पुरें करावें.

यानंतर मुंबईस सोसायटीच्या आफिसांत जाऊन सोसायटीचे सभासद श्री. राव यांना भेटलों. त्यांनीं मोठ्या आपुलकीनें सोसायटीच्या वार्षिक अहवालांतील मला हवे असलेले उतारे टाइप करून मला दिले. याबद्दल मी राव यांचा फार आभारी आहे.

तारीख १५ ऑगस्टला सोसायटीचे श्री. आबासाहेब आंबेकर यांचें पुण्याहून पत्र आलें, “ weekly letters ” च्या फायली गांवांहून आल्या आहेत पण तिकडे लवकर पाहिजेत. तर आपण लवकर येऊन पाहून टाकाव्यात, म्हणजे परत पाठवितां येतील. हें पत्र आल्यानंतर मी १७ ऑगस्ट १९५५ रोजीं पुण्यास गेलों. १९१८ ते १९३७ पर्यंतच्या साप्ताहिक अहवालांच्या फाइली वाचावयास मिळाल्या. त्यामधील जे उतारे मला महत्वाचे असे वाटले ते तेथीलच माझ्या एका स्नेह्याला टाइप करून सवडीप्रमाणें माझ्याकडे पाठवून

देण्याची विनंति करून मी दुसऱ्या दिवशीं दादरला आलों. सन १९०९ ते १९१८ पर्यंतच्या साप्ताहिक अहवालांच्या फाइली तिसऱ्याच एका ठिकाणीं गेल्या असल्यामुळें पाहावयास मिळाल्या नाहींत.

नानांनीं खाजगी रोजनिश्या अशा ठेवल्या नसल्या कारणानें तें साधन उपलब्ध होणें शक्य नव्हतें. वर्तमानद्वारा नानांच्या इष्टमित्रांकडून व चहात्याकडून माहिती मागविली आहे, परंतु अशा तऱ्हेनें फारशी माहिती मिळेल असें आजपर्यंतच्या लोकांच्या अनुभवावरून वाटत नाहीं. अशी माहिती फारच थोडी मिळाली.

एवढ्या साधनसामुग्रीच्या मदतीनें हें चरित्र लिहिण्यास घेतलें आहे. मला वाटतें मी ज्या तऱ्हेचें हें चरित्र लिहिण्याचें ठरविलें आहे त्याला ही साधनसामुग्री पुरेशी आहे. चरित्रांत नानांच्या संबंधानें शक्य ती माहिती देण्याचा मी प्रयत्न करणार आहे. गुणांचें वर्णन करणार आहे. त्यांच्या मतांची, विचारांची, किंवा ज्या लिबरल पक्षाचे ते सभासद होते त्या पक्षाच्या धोरणाची व मतप्रणालींची चिकित्सा करण्याचें मी टाळणार आहे, कारण तो माझा अधिकार नाहीं.

या चरित्राच्या वाचनानें वाचकांना नानांचें यथायोग्य व्यक्तिदर्शन होईल अशी आशा आहे. व तें चरित्रवाचन आमच्या तरुण पिढीस स्फूर्तिदायक व मार्गदर्शक होईल अशी उमेद आहे.

हें चरित्र लिहितांना वर नमूद केलेल्या साधनांमधून माहिती घेतली आहे. साहजिकच ' साधने ' तील लेखांवर विशेष भर दिला आहे. वरील साधनांतून घेतलेलें ऋण मी या ठिकाणीं आभारपूर्वक नमूद करीत आहे.

डॉ. रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे यांनीं स्वयंस्फूर्तीनें व आपुलकीनें प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे.

सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीचे श्री. दिनकर देसाई यांनीं या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या बाबतींत मला पुष्कळ मदत केली आहे. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

सरतें शेवटीं, पॉप्युलर बुक डेपोचे श्री. सदानंद भटकळ यांनीं या पुस्तकाच्या छपाईची सर्व जबाबदारी अंगावर घेऊन तें प्रकाशित करण्याचें काम अंगावर घेतलें याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे. त्यांनीं जर हें काम अंगावर घेतलें नसतें तर आणखी किती काळपर्यंत हें पुस्तक अप्रकाशित राहिलें असतें, तें मला सांगतां येत नाहीं.

पाध्येवाडी, राममंदीराजवळ
भवानीशंकर रोड, दादर, मुंबई : २८
२ मे १९५७

लेखक
**विष्णु कृष्ण जोशी.**



कुटुंबसमवेत ना. म. जोशी

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | कुटुंबाची माहिती. ... ... ... ... | १ |
| २. | पुण्यातील विद्यार्थीदशेंतील दिवस ... ... ... | ८ |
| ३. | बी. ए. ची परीक्षा झाली; पुढें काय ? ... ... ... | १६ |
| ४. | चरित्राची रूपरेषा ... ... ... ... | २० |
| ५. | नानांची ( १ ) सोशल सर्व्हिस लीग ... ... ... | २२ |
| | ( २ ) बां. प्रॉ. सो. रि. असोसिएशन ... ... | |
| | ( ३ ) सिव्हिल लिबर्टीज यूनियन ... ... | |
| | ( ४ ) आ. इं. ट्रे. यू. कॉ. ... ... ... | |
| | ( ५ ) नॅ. फे. ऑफ लेबर ... ... ... | |
| | ( ६ ) मुंबई कॉर्पोरेशनमधील कामगिरी. ... ... | |
| ६. | आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेंतील कार्य. ... ... | २८ |
| ७. | ,, ,, ,, ,, २ ... ... | ३५ |
| ८. | ,, ,, ,, ,, पुढें चालू ... ... | ४१ |
| ९. | कामगार चळवळीसंबंधीं कांहीं अडचणी व प्रश्न. ... | ४८ |
| १०. | नानांचा मध्यवर्ति विधिमंडळांत प्रवेश. ... ... | ५६ |
| ११. | कामगारांच्या हितासाठीं विधिमंडळांतील लढा ... ... | ६४ |
| १२. | मध्यवर्ति विधिमंडळांतील कामाचें धोरण ... ... | ६८ |
| १३. | ,, ,, ,, ,, —पुढें चालू. | ७३ |
| १४. | गोखले एज्युकेशन सोसायटीतर्फे नानांचा सत्कारसमारंभ ... | ७८ |
| १५. | ब्लॅव्हेट्स्की लॉजमधील सत्कारसमारंभ ... ... | ८० |
| १६. | आयुष्याची शेवटलीं पंधरा वर्षें. ... ... ... | ८३ |
| १७. | नानांच्या ठिकाणीं असलेले विशेष गुण. ... ... | ८८ |

वि:
नों: दि:

# कुटुंबाची माहिती

नारायणरावांचे पूर्वज देशावर पुणें जिल्ह्यांतील रायरी या गांवीं रहात असून ते तेथें भिक्षुकी व ज्योतिषी या वृत्ति करीत असत; आणि या कारणानें ते 'रायरीकर जोशी' अशा जोड नांवानें ओळखले जात. रायरीकर जोश्यांपैकीं कोणता पुरुष प्रथम देशावरून कोकणांत उतरला, व त्याला असें देशांतर करण्याला काय कारण घडलें हें नक्की सांगता येत नाहीं. नारायणरावांचे खापर-पणजे गोरेगांवास आले व तेथेंच स्थायिक झाले. येथपासूनची माहिती सुसंगतपणें मिळते. नारायणरावांचे आजोबा बाळ (बल्लाळ) जोशी यांनीं आपलें बस्तान बसवून आजोबांच्या व वडिलांच्या वृत्तींत, विद्येंत, व कीर्तींत बरीच भर घातलेली दिसते; कारण याज्ञिकीच्या जोडीला त्यांनीं ज्योतिषाचाहि चांगला अभ्यास केलेला दिसतो. शेवटीं शेवटीं त्यांनीं संन्यास घेतला होता. नारायणरावांच्या वडिलाचें नांव मल्हार असून त्यांस एरवीं 'नथुजोशी' असें म्हणत. एक चांगले ज्योतिषी म्हणून त्यांचीहि आपल्या वडिलांप्रमाणें फार प्रसिद्धि असून परप्रांतांतले कितीतरी विद्यार्थी त्यांचेकडे रहावयास येत व ज्योतिष शिकून जात. पहिलें कुटुंब निवर्तल्यावर नथु जोश्यांनी शेजारच्या 'तळें' गांवच्या जोश्यांच्या मुलीशीं विवाह केला. तळयाच्या जोश्यांची ही मुलगी म्हणजेच आपल्या नारायणराव जोश्यांची आई. हीं दोन्ही घराणीं नांवानें व वृत्तीनेंहि एकच होतीं. नथु जोशी वयाच्या साठाव्या वर्षी म्हातार-पणाच्या क्षयानें वारले. त्यांना पहिल्या कुटुंबापासून एक व दुसऱ्या कुटुंबा-पासून सात अशीं एकंदर आठ अपत्यें झालीं.

नारायणरावांचा जन्म 'गोरेगांव' मुक्कामी इ. सन. १८७९ मध्यें जून महिन्याच्या पांचव्या तारखेस झाला. त्यांना दोन भाऊ व चार बहिणी अशीं एकंदर सहा सख्वी भावंडें होतीं. एक बहिण पेणेस बेलसऱ्यांकडे व दुसरी पेणेसच जोशांकडे दिली होती. तिसरी नाडसूरला राइलकरांकडे व चौथी निजामपुरास कुळकर्ण्यांकडे दिली होती. नारायणरावांचे सावत्र बंधु वासुदेवराव उर्फ भाऊ यांनीं आपली उभी हयात कोंकणांत घालविली. त्यामुळें त्यांचा व इतर बंधूंचा फारसा संबंध येत नसला तरी ते परस्परांशीं मोठ्या आपुलकीनें

वागत. एकुलत्या एक मुलाला पाण्यांत बुडून मृत्यु आल्यामुळें विरक्तता प्राप्त होऊन भाऊंनीं काशीस जाऊन राहण्याची इच्छा दर्शविली व तिघाही भावांनीं मोठ्या आनंदानें गोरेगांवची आपली सामायिक शेती विकून टाकून आलेली सर्व रक्कम भाऊंचे स्वाधीन केली. पण काशीवासास कंटाळून भाऊ फिरून गोरेगांवीं येऊन राहिले, व तेथेंच पुढें १९३० सालीं वारले. भाऊंचे लग्न 'नांदवी'च्या गणेश रामचंद्र जोशी यांच्या यमुना नांवाच्या मुलीशी झालें होतें. यांना दोन अपत्यें होतीं, एक मुलगा व एक मुलगी. मुलगी अल्पवयांत विधवा होऊन त्यानंतर थोड्याच काळानें वारली. मुलाला पाण्यांत बुडून मृत्यु आल्याचा उल्लेख वर आलाच आहे. भाऊ आपल्या वडिलांप्रमाणें एक प्रख्यात ज्योतिषी होते. नारायणरावांची विद्वता, कार्यांचा व्याप, त्याग वगैरे भाऊंना फारसें कांहीं कळत नसलें तरी हा कोणी तरी मोठा आहे असें कौतुक त्यांना वाटल्यावांचून राहात नसे. भाऊंची पत्नी ही एक बोलभांड व तक्रारखोर बाई म्हणून शेजाऱ्या पाजाऱ्यांत गाजलेली होती. नवऱ्याचे मागून थोड्याच दिवसांत याही बाई वारल्या. चरित्रलेखकाच्या ह्या आत्याबाई.

नारायणरावांचे ( नानांचे-यापुढें नारायणरावांचा उल्लेख मी याच नावानें करणार आहे. ) दुसरे बंधु माधवराव उर्फ अण्णा. ते लहानपणापासून हुशार व तरतरीत विद्यार्थी होते. मराठी सहावी इयत्ता पुरी करून ते व्हर्नाक्युलर फायनल परीक्षेकरतां अलिबागेस गेले होते, पण वय कमी भरल्यामुळें त्यानां पहिल्यावर्षी परीक्षेला बसूं दिलें नाहीं. दुसऱ्या वर्षी ते परीक्षा पास झाले. तेव्हां गोरेगांवच्या शाळेचे हेडमास्तर रा. फडके यांनीं त्यांना इंग्रजी शिकण्याची कल्पना सुचविली. त्याप्रमाणें ते रोहें येथें त्यांची एक आत्या होती तिच्याकडे राहून तेथील मिशनऱ्यांच्या शाळेंत जाऊं लागले. पण पुढें लवकरच ( १८८७ सालीं ) घरच्या मंडळीस कांहीं एक न कळवितां सवरतां ते तेथून पुण्यास गेले व वारावर राहून नुकत्याच स्थापन झालेल्या न्यू इंग्लिश स्कूलमध्यें इंग्रजी पांचवींत दाखल झाले.

त्यावेळीं पुण्याची राहणी स्वस्त, साधी, व चैनीचे मोह कमी या योगानें कमी खर्चाची असल्यामुळें, व महाड-गोरेगांव या भागांतील लोकांनां वरंध घाटानें पुणें नजीक वाटत असल्यामुळें गरीब पण हुशार महत्वाकांक्षी मुलगे

दुय्यम व उच्च शिक्षणासाठीं पुण्यास जात असत. मोने, उपाध्ये कुटुंबांतील होतकरू मुलगेही माधवरावांप्रमाणें याच सुमारास पुण्यास इंग्रजी शिकण्याकरतां गेले होते. भिक्षुकी वृत्तीच्या नथु जोश्यांनां आपल्या मुलाचें हें करणें आवडणें शक्य नव्हतें; तथापि कांहीं दिवसांनीं त्यांचा राग कमी होऊन ते माधवरावांनां पैसे वगैरे पाठवूं लागले. माधवरावांनां आतां शाळेंत शिष्यवृत्तीहि मिळूं लागली होती. वडिल वारले त्यावेळीं माधवराव मॅट्रिकच्या परीक्षेपर्यंत आले होते. मॅट्रिकच्या परीक्षेंत संस्कृतकरतां ठेवलेली पहिली जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ति मिळवून ते फर्ग्युसन कॉलेजमध्यें गेले, तेथें पहिल्या दोन्ही परीक्षांत उत्तम प्रकारें पास होऊन त्यांनीं संस्कृत करतां ठेवलेली सर्व पारितोषिकें मिळविलीं, पण फेलोशिप मिळावी म्हणून ते डेक्कन कॉलेजांत गेले व तेथून बी. ए. व एम. ए झाले. याहि परिक्षांत संस्कृत विषयाचीं सर्व पारितोषिकें मिळवून ते उत्तम प्रकारें पास झाले. माधवरावांची हुशारी व कर्तबगारी लक्षांत घेतां त्यांस तेथेंच, किंवा दुसऱ्या एखाद्या सरकारी संस्थेंत मोठ्या मानाची व पगाराची जागा मिळावयाची. पण त्यांचा मानी स्वभाव व राष्ट्रीय वृत्ति वरिष्ठांना न खपल्यामुळें त्यांना कोणत्यातरी खाजगी संस्थेकडेच वळावें लागलें. १८९८ पासून १९०२ पर्यंत माधवरावांनीं नगर येथील सोसायटीचे हायस्कूलांत हेडमास्तर म्हणून काम केलें. त्या नंतर ते जुनागडला गेले, व तेथील बहुद्दिन कॉलेजमध्यें संस्कृतचे प्रोफेसर म्हणून काम करूं लागले. सुमारें २५ वर्षें तेथें काम करून व विद्यार्थ्यांचें व लोकांचें प्रेम संपादन करून ते १९२८ सालीं सेवानिवृत्त झाले व हिंगण्यास वामनरावांकडे येऊन राहिले. पण पेन्शनचें सुख लाभण्यापूर्वींच ते एप्रिल १९२८ मध्यें मृत्यु पावले. त्यांना पांच मुलगे झाले. ( १ ) दत्तात्रय ( २ ) सिताराम ( ३ ) अवधूत ( ४ ) बाळ आणि ( ५ ) त्रिंबक. त्यांच्या मुलीचें नांव मालती. त्यापैकीं श्री. त्रिंबकराव व अवधूतराव आज हयात असून त्यापैकीं दुसरे ग्वाल्हेर येथें व्हिक्टोरिया कॉलेजांत मराठीचे प्रोफेसर आहेत व पहिले पुण्यांतील बृहन्महाराष्ट्र कॉमर्स कॉलेजचे प्रिन्सिपाल आहेत. मालतीबाई पुण्यांत असतात.

नानांचे तिसरें बंधु वामनराव, यांचा जन्म तळें येथें त्यांच्या आजोळीं २१ जानेवारी १८८२ रोजीं झाला. हेही माधवरावांच्या मागोमाग १९०२ सालीं

एम्. एची परीक्षा दुसऱ्या वर्गांत पास झाले. प्रो. कर्व्यांच्या महाविद्यालयांत यांनीं १९१८ पासून अखेरपर्यंत काम केलें. उत्तम कादंबरीकार, समतोल टीकाकार, प्रथितयश साहित्यिक व तत्त्वज्ञानी म्हणून अक्षय कीर्ति मिळवून ते २० जुलै १९४३ रोजीं मुंबई मुक्कामीं मृत्यु पावले.

१९०२ सालीं वामनरावांचा विवाह गुळसुंदे ( तालुका पनवेल ) येथें राहणाऱ्या जोशी कुटुंबांतील मुलींशीं झाला. वामनरावांचे चिरंजीव गणेश ऊर्फ पुंडुभाऊ पुण्यास नोकरी करीत आहेत. थोरली मुलगी गंगू हिचा विवाह प्रसिद्ध साहित्यिक प्रो. द. के. केळकर यांच्याशीं झालेला आहे. दुसरी मुलगी शकुंतला हिचा विवाह साताऱ्याचे सीतारामपंत देवधर यांच्या चिरंजीवाशीं झालेला असून ते सरकारी इंजिनिअर खात्यांत हुद्याचे कामावर आहेत. वामनरावांची स्वतंत्र चरित्रें लिहिली गेलीं असल्यानें त्यांच्या संबंधी अधिक माहिती या ठिकाणीं देण्याचा मोह आवरणें अवश्य आहे.

नथु भटजींचे चौथे चिरंजीव नाना. वयाप्रमाणें त्याचा क्रमांक तिसरा. वामनराव हे सगळ्यांत लहान. वडिल वारले त्यावेळीं नाना सहाव्या इयत्तेंत होते. घरची जोशीपणाची वृत्ति बरीच मोठी असल्यामुळें आपल्याला ती झेंपणार नाहीं असें वाटून भाऊंनी नानांना शाळेंतून काढून वेदपाठांत घातलें. त्यांनीं सुमारें तीन वर्षें पठण करून तेवढ्या अवधींत ऋग्वेदी संहिता पाठ केली होती. परंतु माधवरावांना तें पसंत न पडून त्यांनीं नानांना पुण्यास आणलें व करंदीकर लवाटे वगैरे आपल्या मित्रांनीं चालविलेल्या न्यू प्रिपेरेटरी क्लासेसमध्यें त्यांना घातलें. वर्षादीडवर्षांत तेथें इंग्रजी चार इयत्ता पुऱ्या करून नाना न्यू इंग्लिश स्कूल मध्यें गेले व तेथूनच मॅट्रिक झाले. पुढें ते डेक्कन कॉलेजमध्यें गेले व चार वर्षांत १९०१ सालीं बी. ए. झाले.

नानांचें लग्न १९०० सालीं पेणचे श्री. कृष्णाजी महादेव घाटे यांची मुलगी आवडुताई यांच्याशीं झालें. यांचे सासरचें नांव रमाबाई यानां दोन मुलगे धोंडोपंत व वसंतराव व दोन मुली भिकूताई व कमळाबाई. भिकूताई सर्वांत मोठ्या. त्यांचा जन्म १९०७ सालीं झाला. या पुढें बी. ए. झाल्या व वडिलांच्या बरोबर त्यांच्या प्रायव्हेट सेक्रेटरी म्हणून यूरोपला जाऊन आल्या. त्यापूर्वीं त्या पुण्याच्या सेवासदनमध्येंहि कांहीं काम करीत होत्या. यूरोपला जाऊन आल्यानंतर लवकरच त्या विषमज्वरानें निव-

तेल्या. धोंडोपंत बी. कॉम्. झालेले असून जुलै १९५५ अखेरपर्यंत मुंबईस ऑर्डनन्स डेपोमध्यें लेबर ऑफिसर म्हणून काम करीत. त्यानंतर त्यांची बदली पुलगांवला झाली. वसंतराव बी. ए. असून बी. एस्. एन्. कंपनींत नोकरी करीत आहेत. कमळाबाई वसंतरावांच्या जवळ असतात. रमाबाईंना १९२७ सालीं देवाज्ञा झाली.

१९०१ नंतर सुमारें सात वर्षेंपर्यंत नगर व पुणें येथील खाजगी शाळांत आणि मुंबई व रत्नागिरी येथील सरकारी शाळांत नानांनीं शिक्षकाचें काम केलें. मुंबईस एल्फिन्स्टन हायस्कुलांत असतांनां त्यांनीं सेकंडरी टीचर्स सर्टिफिकेट परीक्षा देऊन शिक्षकाच्या धंद्याचें सर्टिफिकेट मिळविलें व त्या धंद्यांत स्थिर होण्याचा बेत केला. नाना सरकारी नोकरींतच शेवटपर्यंत राहिले असते तर आज दोनतीनशें रुपये पेन्शन मिळवीत पुणें नाशिक सारख्या ठिकाणीं स्वतःच्या बंगल्यांत आरामशीर राहात असलेले दिसले असते. पण योग निराळा असल्या-मुळें ते शिक्षण खात्यांत न राहतां नामदार गोखल्यानीं पुणें येथें काढलेल्या भारत सेवकसमाजास १९०९ सालीं जाऊन मिळाले व तेथें त्यांनीं स्वतःला मजूर संघटनेच्या कामीं वाहून घेतलें.

सदरहू तिघां भावांशिवाय नानांना चार मोठ्या बहिणीहि होत्या, त्यापैकीं पहिल्या दोघी माधवरावांपेक्षां मोठ्या असून दुसऱ्या दोघी त्यांच्या पाठच्या होत्या. त्या सर्वजणी अगोदरच वारल्यामुळें नानांना भावंडापैकीं एकटे वामन-रावच काय ते शिल्लक राहिले होते. तेहि त्यांना १९४३ सालीं सोडून गेले. तीन भाऊ व चार बहिणी व शिवाय माधवरावांचे तीन मुलगे, एक जांवई, वामनरावांचा बंडू व स्वतःची पत्नी यांचे वियोग दुःख सहन करून कर्मयोगी व स्थितप्रज्ञ नाना अखेरपर्यंत आपल्या सामर्थ्याप्रमाणें लोकांना मार्गदर्शन करण्यास तयार असत.

मातुश्री संबंधीं अबोल नाना लिहितात, ‘ती कधीं बोलली नाहीं तरी तात्यांच्या शिक्षेमुळेंच लागलेल्या हृद्रोगानें ती वारली. तात्या हें आमच्या आईचें शेवटचें अपत्य असल्यामुळें तात्या संबंधें तिची जास्त माया होती.’

‘अण्णांपासून एक गोष्ट आपण प्रामुख्यानें शिकलों व ती म्हणजे लहान मोठ्यांचे भांडणांत मोठ्यानें पड खाऊन लहानांना उदारतेचें उदाहरण घालून द्यावें ही होय,’ असें एकदां नाना म्हणाले.

वामनरावांना अण्णांबद्दल ज्या कारणांमुळें आदर वाटे त्याहून कांहीं निराळ्याच कारणामुळें नाना यांचेबद्दल आदर वाटे. आयुष्याच्या संस्कारक्षम काळांत वामनरावांचा अण्णांशीं जितका संबंध आला तितका नानांशीं आलेला दिसत नाहीं. त्या दोघांच्या वयांत तसें तीन वर्षांचेंच अंतर असलें तरी दोघांच्या मनाच्या ठेवणी प्रथम पासूनच निरनिराळ्या घडल्यामुळें वामनरावांच्या अण्णाविषयींच्या प्रेमांत जी आर्तता आणि उत्कटता प्रतीत होई तितकी नानाविषयींच्या प्रेमांत होत असे असें वाटत नाहीं. अण्णा आणि वामनराव सारखेच भावनाशील, तर नाना विचारशील. त्या दोघांचा ओढा चिपळूणकर, टिळक व त्यांचा राष्ट्रीय पक्ष यांकडे, तर नानांचा ओढा रानडे, गोखले व त्यांच्या नेमस्त पक्षाकडे. त्या दोघांना अध्ययन, अध्यापन, अध्यात्म वगैरे चिंतनपर गोष्टींची आवड तर यांना प्रत्यक्ष कार्य करण्याची व निरनिराळ्या चळवळींत भाग घेण्याची आवड. अण्णा व वामनराव काव्य-शास्त्रविनोदांत, व नीति, अनीति, कार्य, अकार्य इत्यादि प्रश्नांचा खल करण्यांत मग्न, तर नाना अर्थशास्त्रीय ग्रंथाच्या किंवा सरकारी निळ्या पुस्तकांच्या वाचनांत, लोकस्थितिदर्शक आंकडे जमविण्यांत व रिपोर्ट अहवाल वगैरेसारखे रुक्ष वाङ्मय प्रसिद्ध करण्यांत दंग. ते दोघे बोलके व वादविवादप्रिय व हे अबोल व कामसू. मात्र वादाचा प्रश्न राजकीय व गंभीर असला म्हणजे नाना त्यांत हिरीरीनें भाग घेत व त्यावेळीं ते व वामनराव यांत खडाजंगी उडे. नाना बहुधा तावातावानें बोलत व वामनराव हळू पण मिस्किलपणानें बोलत. नाना हे अण्णा व वामनराव यांचेहून अशा प्रकारें भिन्न मनोवृत्तीचे व भिन्न प्रकृतिचे असले तरी नानांचा व्यवस्थितपणा, टापटीप, कामसूपणा, विरक्तता, स्वतंत्र बाणा, निर्लोभवृत्ति, इत्यादि गुणामुळें वामनरावांना नानांबद्दल अण्णा-इतकाच आदर वाटे, व अण्णाइतकाच नानांच्याहि चारित्र्याचा परिणाम वामनरावांच्यावर झाल्यावांचून राहिला नाहीं.

नानाही वामनरावांप्रमाणेंच विधुर झालेले, प्रकृति नेहेमीं नादुरुस्त असलेली, बी. ए. झालेली, घरांतली पाहणारी, वडिलांच्या जीवाला जपणारी थोरली मुलगी भिकूताई वारलेली, धाकट्या मुलीची स्थिति नेहमींच काळजी करण्यासारखी असलेली अशा प्रकारच्या आधिव्याधींत व विवंचनेंत नानांनां आयुष्य काढावें लागलें यांचें वामनरावांनां मनांतून अतिशय दुःख होई आणि आपल्याला

त्यांच्या दुःखाचा परिहार करण्यासाठीं कांहीं करतां येत नाहीं या जाणीवेनें तर त्यांच्या दुःखांत अधिकच भर पडे. पण अशाहि दुःखद स्थितींत नाना इतक्या आनंदानें राहातात, अशा रुग्णावस्थेंतहि इतक्या लांबचे प्रवास करतात, विरुद्ध व्यक्तींनीं व प्रतिकूल पक्षांनीं केलेल्या निंदेकडे कानझाक करून हातीं घेतलेलें काम श्रद्धापूर्वक करतात, सरकारनें केलेल्या गौरवानें व दिलेल्या मानानें सुखावून न जातां 'सुखदुःखे समेकृत्वा' 'समलोष्टाश्मकांचन' अशा योगी वृत्तीनें राहातात याचें वामनरावांना मोठें कौतुक वाटे. दोघांवरील समान आपत्तीमुळें व विशेषतः अण्णा गेल्यापासून आठ भावंडापैकीं आपण आतां दोघेच उरलों या अबुद्ध जाणीवेनें अलिकडे वामनराव व नाना पूर्वींपेक्षां जास्तच निकट आल्यासारखे दिसत. चार सहा महिन्यांनीं जेव्हां ते एकमेकांना भेटत, आणि एकाच काडीनें दोन विड्या शिलगावून सुखदुःखाच्या गोष्टी बोलत असत तेव्हां जसे कांहीं फार दिवसांचे स्नेही भेटले आहेत आणि अंतर्यामींचीं हितगुजें सांगत आहेत असें वाटे. इतका मोकळेपणा, प्रेमळपणा व स्वाभाविकपणा त्यांच्या बोलण्याबसण्यांत भरलेला असे. वामनरावांच्या शेवटच्या दुखण्यांत व विशेषतः अंतकाळच्या प्रसंगी नानांचे जें धीरोदात्ततेचें व स्थितप्रज्ञतेचें वर्तन दिसलें त्याच्यासारखें दुसरें महाभारतांतच एखादें आढळलें तर आढळावयाचें !

अण्णा, नाना आणि वामनराव या त्रिवर्ग बंधूंकडे पाहिलें म्हणजे धन्यता वाटून एकाच घराण्यांत, एकाच वेळीं अशा तीन महान् व्यक्ति जन्माला कशा आल्या याचेंहि थोडेंसे आश्चर्य वाटतें. एक महाराष्ट्रीय मान्यतेचा गाढा पंडित, दुसरा जागतिक कीर्तीचा हिंदी मजुरांचा कैवारी, आणि तिसरा बृहन्महाराष्ट्रांतील विख्यात साहित्यिक असे बंधु असल्याचें महाराष्ट्रांत तरी हें पहिलेंच उदाहरण असेल. पण असाहि एक दुःखद विचार मनांत येतो कीं तिघांच्याहि बायका आपआपल्या पतींना व मुलाबाळांना सोडून भर संसारांतून अकालींच कशा नाहींश्या व्हाव्यात ? यांचे संसार शेवटपर्यंत सुखानें चालते तर त्यांचें काय आणखी चांगले नसतें का झालें ? का उलटच झालें असतें ? वामनरावांप्रमाणें एकदम 'अस्तु' म्हणून या विचार कल्पनांना आवरून धरूं.

२

# पुण्यांतील विद्यार्थीदशेंतील दिवस

जेव्हां नाना इंग्रजी शिक्षणाकरतां गोरेगांवाहून पुण्यास आले त्या वेळीं त्या संस्कृतीच्या क्षेत्रांत ज्या प्रागतिक आणि जहाल पक्षांनी महाराष्ट्राच्या जीवनांत ह्यावेळेपर्यंत क्रान्ति घडवून आणली होती त्यांच्या पुढाऱ्यांत लो. टिळक व आगरकर यांच्यांत फाटाफूट झाली व समाजावर वर्चस्व मिळविण्याबाबत या दोन पक्षांत चढाओढ चालू होती.

टिळक आगरकर मैत्रीचा शेवट महाराष्ट्राच्या इतिहासाच्या एका महत्वपूर्ण प्रकरणाचा शेवट होय. या प्रकरणाला १८७० ते १८८० या दशकाच्या मध्यांत या दोघांच्या विध्यार्थीदशेंतच सुरवात झाली. १८८२ सालच्या कोल्हापुरच्या खटल्यानें या दोघांना जो बंदिवास घडला तो, ज्या वादामुळें महाराष्ट्राच्या इतिहासांत १९ व्या शतकाचा शेवट चिरस्मरणीय ठरला, त्या वादळाचा इशारा होता. सहा महिने तुरुंगवास भोगल्यावर डोंगरीच्या कैदखान्यांतून ज्या वेळेला या दोघांची सुटका झाली त्यावेळेला त्यांचें जें स्वागत झालें तें, या दोघांना दया दाखविण्यांत यावी म्हणून लोकांनी केलेल्या अर्ज विनंत्या ब्रिटिश सरकारनें धाब्यावर बसविल्या त्याला खासें उत्तर होतें.

त्यांच्या सुटकेच्या चळवळीचे पुढारी प्रि. वर्डस्वथ व ना. मंडलीक हे होते. त्यांनीं सरकारला मध्यस्थी करून या दोन तरुणांना तुरुंगवासाच्या हालांतून मुक्त करण्याचा आग्रह केला, त्यांच्या आग्रहाचा कांहीं उपयोग झाला नाहीं. ब्रिटिश सरकारनें उघड उघड सांगितलें कीं या शिक्षेनें तरुण सुशिक्षित लोकांमध्यें जी बंडखोरीची वृत्ति आढळून येत आहे तिला आळा बसेल. टिळक आगरकरांच्या नेतृत्वाच्या “ डेक्कन एज्युकेशन सोसायटी ”, “ केसरी ” व “ मराठा ” ही वृत्तपत्रें व “ गणेशोत्सवा ” सारख्या संस्था या आणखी कांहीं खाणाखुणा आहेत.

पुढें कांहीं काळानें पुष्कळ राजकीय व सामाजिक बाबतींत या दोन्ही पक्षांचें मतैक्य होईनासें झालें. प्रागतिक व जहाल पक्षाच्या विचारांतील भिन्नता यांच्या मतभेदाचें मूळ कारण होतें. साम्राज्यशाहीशीं वागतांना कोणतें धोरण

पत्करावयाचें यासंबंधीं तो मतभेद होता. ब्रिटिश राजवटीच्या चौकटींत सामाजिक सुधारणा घडवून आणणें जरूर आहे असें प्रागतिकांना वाटे. राजकीय आणि सामाजिक बाबतींत सुधारणा घडवून आणल्यानें स्वातंत्र्यप्राप्ति होईल असा त्यांना विश्वास होता.

वरील विचारांची दिशा टिळकांना पसंत नव्हती. ब्रिटिश राजसत्ता हें हिंदुस्थानच्या मागासलेपणाचें मूळ कारण आहे, हा त्यांचा विश्वास. ते म्हणत, 'ब्रिटिश सत्तेपासून स्वातंत्र्य पहिलें आणि नंतर सर्वतऱ्हेच्या सुधारणा.' ज्यावेळीं संमतिवयाचें बिल ॲसेंब्लीपुढें आलें त्यावेळीं ह्या मतभेदानें प्रखर रूप धारण केलें. आमचे धनी म्हणून ब्रिटिश लोकांना या बाबतींत कायदे करण्याचा अधिकार नाहीं या मुद्यावर लोकमान्यांनी या बिलाला विरोध केला. हा अधिकार हिंदुस्थानांतल्या लोकांचा आहे व त्यांना पहिल्या प्रथम मिळाला पाहिजे.

टिळक आणि त्यांचे स्नेही डेक्कन एज्युकेशन सोसायटींतून बाहेर पडले. आगरकरांनी 'केसरी' सोडला, आणि त्यांनी सुरू केलेल्या 'सुधारका' भोवती सर्व सुधारक गोळा झाले. टिळकांनी 'केसरी' चा ताबा चालू ठेवला. प्रागतिक व जहाल पक्षाच्या मतभेदानें राष्ट्रीयवादी मंडळीचे दोन तट पडले, व प्रत्येक तट आपल्या दृष्टिकोनाचें समर्थन आपापल्या मुखपत्रांतून करूं लागला.

आमच्या राजकीय इतिहासाच्या या अवस्थेंत नाना आपलें इंग्रजी शिक्षण पुढें चालू करण्याच्या उद्देशानें पुण्यास आले. राजकीय परिस्थिति जरी इतकी चिघळली होती तरी त्यांना त्याचें फारसें आश्चर्य वाटलें नाहीं. या वातावरणाचा अनुभव त्यांना आपल्या गांवातसुद्धां आला होता.

नानाचें गांव गोरेगांव, मुंबईच्या दक्षिणेस सुमारें ८० मैलावर 'कुलाबा' जिल्ह्यामध्यें आहे. महाराष्ट्रांतल्या सुपीक जिल्ह्यामधलें हें गांव त्याकाळीं लोकसंख्येनें गजबजलेलें, भरभराटींत होतें. गांवाची लोकसंख्या मिश्र असून जवळजवळ ३००० होती. व्यापारी लोक गुजराथेंतून आलेले होते परंतु ते मराठी बोलत. या भागांत भाताचेंच उत्पन्न विशेष होत असल्यामुळें जमीनदार हे मातबर असत. खेडेगांवाचा शाप–सावकारी–जोरांत चालू होती. गुजराथी व दक्षिणी हे दोघेही सावकारी करीत. सुखवस्तु असे हे दक्षिणी व गुजराथी लोक

सोडले तरी शेतमालक नसलेले परंतु शेतावर काम करणारे लोक बहुसंख्य होते. गांवांमध्यें शाळा होती व ती अजून चालू आहे. हरिभाऊ अधिकारी नांवाच्या गृहस्थांनीं राष्ट्रीय विचारांचें लोण गांवांत पोंचविलें. गांवांतील शाळेचे हेडमास्तर व अधिकारी यांची चांगली ओळख होती. राष्ट्रीय वृत्तीचे वारे त्यावेळीं अव्यवस्थित स्वरूपांत वाहात होते. गोरेगांव जरी मुंबईला नजीक आहे तरी दळणवळणाच्या आधुनिक सोईंच्या अभावी तेथें जाणें त्रासाचें होतें आणि म्हणून तेथें ही चळवळ अधिकच अव्यस्थित होती. त्या ठिकाणचें राजकारण म्हणजे वर्तमानपत्रें वाचणें, राजकारणी व्यक्तींच्या संबंधी चर्चा करणें, संदिग्धरीतीनें राष्ट्रीय भावनांना उत्तेजन देणें एवढेंच असे. राष्ट्रीय कॉंग्रेसच्या अधिवेशनाला प्रतिनिधि निवडण्याच्या वेळीं विशेष चैतन्य उत्पन्न होई. अशा एका प्रसंगाचा नानांच्या मनावर कधीं न बुजणारा असा संस्कार झाला.

त्यावेळीं नाना दहा वर्षांचे होते. १८८९ मध्यें एके दिवशीं संध्याकाळीं शाळेच्या आवारामध्यें इतर संवगड्याबरोबर खेळत असतांना शाळेच्या दिवाणखान्यांतून टाळ्यांचा कडकडाट ऐकून त्यांना मोठें आश्चर्य वाटलें. त्या दिवशीं संध्याकाळीं एक सभा भरणार आहे हें मुलांनी ऐकलें होतें. शाळेच्या इमारतीकडे गांवांतील पोक्त्यापुरवत्या माणसांची रांग लागलेली त्यांनीं पाहिली होती. तरुण पिढीला नेहमीं शांत आणि गंभीर भासणाऱ्या वडिल माणसांनीं एवढा गोंगाट कां करावा हें मुलांना समजेना. त्यानी आपला विटू दांडू टाकून दिला आणि ते दिवाण-खान्याकडे धावले. त्याठिकाणीं त्यांनीं अधिकाऱ्यांना ब्रिटिश सरकारवर वक्तृत्व पूर्ण टीका करतांना व लोकांना मधून मधून टाळ्या वाजवून त्यांच्या भाषणाला साथ देतांना ऐकलें. अधिकारी लोकांनीं आपणाला कॉंग्रेसचे प्रतिनिधि म्हणून संमति द्यावी म्हणून लोकांचें मन वळवीत होते.

याच वेळेला नानांच्या वर्गातल्या मुलांनीं केलेल्या संपांत नानांनीं भाग घेतला होता. हा संप शारीरिक शिक्षेचा निषेध म्हणून घडवून आणण्यांत आला होता. त्या काळीं शारीरिक शिक्षा सर्रास चालू असे. नानांना स्वतःला या शिक्षेचा बरेच वेळा अनुभव आलेला होता. परंतु त्या वेळीं शारीरिक शिक्षा

22054 वि: 21 नों. दि: 22/11/50



सहन करणें म्हणजे एक पराक्रमाचें कृत्य समजलें जात असे. १९२० सालानंतर राजकीय गुन्ह्याकरतां तुरुंगांत जाणाऱ्याला जो अभिमान वाटे तो त्यांना मार खाण्यांत वाटे, मार खाऊन जो मुलगा रडत नसे तो शूर समजला जाई. मार खाणारा प्रत्येक विद्यार्थी हा मान मिळविण्याचा प्रयत्न करी. शिक्षकांनीं त्यांना मारण्यास कमी केलें नाहीं. त्यांना मार खावा लागला. परंतु ते कधीं रडले नाहींत. एक दिवस त्यांच्या वर्गांतील मुलांना या गोष्टीची फार चीड आली आणि सगळ पंधरा विद्यार्थी दुसऱ्या दिवशीं शाळेंत गेले नाहींत. या संपामुळें शाळेंतील शारीरिक शिक्षा बंद झाली नाहींच, उलटपक्षी या संपामुळें त्या मुलांना शाळेंत आणि घरीं असा दोन्हीकडे मार मिळाला. नानांच्या वडलांना जेव्हां ही संपाची बातमी समजली तेव्हां त्यांनीं नानांना असा खरपूस मार दिला कीं तसा मार त्यांना त्यांच्याकडून किंवा घरांतील दुसऱ्या कोणाही माणसाकडून पूर्वीं कधींहि मिळाला नसेल. शाळेंत सर्वांनाच मार मिळाला, आणि सर्वांना तो निमुटपणीं सहन करावा लागला.

पुण्यास ते टिळक राहात त्या घराच्या जवळच नारायण पेठेंत राहात. त्यांनीं तळमजल्यावर दोन खोल्या व पहिल्या मजल्यावर एक खोली असलेलें घर भाड्यानें घेतलें होतें. घराचें भाडें दोन रुपये होतें. दर महिन्यास भाऊंनीं पाठविलेल्या वीस रुपयांत ते आपला खर्च भागवीत. कुटुंबांत चार माणसें होतीं; नाना, वामन, आई राधाबाई आणि अण्णांची बायको.

या वेळेला अण्णा डेक्कन कॉलेजांत बोर्डिंगमध्यें राहात. मॅट्रिकच्या परीक्षेंत संस्कृत विषयांत पहिला नंबर मिळाल्यामुळें त्यांना स्कॉलर्शिप मिळाली होती. ह्या स्कॉलर्शिपमध्यें त्यांचा खर्चवेच भागे.

त्या दिवसांत मॅट्रिकच्या परीक्षेंत संस्कृत विषयांत पहिल्या दोन नंबरांनीं पास होणाऱ्या उमेदवारांना स्कॉलर्शिप दिल्या जात. या स्कॉलर्शिपाकरतां मोठी चढाओढ लागे. उमेदवारही पुष्कळ असत. अण्णांना यांतली पहिली स्कॉलर्शिप मिळाली. या व दुसऱ्या मिळालेल्या स्कॉलर्शिपांवर त्यांचें एम. ए. पर्यंतचें शिक्षण झालें.

महिना रु. २० उत्पन्न असलेलें चार माणसांचें कुटुंब त्यावेळीं सुखवस्तु समजलें जाई. म्हणून वर सांगितलेल्या चार माणसांव्यतिरिक्त नानांच्या घरांत

चार विध्यार्थी राहात असत. त्यापैकीं दोघे वारावर होते. त्यावेळीं विद्यार्थी 'वारावर' किंवा 'माधुकरी' मागून राहात. यावरून विद्यार्थी शिक्षणाला किती महत्व देत हें कळून येतें. या दोन पद्धतीनें शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या त्यावेळीं फार मोठी होती. फक्त ब्राह्मण विद्यार्थीच या पद्धतीनें विद्यार्जन करीत. नानांकडे राहाणाऱ्या विद्यार्थ्यांपैकीं एक हल्लीं मुंबईत राहातात. त्यांचं वय नानांच्या वयाइतकेंच असून ते पुढें मामलेदार झाले व हल्लीं पेन्शनर आहेत. नाना त्यांना मधून मधून भेटत. बाकीचे दोघे विद्यार्थी नानांचे नातेवाईक होते. ते नानांकडे राहात आणि खाणावळींत जेवत. त्यावेळीं पुष्कळ पाहुणेही येत. आण्णा शनिवारीं–रविवारीं व सुट्टीच्या दिवशीं येत असत. या कुटुंबांत विद्यार्थ्यांच्या वाढीला योग्य असें वातावरण होतें. खेळण्याची हौस असल्यानें दूर असलेल्या उघड्या मैदानांत खेळण्याकरतां ते कसे चालत जात याचें स्मरण नानांना होतें. मजा करण्यास फार थोड्या गोष्टी पुरत. नाना म्हणत, " आम्ही साधेपणानें राहाणारे होतों. आमच्या जरूरी थोड्या होत्या, ज्या गोष्टी पाहून हल्लींचे लोक हंसतील त्यांच्या प्राप्तीनें आम्हाला सुख होत असे. चणेकुरमुरे मिळाले असतांना आम्हांला आनंद होई. आम्ही पै पैसा गोळा करून मधून मधून चणे, कुरमुरे घेऊन मजा करीत असूं. सोडावॉटर ही त्यावेळला नवलाईचीच वस्तू होती, आणि मजा करण्याकरतां आम्हीं कधीं कधीं सोडावाटरही विकत घेत असूं. त्यावेळीं पुण्यामध्यें ही दुर्मिळ वस्तू विकणारी जेमतेम दोन दुकानें होतीं. ज्यावेळीं आमच्याजवळ एक आणा शिल्लक जमे, त्यावेळीं आम्हीं एक बाटली विकत घेऊन पीत असूं. यावरून आम्हांला एक सोडावॉटरची बाटली मिळाली तर केवढा आनंद होत असे याची तुम्हाला कल्पना येईल. पण ते दिवस निराळे होते ! "

ज्यावेळीं नाना पुण्यास आले त्यावेळीं 'केसरी'चे अनुयायी व 'सुधारकाचे' अनुयायी असे दोन पक्ष पुण्यांत पडले होते. केसरीचे व सुधारकाचे लेख ऐकणारे श्रोते पुष्कळ होते. या दोन वर्तमानपत्रांच्या आवाजानें सर्व शहर दुमदुमून जात असे. चौकाचौकांमधून लोक हीं वर्तमानपत्रें वाचीत, त्यांतील लेखावर विचार करीत, आणि हे वाचक विरोधी पक्षांतले असले तर ते वाद विवाद करूं लागत. नाना अर्थात् या वादानें आकर्षिले जात. आपल्या घरांत राहणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबर ते वादग्रस्त मुद्द्यावर चर्चा करीत. कधीं कधीं ती

शाळेंत व क्रीडांगणावरही चाले. सेनापति बापट त्यांच्या बरोबरीचे विद्यार्थी हे त्यांचे एक स्नेही होते.

सार्वजनिक कामांत प्रत्यक्ष भाग घेण्यांत नाना अजून वयानें लहान होते. त्याचप्रमाणें त्यांच्या उत्साहाला ज्याठिकाणीं नांव मिळेल अशी "एखादी विद्यार्थीसंघटनाही त्यावेळेला अस्तित्वांत नव्हती. परंतु खालील दोन घटनांवरून पुण्यांतील सर्वसाधारण विद्यार्थ्यांची व विशेषतः नानांची मनोवृत्ति व दृष्टिकोण काय होता याची कल्पना येईल.

नानांच्या शाळेंतील एक शिक्षक आठवड्याला परीक्षा घेत, परंतु उत्तर-पत्रिका न देण्याची त्यांना संवय होती. विद्यार्थ्यांना या सवयीचा राग येत असे. ते म्हणत, "उत्तरपत्रिका तपासून आम्हाला परत दिल्या पाहिजेत." शिक्षकांनीं या गोष्टीकडे दुर्लक्ष केलें. एक दिवस सर्व वर्ग गैरहजर राहिला. गोरेगांवला झालें त्याचीच ही पुनरावृत्ति होती. ज्याप्रमाणें गोरेगांवच्या शिक्षकांनीं शारीरिक शिक्षा करण्याचें टाकलें नाहीं, त्याप्रमाणेंच ह्या शिक्षकानें पेपर तपासून देण्याचें कबूल केलें नाहीं, उलटपक्षी सर्व विद्यार्थ्यांना छड्यांचा भरपूर मार मिळाला, व प्रमुख गुन्हेगारांपैकीं एक म्हणून नानांना प्रसिद्धि मिळाली.

याच वेळीं ब्रिटिश कापडावरील बहिष्काराच्या चळवळीला सुरवात झाली. या चळवळीच्या खुणेपैकीं एक खूण म्हणजे परदेशी कपड्यांची होळी करणें ही होय. विद्यार्थ्यांनीं एक मिरवणूक काढली. रस्त्यांतून मिरवणूक हिंडवल्यावर त्यांनीं परदेशी कपड्यांची होळी पेटवली. ज्यावेळीं ज्वाला भडकल्या त्यावेळीं विद्यार्थ्यांनीं आपल्या अंगांत असलेले परदेशी कपडे त्या आगींत फेकले. तो एक व्यवस्थित यज्ञच झाला.

नाना पश्चात्तापानें कबूल करतात, "मी या मिरवणुकींत होतों, आणि ज्यावेळीं प्रत्येकजण आपले परदेशी कपडे आगींत फेकूं लागला त्यावेळीं मीहि आपले कपडे आगींत फेकले."

नानांना पश्चाताप वाटण्यास कारण होतें. जरी ते अजून वयानें लहान होते तरी त्यांची निष्ठा प्रागतिकांकडे वळली होती. त्यांनी आपली निष्ठा सार्वजनिक रीतीनें बोलून दाखविली नव्हती. ते दोन्ही बाजूचे बोलणें ऐकत. 'केसरी' व

'सुधारक' हीं दोन्ही वर्तमानपत्रें वाचीत. परंतु अंतःकरणापासून त्यांना सुधारकांतलीं मतें पटत. त्यांची प्रागतिक मतांची घडण याचवेळीं घडली गेली.

परंतु जहाल किंवा प्रागतिक दोघांचीही शिवाजीच्या ठिकाणीं निष्ठा होती.

हिंदुस्थानांतील ज्या लोकांनी आपलें स्वातंत्र्य सर्वांच्या शेवटीं गमावलें ते महाराष्ट्रीय लोक पराभवामुळें प्राप्त झालेला अपमान अजून विसरले नव्हते. पराभवाची स्मृति अजून ताजी होती, आणि त्यामुळें झालेल्या जखमा अजून भरून आल्या नव्हत्या. सर्व साधारण लोकांच्या अंतःकरणांत ब्रिटिश लोकांसंबंधी तीव्र द्वेषाग्नि धुमसत होता. या द्वेषाची तीव्रता राजकर्त्यांना माहित होती. एका महाराष्ट्रांतील लोकांसंबंधी त्यांची वृत्ति संशयी होती. ही वृत्ति एवढी बद्धमूल होती कीं ह्या संशयपिशाच्चिकेनें न्यायमूर्ति रानड्यांनासुद्धां पछाडण्यास कमी केलें नाहीं.

शिवाजीची स्मृति ही ह्या ब्रिटिश लोकांसंबंधीच्या अप्रीतीची मूर्ति होती. मराठी साम्राज्याच्या संस्थापकाची मूर्ति महाराष्ट्रांतल्या प्रत्येक व्यक्तीच्या मनश्चक्षूपुढें तरळत होती. त्यांच्या ध्येयाचें अनुकरण करण्याचा ते प्रयत्न करीत. ज्या साध्या रहाणीबद्दल शिवाजी प्रसिद्ध होता तशाच तऱ्हेनें ते रहात.

टिळकांनीं या शिवाजी संप्रदायाला साम्राज्यशाही विरोधाचें वळण दिलें. इ. स. १८९५ मध्यें त्यांनीं 'केसरी' मध्यें 'कुलाबा' जिल्ह्यांतील 'रायगड' किल्ल्याच्या शिवाजीच्या समाधीच्या दुरुस्तीच्या आवश्यकतेसंबंधीचा एक लेख पोटतिडीकेनें लिहिला. या हांकेला तात्कालिक स्वयंस्फूर्त साथ मिळाली. देणग्यांच्या रूपानें थोडक्यांच वेळांत रु. २०,००० गोळा झाले. त्यांच्या जन्मतिथीचा व अभिषेकाचा असे दोन दिवस भक्तीनें व राजकीय उत्साहानें साजरे करण्यांत येऊं लागले. त्यावेळेपासून या समारंभांना 'शिवाजी उत्सव' हें नामाभिधान प्राप्त झालें.

नानांच्या मनावर या शिवाजी संप्रदायाचा फार परिणाम झाला. त्यांनीं शिवाजीच्या साध्या रहाणीचें अनुकरण करण्यास सुरवात केली. गादीशिवाय ते जमीनीवरच निजूं लागलें, अनवाणी चालूं लागले, कमींत कमी कपडे वापरूं

लागले, डोंगर चढूं लागले, आणि जोराचा व्यायाम घेऊं लागले, मलच्या मल हिंडू लागले, आणि अशाच तऱ्हेचीं इतर कामें करूं लागले.

ज्या दुसऱ्या संस्थेचा नानांच्या मनावर परिणाम झाला ती संस्था म्हणजे 'गणेशोत्सव'. शिवाजी उत्सवाप्रमामाणें राष्ट्रीयत्वाच्या नांवाखालीं त्या संस्थेला सुद्धां राजकीय स्वरूप देण्यांत आलें. हिंदूंमधील सर्व सुशिक्षित व अशिक्षित लोकांना एकत्र सांधणारा परिणामकारक हा एक दुवा आहे. ज्या शेंकडों मंडपांतून श्रीगजाननाच्या मूर्तींची पूजा केली जाते ते मंडप सनातनी, सामाजिक व राजकीय विचारांची केंद्रस्थानें बनलीं आहेत. सुरवातीच्या दिवसांत जहाल व प्रागतिक पुढाऱ्यांचीं भाषणें ऐकण्यास नाना कार्यक्रमांना हजर असत.

पुण्यांतील प्लेगच्या धामधुमीनंतर चाफेकर बंधूंना झालेली फांशीची शिक्षा आणि नातूंचा कारावास यांनीं नानांच्या मनाला धक्का बसला. नाना त्यांनीं गोंधळून गेले. परंतु त्यांनीं बरेंच आत्मनिरीक्षण केलें. साम्राज्यशाहीच्या दडपशाहीच्या भक्ष्यस्थानीं पडलेल्या लोकांबद्दल त्यांना सहानुभूति वाटे, परंतु क्रांतिकारक अत्याचारानें हिंदुस्थानचें स्वातंत्र्य जवळ कसें येऊं शकेल याचा त्यांना उलगडा होईना.

१८९५ सालीं राष्ट्रीय कॉंग्रेसचें अधिवेशन पुण्यास भरलें. त्यावेळीं नानांचा व कॉंग्रेसचा प्रत्यक्ष संबंध आला. ते अजून शाळेमध्यें होते. कॉंग्रेसच्या अधिवेशनानें तरुण पिढीमध्यें अनामिक आंदोलन सुरू झालें. त्यांत ते भागीदार होते. माधवराव या कॉंग्रेसच्या अधिवेशनाला गोरेगांवचे प्रतिनिधि म्हणून उपस्थित होते.

## ३

# बी. ए. ची परीक्षा झाली; पुढें काय?

१९०१ सालीं नाना डेक्कन कॉलेजांतून बी. ए. होऊन बाहेर पडले. परंतु पुढें काय करायचें हें त्यांनीं ठरविलें नव्हतें. लग्न झालेलें असल्याकारणानें कांहीं-तरी द्रव्यार्जनाचा मार्ग पत्करणें भाग होतें. यावेळीं त्याचे थोरले बंधु माधवराव उर्फ अण्णा अहमदनगरच्या हायस्कूलमध्यें शिक्षक म्हणून काम करीत होते. त्याच वेळीं अहमदनगर जिल्ह्यांत दुष्काळ पडला होता. सरकारनें दुष्काळी कामें सुरु केली होतीं. लहान मुलें, वृद्ध माणसें, अपंग, अशांकरितां अन्नगृहें काढण्यांत आलीं होतीं. अशा एका गृहामध्यें नानांनी किचन सुपरिंटेंडंट म्हणून काम पत्करलें. हे काम करीत असतांना त्यांना गरिबांचीं दुःखें कळून आलीं, त्यांचेसंबंधी सहानुभूति उत्पन्न झाली व दुष्काळी कामासंबंधी अनुभव मिळाला. पुढें दुष्काळग्रस्त क्षेत्रामध्यें काम करीत असतांना त्याचा त्यांना फार उपयोग झाला. तेथें त्यांनीं सहा महिने काम केलें व नंतर अहमद-नगरच्या हायस्कूलमध्यें त्यांनीं शिक्षकाची नोकरी पत्करली. त्या शाळेंत कांहीं काळ नोकरी केल्यानंतर त्यांनीं पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षकाची नोकरी पत्करली. येथें कांहीं वर्षे नोकरी केल्यानंतर त्यानीं मुंबईच्या एल्फिन्स्टन् हायस्कूलमध्यें नोकरी धरली. शिक्षकाच्या धंद्यांत कायम होण्याकरितां जी अध्यापन शास्त्राची परीक्षा द्यावी लागते ती त्यांनी दिली.

त्यांना मुलांमध्यें मिसळण्याची, त्यांच्याबरोबर क्रिकेट, हॉकी वगैरे खेळ-ण्याची हौस होते. त्यामुळें ते लौकरच विद्यार्थीप्रिय झाले. मुलांमध्यें शिक्षकानें मिसळून वागणें त्यावेळच्या अधिकारी वर्गाला आवडत नसे. बाबासाहेब आंबेडकर हे त्यावेळचे त्यांचे एक विद्यार्थी. त्यावेळची एक हृदयंगम आठवण डॉक्टर आंबेडकर यांनीं श्री दोंदे यांना सांगितली. व ती आठवण श्री. दोंदे यांनीं जून १९५५ मध्यें भरलेल्या मुंबई महापालिकेच्या सभेंत सांगितली. ती आठवण अशी—

" डॉ. आंबेडकर हे शाळकरी विद्यार्थी असतांना दुसऱ्या विद्यार्थ्यांत शिवाशिवीचें बंड फार होतें. आंबेडकरांना पहिल्या बांकावरसुद्धां बसूं दिलें

जात नसे. त्यांना अगदीं मागल्या बांकावर बसावें लागे. मास्तर म्हणून त्या वर्गावर आलेल्या ना. म. जोश्यांना हा अन्याय सहन करवला नाहीं. त्यांनी विद्यार्थी आंबेडकराला पहिल्या बांकावर बसण्याची मोकळीक दिली.

एकदां काय झालें, मास्तर ना. म. जोश्यांनीं आंबेडकरास फळ्यापाशीं बोलावलें. आंबेडकर पुढें आले व फळ्याला ते स्पर्श करणार तोंच वर्गांतल्या सगळ्या मुलांनीं एकच गिल्ला केला, "अरे, अरे फळ्याला शिवूं नको!" त्या फळ्याच्या मागें मुलांचे फराळाचे डबे होते म्हणून हा गिल्ला होता. जोशी मास्तरनीं ह्या ओरडण्यास भीक घातली नाहीं व त्यांच्या सूचनेप्रमाणें विद्यार्थी आंबेडकरानें फळ्याला शिवून त्यावर कांहीं लिहिलें. ना. म. जोशी वारल्या-नंतर अलिकडेच आपल्या विद्यार्थी दशेंतील जोशी मास्तरांची ही आठवण डॉ. आंबेडकरांनीं श्री. दोंदे यांना सांगितली होती. मुंबईहून नानांची बदली रत्नागिरीच्या हायस्कुलांत झाली. तेथेंहि ते मुलांमध्यें मिसळत. त्यांच्याबरोबर क्रिकेट, फुटबॉल वगैरे खेळ खेळत. त्यांच्या लायब्ररीचीही त्यांनीं चांगली सोय केली होती. या सर्व कारणामुळें ते विद्यार्थ्यांमध्यें फार प्रिय होते. रत्नागिरीच्या कलेक्टरला नानांचा संशय येई. हा शिक्षक विद्यार्थ्यांना भलतेंच वळण लावतो असें त्यास वाटे.

याच सुमारास नानांचे धाकटे बंधू वामनराव यांच्यावर राजद्रोहाचा खटला कोल्हापूर येथें भरण्यांत आला होता. त्याकरितां त्यांना मधून मधून रत्नागिरी-हून कोल्हापुरास जावें लागे. शिक्षण खात्यांतीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांना नानांची व त्यांचे थोरले बंधू माधवराव यांची चांगली माहिती असल्यानें नानांना रजा वगैरे मिळण्यास अडचण पडत नसे.

१९०८ मधील लोकमान्य टिळकांच्यावरील राजद्रोहाच्या खटल्यांत त्यांना सहा वर्षांची सजा झाली. त्यावेळीं इतर ठिकाणाप्रमाणेंच रत्नागिरीच्या हायस्कूलां-तील विद्यार्थ्यांनीं स्वयंस्फूर्तीनें हरताळ पाडला. श्री. जोशी यांनी विद्यार्थ्यांस हरताळ पाडावयास चिथवलें असलें पाहिजे अशी कलेक्टरला शंका आली. त्यांनीं वरिष्ठ अधिकाऱ्याकडे तक्रार केली पण तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

नानांची मतें पहिल्यापासून आगरकरांच्या बाजूचीं होतीं, ते आगरकर पंथीय होते. गोखले पंथाचें त्यांना आकर्षण होतें. तेव्हां त्यांचेकडे

" ज्ञानप्रकाश " येत असे. एक दिवस त्यांनीं ज्ञानप्रकाशांत वाचलें कीं देशाचें काम करण्यासाठीं गोखल्यांना भारत सेवक समाजांत माणसें पाहिजेत. त्यांनी मनांत विचार केला, " आपण गोखल्यांना मानतों, मग त्यांना जर कामासाठीं माणसें पाहिजेत तर ती आपली जबाबदारी आहे."

वास्तविक शिक्षकाचा पेशा त्यांना आवडत होता. त्यांच्या मनांत त्याबाबतींत असंतोष नव्हता. पण ना. गोखल्यांचे विषयीं त्यांना नितांत आदर वाटे. त्यामुळें त्यांच्या हाकेला " ओ " देणें आपलें कर्तव्य आहे असें त्यांना वाटूं लागलें.

नाना शिक्षक होते. अगदीं ट्रेन्ड शिक्षक होते. पण तोंडानें नुसतें शिकविण्यापेक्षां हातानें काम करण्याची जास्त आवड म्हणून नाना शिक्षण खात्यांत न रहातां नामदार गोखल्यानीं पुणें येथें काढलेल्या भारतसेवक समाजास १९०९ सालीं जाऊन मिळाले व तेथें त्यांनी स्वतःला मजूर संघटनेच्या कामीं वाहून घेतलें. अशारीतीनें १९०१ ते १९०८ पर्यंतचा अनिश्चततेचा काळ संपून त्यांच्या आयुष्याला दिशा लागली. त्यांच्या आयुष्याचें ध्येय ठरलें. त्यांनीं आपल्या भावी आयुष्यांत जें भव्य यश संपादन केलें त्याचें श्रेय या ध्येयनिश्चितीला व तें ध्येय प्राप्त करून घेण्याकरतां त्यांनीं जे अविरत परिश्रम केले व चिकाटी दाखविली त्यांना दिलें पाहिजे.

मजूर संघटना हें जरी त्यांच्या आयुष्याचें मुख्य ध्येय असलें तरी तिला आनुषंगिक व उपकारक अशा अनेक चळवळींमध्यें भाग घेऊन त्यांनीं भारताची सेवा केली.

भारत सेवक समाजातर्फे तेव्हां ज्ञानप्रकाश निघत असे. त्याच्या व्यवस्थापक विभागांत ते काम करूं लागले. कांहीं काळ ते संपादकीय कामही करीत असत व बातम्यांचीं भाषांतरें वगैरे करीत असत.

त्यावेळीं श्री. गोपाळ कृष्ण देवधर हे उत्कृष्ट संघटक होते. चांगले मिशनरी होते. नवीन माणसें जोडण्यांत त्यांचा हातखंडा होता. दीनदलितांविषयीं त्यांना अत्यंत कळवळा होता. सेवासदनाचें काम ते करीत. त्यांनीं सहकारी चळवळीचें कामही पुण्याच्या आसपास सुरू केलें होतें. ते नानांनाही बरोबर घेऊन जात. त्यांच्यामुळें नानांचा खेड्याच्या जनतेशीं संबंध येऊं लागला.

सहकारी चळवळीची त्यांना माहिती झाली. व्यक्तिस्वातंत्र्याची हानि न करतां सहकारी चळवळीमुळें आर्थिक दारिद्य व विषमता दूर होऊं शकेल अशी श्रद्धा त्यांच्या ठिकाणीं निर्माण झाली. त्यांना शेवटपर्यंत सहकारी चळवळीचें महत्त्व फार वाटे. ते स्वतःला लोकशाही समाजवादी समजत. ते समाजवादी पक्षाचे सभासद नव्हते.

त्यांचा समाजवाद आर्थिक सामाजिक समानता आणण्याच्या प्रयत्नामध्यें समाजाचें महत्त्व फार मानून व्यक्तीला तुच्छ लेखणारा नाहीं. म्हणून त्यांना सहकारी चळवळीचें महत्त्व फार वाटतें. देवधरांमुळें त्यांचा सहकारी चळवळीशीं संबंध आला. खेडोपाडीच्या जनतेचें जीवन त्यांनीं पाहिलें. व्यवस्थापकीय काम ते पहात असल्यामुळें छापखान्यांतील मजुरांशीं त्यांचा संबंध येत असे. सहकारी चळवळीचा त्यावेळीं त्यांच्यावर इतका परिणाम झाला होता कीं छापखान्यांतल्या मजुरांचीही एक सहकारी संस्था त्यांनीं काढली.

१९११ सालीं ज्ञानप्रकाशची मुंबई आवृत्ति काढावयाचें ठरलें त्यावेळीं भारतसेवक समाजानें मुंबई वैभव छापखाना घेतला. मुंबईतील ज्ञानप्रकाशाच्या आवृत्तिची व्यवस्था पाहाण्याकरतां नाना जे मुंबइस आले ते शेवटपर्यंत मुंबईसच राहिले.

## चरित्राची रूपरेषा.

१९०१ सालीं बी. ए. ची परीक्षा पास होईपर्यंत किंबहुना १९०९ सालीं सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीचे सभासद होईपर्यंत नानांच्या आयुष्याची दिशा किंवा ध्येय ठरलेलें नव्हतें. पुढील आयुष्यामध्यें ज्या निरनिराळ्या कार्यक्षेत्रांमध्यें त्यांनीं काम केलें त्याची पूर्वतयारी मात्र या कालखंडामध्यें घडून आली आणि तिचा त्यांना भावी आयुष्यामध्यें फार उपयोग झाला.

नानांच्या जीवनाला एका मोठ्या वटवृक्षाची उपमा देतां येईल. या वृक्षाला छोट्यामोठ्या पुष्कळ फांद्या आहेत. त्या वृक्षाचा विस्तारहि अफाट आहे. या वृक्षाच्या सावलींत पुष्कळ संत्रस्त जीव विश्रांति घेत असलेले आढळून येतील. नानांच्या कार्यांत क्रांति नाहीं, उत्क्रांति आहे. ते सत्वगुणी असून सत्याकरतां आग्रह धरणारे नसून तडजोड करणारे होते, म्हणून त्यांच्या जीवनांत झगडे, लढे फारसे आढळून येत नाहींत. रजोगुणी माणसें सत्याकरतां आग्रह धरला कीं क्रांतिकारक बनतात.. मग ती क्रांति हिंसात्मक असो किंवा अहिंसात्मक असो. हल्लींच्या पुष्कळश्या पुढाऱ्यांतील विशेष गुण म्हणजे त्यांचा तुरुंगवास. त्यामुळें अशा माणसाचें चरित्र साधारण माणसाला नेत्रदीपक वाटतें. नानांना तुरुंगवास कधींच घडला नाहीं व तो घडणें शक्यच नव्हतें. कारण ते नामदार गोखले यांचे अनुयायी होते. त्यांच्या कार्यपद्धतीवर त्यांची नितांत श्रद्धा होती. ती पद्धति म्हणजे सनदशीरपणानें कार्य करणें. या पद्धतीवर पूर्वीं लोकांनीं टीका केलेली आहे. हल्लीं लोक टीका करीत आहेत व पुढेंही करीत राहतील.

लोकमान्य टिळकांची पद्धति प्रतियोगी सहकारितेची. ते सरकारला विरोध करीत पण कायदेशीरपणानें. सरकारला हा विरोध सहन झाला नाहीं म्हणजे तें विरोधकांना शासन करी. एक गोष्ट मात्र ध्यानांत ठेविली पाहिजे कीं लोकमान्यांनीं लोकांना कायदा मोडण्यास कधींहि सांगितलें नाहीं.

महात्मा गांधींची कार्यपद्धति अहिंसात्मक सविनय कायदेभंगाची. मिठाचा कायदा मोडला हें त्याचे मोठें उदाहरण. कायदा अन्याय्य असल्यास तो मोडण्यास हरकत नाहीं, मात्र तो अहिंसात्मकपणानें व सविनयानें मोडावा ही

त्यांची शिकवण. या शिकवणीला असंख्य अनुयायी मिळाले व परिणाम नेत्रदीपक झाले. या पद्धतीपासून लोक कायदा मोडण्यास शिकले. शिस्त सुटली. अहिंसेचें व विनयाचें पथ्य सुटलें. इंग्रजांच्या विरुद्ध हें सत्याग्रहाचें शस्त्र हल्लींच्या राज्यकर्त्यांना त्यावेळीं फार आवडलें. आतां त्यांना ते मानवत नाहीं व सहनही होत नाही. परंतु कायदे मोडण्याच्या शिकवणुकीनें जो शिस्तीचा अभाव फैलावला त्यानें मात्र आतां सर्वांनाच अस्वस्थ करून टाकलें आहे.

नामदार गोखले व त्यांचे अनुयायी यांनीं केलेलें कार्य इतरांनीं केलेल्या कार्यापेक्षां कमी व्यापक आहे असें नाहीं.

**परदेशांतील कामगिरी :**—नानांना परदेशांत जाण्याचा पहिला प्रसंग पहिलें महायुद्ध चालू असतांना १९१७ त आला. त्यावेळीं हिंदुस्थानांतून कांहीं वर्तमानपत्रांचे प्रतिनिधि मेसापोटेमियामधील हिंदी सैनिकांची व्यवस्था प्रत्यक्ष पहाण्यासाठीं हिंदुस्थानसरकारनें पाठविले होते. त्यांत मराठी पत्रांच्या वतीनें म्हणून नानांची नेमणूक करण्यांत आली होती. त्यानंतर महायुद्ध समाप्त झाल्यावर राष्ट्रसंघाची स्थापना करण्यांत आली आणि राष्ट्रसंघाची एक शाखा म्हणून आंतरराष्ट्रीय कामगार संस्था स्थापण्यांत आली. त्या संस्थेच्या तर्फे सालोसाल परिषद भरविण्यांत येते. पहिली परिषद वॉशिंग्टन येथें १९१९ मध्यें भरली. तिच्यावर हिंदी कामगारांचे प्रतिनिधि म्हणून नानांची योजना करण्यांत आली. अशा कित्येक परिषदांमधून नानांनीं काम केलें असून गेलीं कांहीं वर्षें आंतरराष्ट्रीय कामगार संस्थेच्या नियामक मंडळाचे ( गव्हर्निंग बॉडीचे ) सभासद म्हणून ते काम करीत होते. हा मान मिळविणारे नाना हे पहिलेच हिंदी गृहस्थ होत. त्यांचा इंग्लडांतील व यूरोप अमेरिकेंतील मोठमोठ्या कामगार पुढाऱ्यांशीं चांगला परिचय होता. त्यांच्या संबंधानें सर्वांना आदरबुद्धि होती. नाना कम्युनिस्ट नव्हते; तथापि रशियामध्येंहि एक प्रामाणिक, निःस्वार्थी हिंदी कामगार पुढारी म्हणून त्यांची प्रसिद्धि आहे.

पुढच्या प्रकरणापासून विविध कार्यक्षेत्रांतील नानांच्या कामगिरीचें तपशील वार वर्णन केलेलें आढळेल.

५

# नानांची कामगिरी.

(१) सोशल सर्व्हिस लीग, (२) बॉम्बे प्रेसिडेन्सी सोशल रिफॉर्म असोशिएशन, (३) सिव्हिल लिबर्टीज यूनियन, (४) ऑल इंडिया ट्रेड यूनियन कॉंग्रेस, (५) नॅशनल फेडरेशन ऑफ लेबर, व (६) बॉम्बे म्युनिसिपल कॉर्पोरेशन.

**सोशल सर्व्हिस लीग :–** नाना सोसायटीमध्यें दाखल होण्यापूर्वीं थोडीच वर्षें श्री. नटेशराव द्रवीड व गोपाळराव देवधर यांनीं सोसायटीच्या वतीनें मुंबई शहरामध्यें कार्य करण्यास सुरवात केली होती. द्रवीड हे मुंबईच्या 'कामगार हित वर्धक' सभेच्या कार्यकर्त्यांपैकीं एक असून, होलिका संमेलनाची चळवळ देवधरांनीं हातीं घेतली होती. या होलिका संमेलनाच्या चळवळीमधूनच सध्याच्या सोशल सर्व्हिस लीगचा जन्म झाला. नाना हे लीगच्या पहिल्या वर्षींच त्या संस्थेचे एक सेक्रेटरी म्हणून नेमले गेले आणि मुख्यतः त्यांच्या श्रमामुळेंच ही संस्था इतक्या नांवारूपाला आली. लीगचें काम हातीं घेतल्यावर त्यांनीं पाश्चात्य देशांतल्या वेगवेगळया प्रकारच्या समाज सेवा संस्थांची माहिती मिळविली आणि इकडील परिस्थितीला अनुसरून त्यांनीं वेगवेगळीं कामें चालू केलीं. हा पसारा दिवसेंदिवस वाढत गेला. कामाचें क्षेत्र पांढरपेशा वर्गापुरतेंच मर्यादित न रहातां कामगार वस्तीपर्यंत वाढत गेलें. लीगचीं कामें ताडदेव, भायखळा, परळ या भागांतल्या गिरणी कामगारांच्या व इतर कामगारांच्या वस्तीमध्यें चालू झालीं. आत्मारामपंत वाघ, त्रिंबक आप्पाजी कुळकर्णी इत्यादि त्यांचे सहकारी होते. त्यानंतर लीगच्या वतीनें करीमभाई इब्राहिम अँड सन्स व टाटा सन्स यांच्या गिरण्यांमधील गिरण्यांच्या सुखसोयीसाठीं निरनिराळीं कामें करण्याचें नानांनीं अंगावर घेतल आणि त्या कामाचा खर्च देण्याचें त्या त्या गिरण्यांच्या मालकांनीं कबूल केलें. अर्ध्या पासाच्या (अल्पवयी) कामगारांसाठीं दिवसाच्या शाळा, प्रौढवयस्कांकरतां रात्रीच्या शाळा, सहकारी पतपेढ्या, सहकारी भांडारें, गिरण्यांच्या मालकीच्या चाळींची व्यवस्था, स्वस्त धान्याचीं

व कापडाचीं दुकानें, मद्यपान निषेधाची चळवळ, स्वस्त व चांगला माल पुरवणारी चहाची व फराळाचीं दुकानें, औषधपाण्याची व डॉक्टरी तपासणीची सोय, वाचनालयें व पुस्तकालयें, मॅजिक लँटर्नच्या साहाय्यानें निरनिराळ्या उपयुक्त विषयांची माहिती, गिरण्यांत कामावर येणाऱ्या लेकुरवाळ्या स्त्रियांची तान्हीं मुलें संभाळण्याचीं गृहें, आजारीपणांत पैशाची मदत करणारा फंड, प्रॉव्हिडंट फंड इत्यादि सोयी सदरील गिरण्यांमध्यें करण्याचा उपक्रम नानांच्या कल्पनेमुळें झाला. त्यांतील कित्येक कल्पना अगदीं नवीन होत्या. इंग्लंडांतल्या वर्क्स कमिटीच्या धर्तीवर मालकांचे व कामगारांचे प्रतिनिधि एकत्र जमून कामगारांच्या अडचणींचा व तक्रारींचा विचार करणाऱ्या संस्थाहि सदरील गिरण्यांमध्यें स्थापित झाल्या होत्या. कारखान्यांतील कामगारांच्या सुखसोयीकरतां मालकांनीं करावयाचीं कामें कोणत्या धर्तीवर व्हावीं, आणि तीं कोणतीं असावीं याचा विचार करण्याकरतां निरनिराळ्या प्रांतांतील समाजसेवक व कारखानदारांचे प्रतिनिधि, त्याचप्रमाणें सरकारी अधिकारी यांची एक परिषद, १९२२ सालीं नानांच्या प्रयत्नामुळेंच भरली. या सर्व प्रयत्नामुळें हिंदी कामगारांच्या स्थितीकडे, सुशिक्षित समाजाचें लक्ष वेधलें. कामकरी स्त्रियांना बाळंतपणाच्या मुदतींत घरबसल्या पगार देण्याची व्यवस्था पहिल्यानें नानांच्या सूचनेवरूनच खाजगी रीतीनें करीमभाई व टाटा यांच्या गिरण्यामध्यें सुरू झाली आणि पुढें मुंबईच्या कायदेमंडळांत त्या संबंधीचा कायदा पसार होऊन सर्व मालकांना तशी व्यवस्था करणें भाग पडलें. हीं कामें चालू असतांना कामगारांच्या स्वतंत्र चळवळींचाही उपक्रम त्यांनीं केला होता, आणि पुढें त्यांनीं स्वतंत्र चळवळीकडेच सर्व लक्ष दिलें. कामगारांची संघटना करण्याचें काम हातीं घेऊन देशांतील कामगार पुढाऱ्यांमध्यें त्यांनीं अग्रस्थान मिळवलें.

वरील सोशल सर्व्हिस लीगची स्थापना १९११ सालीं झाली. (१) सर नारायण गणेश चंदावरकर ( २ ) श्री. बी. एन्. मोतीवाला ( ३ ) श्री. ना. म. जोशी ( ४ ) प्रिं. टी. ए. कुळकर्णी व ( ५ ) श्री. बी. एन्. भाजेकर हे या संस्थेचे आधारस्तंभ होत.

या संस्थेच्या रौप्यमहोत्सवाच्या ( १९११–१९३५ ) च्या अहवालांत पान २ वर खालील उल्लेख आढळतो.

" In this report we will be doing mere justice if we mention that the credit of the work of the League must be given to the gentlemen named above."

हल्लीं समाजसेवासंघाचें काम खालील केंद्रांतून चालतें. यावरून आज संघाच्या कामाचा व्याप किती वाढला आहे याची कल्पना येईल.

१ हेड् ऑफिस, सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीज् होम, मुंबईः ४
२ चिंचपोकळी केन्द्र, ८१ परळ रोड, चिंचपोकळी, मुंबई.
३ मदनपुरा केन्द्र, याकुब बिल्डिंग, महॉमेडनस्ट्रीट, भायखळा, मुंबईः ८
४ वर्किंग मेन्स इन्स्टिटयूट, एल्फिन्स्टन रोड, पोयबावडी, परळ, मुंबईः१२
५ विलेपार्ले केन्द्र, डॉ. काम्बळींचा बंगला, विलेपार्ले, मुंबई : २४
६ दादर केंद्र, श्रीमती सुंदराबाई धुरु बिल्डिंग, गोखले रोड, दादर मुंबईः २८
७ इमामवाडा केन्द्र, इमामवाडा उर्दू म्यु. शाळा, इमामवाडा, मुंबई
८ माटुंगा केंद्र, जव्हेरबाई हॉल, वडाळा, माटुंगा, मुंबई.

## वरील केन्द्रामार्फत चालविण्यांत येणारीं कार्यें.

**१ हेड ऑफिस :** सामाजिक विषयावरील ग्रंथसंग्रहालय—समाजसेवा-प्रचार व्याख्यानद्वारा—व्हॉलंटरी सोशल वर्कर्स ट्रेनिंग क्लास—महिला समाज शिक्षण वर्ग—सोशल सर्व्हिस क्वार्टर्ली—फ्लॉरेन्स नाइटिंगेल ग्राम आरोग्य फंडाची व्यवस्था—स्त्रियांकरतां औद्योगिक शाळा.

**२ चिंचपोकळी केंद्र :** मोफत वाचनालय आणि ग्रंथसंग्रहालय, सार्वजनिक व्याख्यानें.

**३ मदनपुरा केंद्र :** मोफत वाचनालय व उर्दू ग्रन्थसंग्रहालय–मोफत होमिओ–पाथिक दवाखाना, डोळ्यांच्या रोगांची मोफत व्यवस्था.

**४ वर्किंग मेन्स इन्स्टिटयूट केंद्र :** टेक्स्टाईल टेक्निकल स्कूल—नाइट हायस्कूल—पुरुष, स्त्रिया व मुलें यांच्याकरतां मोफत आयुर्वेदिक दवाखाना—स्त्रिया व मुलें यांच्याकरतां मोफत अलोपाथिक दवाखाना—स्त्रियांकरतां औद्योगिक शाळा—कामगारांकरतां व मुलांकरतां व्यायाम शाळा, नाटकें, गाण्याचे जलसे व विविध कार्यक्रम यांच्या द्वारा कामगार वर्गाकरितां उपयुक्त करमणुकीची व्यवस्था.

५ **विलेपार्ले केंद्र :** स्त्रियांकरतां औद्योगिक शाळा.

६ **दादर केंद्र :** स्त्रियांकरतां औद्योगिक शाळा—स्त्रियांकरतां वाचनालय व ग्रन्थसंग्रहालय—महिला समाज शिक्षण वर्ग.

७ **इमामवाडा केंद्र :** स्त्रियांकरतां औद्योगिक शाळा.

८ **माटुंगा केंद्र :** स्त्रियांकरतां औद्योगिक शाळा.

सुरवातीपासून म्हणजे सन १९११ पासून १९५३ पर्यंत नाना सो. स. लीगचे जनरल सेक्रेटरी होते. १९५३ पासून ते उपाध्यक्ष होते.

परळचे शेट दामोदर ठाकरसी हॉल व शेट मफतलाल गगलभाई टेक्स्टाईल ट्रेनिंग स्कूल हीं नानांची चिरंतन स्मारकें आहेत असें समजण्यास हरकत नाहीं.

**(२) बॉम्बे प्रेसिडेन्सी सोशल रिफॉर्म असोसिएशन :** समाज सेवेची कामें चालू असतांना समाज सुधारणेच्या चळवळीकडे नानांनीं दुर्लक्ष केलें नाहीं. मुंबईतील बॉम्बे सोशल रिफॉर्म असोशिएनशमध्यें त्यांनीं धडाडीनें भाग घेतला व त्यामुळें त्या संस्थेमध्यें बराच जिवंतपणा आला. वसु बिलाच्या चळवळीमध्येंहि तीव्र मतभेद झाला होता. नाना हे त्या बिलाचे कट्टे पुरस्कर्ते होते. त्यांनीं सुशिक्षित तरुणांची मतें आपल्या पक्षाकडे वळवून बिलाच्या विरोधकांशीं जोरानें सामना दिला. विधवाविवाहाच्या चळवळींत कै. आत्मारामपंत वाघ यांना त्यांचा मोठा पाठिंबा असे. अस्पृश्य मानलेल्या वर्गाच्या वसतींत त्यांनीं अनेक कामें केलीं. मुंबईला जातिविध्वंसनाची चळवळ जोरानें चालू झाली. ती आर्यन ब्रदरहुडच्या परिषदा आणि त्या परिषदांच्या वतीनें झालेलीं सहभोजनें यांच्या योगानेंच होय. परलोकवासी 'बगुभाई' ऊर्फ किसनलाल दप्तरी सॉलिसिटर यांनीं या चळवळींत पुढाकार घेतला होता आणि सर नारायण गणेश चंदावरकर, सर गोकुळदास पारख, श्री. दामोदर गणेश पाध्ये इत्यादि पुढारी मंडळीचा त्यांना या कामीं पाठिंबा होता. या चळवळींत तरुण पिढी व शिक्षणांत मागासलेले वर्ग यांना एकत्र आणण्याचें काम नाना आणि त्यांचे वाघ, कुळकर्णी प्रभृति सहकारी यांनीं केलें.

**(३) सिव्हिल लिबर्टीज यूनियन :** भारतांतील नागरिक स्वातंत्र्यावर गेलीं कित्येक वर्षे अनेक बंधनें आहेत. ब्रिटिशांच्या राजवटींत येथील स्वातंत्र्य

प्रेम दडपून टाकण्यासाठीं सरकारनें अनेक वट हुकूम व काळे कायदे करून नागरिक जीवन विकसूं न देण्याचें कंकणच हातीं बांधलें होतें. देशांतील नागरिक स्वातंत्र्याचें संरक्षण करण्याचें कार्य सिव्हिल लिबर्टीज यूनियनतर्फे करण्यांत येत आहे. १९३६ सालीं पं. जवाहरलाल नेहरूंशीं नागरिक स्वातंत्र्य रक्षणाच्या बाबतींत ना. म. जोशी यांनीं सहकार्य केलें. स्वातंत्र्योत्तर काळांत व विशेषतः लोकसत्ताक भारताच्या घोषणेनंतर नागरिक स्वातंत्र्यावरील सर्व बंधनें रद्द होतील अशी अपेक्षा होती, परंतु ह्या स्वातंत्र्याच्या काळांतहि नागरिक स्वातंत्र्याचा अनेक बंधनांमुळें संकोच होत आहे. गेलें दशकभर नागरिक स्वातंत्र्याकरतां झगडणारी कॉंग्रेस आज सत्ताधारी बनली आहे. कॉंग्रेस सरकारनीं नागरिक स्वातंत्र्यावर घातलेल्या बंधनाविरुद्ध आपला निर्भय आवाज उठविण्याचें व लोकशाही अधिकाराचें डोळयांत तेल घालून रक्षण करण्याचें कार्य करतांना कोणी दिसत नाहीं. परंतु या काळांत व या वयांत ना. म. जोशी नागरिक स्वातंत्र्याची आस्थापूर्वक जपणूक करीत होते. ते त्यांच्या निधनापर्यंत मुंबई प्रांतिक सिव्हिल लिबर्टिज .यूनियनचे अध्यक्ष होते व मुंबई प्रांतांत नागरिक स्वातंत्र्यावर आलेलीं सर्व बंधनें नाहींशीं व्हावींत म्हणून त्यांनीं प्रयत्न केले आहेत.

**( ४ ) ऑल इंडिया ट्रेड यूनियन कॉंग्रेस :**—नानाचें नांव या देशांतील कामगार चळवळीच्या इतिहासांत प्रामुख्यानें निगडीत झालेलें आहे. कामगारांची संघटना करण्यांत पुढाकार घेतल्यामुळें त्यांना आपल्या अनेक सधन मित्रांचा व एकंदरींत धनिक वर्गाचा रोष पत्करण्याचा प्रसंग आला; परंतु त्यांत त्यांनीं माघार घेतली नाहीं. मुंबईमध्यें जे अनेक लहान मोठे संप झाले, त्यांतील बहुतेक संपामध्यें नानांनीं कामगारांच्या वतीनें प्रमुखपणें भाग घेतला. कामगारांच्या मागण्या काय आहेत तें समजाऊन घेऊन त्या व्यवस्थित स्वरूपांत मालकांपुढें मांडणें, संपकमिटी स्थापणें, जरूर तेव्हां मालकांशीं तडजोडीचें बोलणें लावणें, त्याचप्रमाणें संप लांबल्यावर कामगार व त्यांचीं बायकामुलें यांची उपासमार होऊं लागली म्हणजे त्यांना डाळतांदूळ पुरविणें वगैरे कामें नानांच्या नेतृत्वाखालींच १९२९ सालापर्यंत होत असत. पुढें कम्युनिस्टांचा कामगार चळवळींत प्रवेश होऊन त्यांनीं कामगारांचा बुद्धिभेद करण्यास आणि

कामगारांमध्यें वेगवेगळे तट पाडण्यास सुरवात केली तरी सुद्धां कार्याकडे लक्ष पुरवून १९२८ सालच्या मुंबईमधील गिरणी कामगारांच्या सार्वत्रिक संपांत नानांनीं कम्युनिस्टांशीं सहकार्य केलें आणि सहा महिने पर्यंत तो संप लढवून अखेरीस त्यांत यश मिळविलें. या संपाची चौकशी करण्यासाठीं नेमण्यांत आलेल्या फॉसेट कमिटीमध्यें त्यांनीं उत्कृष्ट रीतीनें कामगारांची बाजू मांडली.

कम्युनिस्टांनीं ऑल इंडिया ट्रेड यूनियन कॉंग्रेस काबीज केली तेव्हां नाना व त्यांचे गिरीप्रभृति सहकारी यांनीं (५) **नॅशनल फेडरेशन ऑफ लेबर** ही स्वतंत्र संस्था स्थापली. त्यामुळें हिंदुस्थानांतील संघटित कामगार चळवळ जिवंत राहिली. व्हिटले कमिशन म्हणून प्रसिद्ध असलेल्या कामगार वर्गाच्या स्थितीची चौकशी करण्याकरतां नेमण्यांत आलेल्या रॉयल कमिशनचे नाना हे एक सभासद होते व तेथें त्यांनीं कामगार वर्गाच्या तर्फे उत्तम कामगिरी बजावली.

६ **मुंबई म्युनिसिपल कार्पोरेशन :** नाना १९१९ पासून १९२३ पर्यंत या संस्थेचे सभासद होते. हिंदुस्थानांतून वारंवार परदेशी जावें लागत असल्यामुळें व मध्यवर्ती मंडळावरील नेमणुकीमुळें त्यांना आपलें कार्पोरेशन-मधील काम सातत्यानें करतां आलें नाहीं. ज्या विशेष महत्त्वाच्या गोष्टीकडे त्यांनीं कार्पोरेशनचें लक्ष वेधलें त्या म्हणजे (१) मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा प्रसार, (२) मागासलेल्या व कामगार वर्गाच्या लोकां-करतां रहाण्याचीं घरें (३) गिरणभागांतील लोकांकरतां सुधारलेल्या आरोग्याच्या सोयी, (४) व झाडू व भंगी लोकांना ट्राम गाड्यामध्यें चढण्याची मनाई होती ती दूर करणें ह्या होत.

म्युनिसिपल कायद्यामध्यें स्त्रियांना कार्पोरेशनचे सभासद होण्यास आड-काठी होती. ती दूर करण्याकरतां त्यांनीं ठराव मांडला. तो ठराव पसंत करण्यांत आला आणि तें तत्व नंतर म्युनिसिपल ॲक्टमध्यें स्वीकारलें गेलें.

---

## ६

# आंतरराष्ट्रीय संघटनेतील कार्य.

नानांच्या विविध कार्यापैकीं आय. एल. ओ. मधील काम हा गाभा होय. पहिलें महायुद्ध १९१८ सालीं संपल्यानंतर दोस्तांना जय मिळाला. जर्मनीचा पराभव झाला, तरी जितांइतकेच जेतेही युद्धाला कंटाळले होते. चार वर्षें त्यांनीं अनंत कष्ट आणि हालअपेष्टा सोसल्या होत्या. यामुळें हें युद्ध संपलें कीं पुनः असें युद्ध न होईल अशी कांहींतरी व्यवस्था करावी अशी सर्वांची इच्छा होती. जगांत जर शांतता नांदावी असें वाटत असेल तर कामगारांना न्याय मिळाला पाहिजे असें मजूर पुढाऱ्यांनीं व्हर्साय तहाच्या वेळीं राजकारणी मुत्सद्यांना सांगितलें. ब्रिटिश कामगार चळवळींतील बार्न्स, अमेरिकेंतील कामगार पुढारी गॉपर्स व फ्रान्समधील जुहो यांनीं या बाबत विशेष पुढाकार घेतला. या पुढाकारामुळें मजुरांची स्थिति सुधारण्यासाठीं एखादी आन्तर राष्ट्रीय संस्था काढायला अनुकूल वातावरण निर्माण झालें व लीग ऑफ नेशन्सचा एक भाग म्हणून आय. एल. ओ. ची स्थापना झाली.

या संस्थेचें कार्य १९३९ पर्यंत चालू राहिलें. १९३९ ते १९४५ पर्यंत दुसरें महायुद्ध टिकलें या अवधींत आय. एल. ओ. चें कार्य स्थगित झालें. परंतु ती संस्था नष्ट झाली नाहीं. १९४५ नंतर घटना बदलून तिचें पुनरुज्जीवन झालें. दुसऱ्या महायुद्धानंतर १९४७ सालीं जिनिव्हा येथें भरलेल्या आय. एल. ओ. च्या परिषदेला नाना सरकार नियुक्त कामगार प्रतिनिधि म्हणून हजर राहिल्यानंतर १९४८ सालीं ते आय. एल. ओ.मधून निवृत्त झाले. यावरून एक गोष्ट चटकन लक्षांत येइल कीं त्याचें आय. एल्. ओ.मधील कार्य मुख्यतः दुसऱ्या युद्धाच्या पूर्वीच्या काळांत झालें.

इ. स. १९१९, १९२१, १९२२, १९२५, १९२९, १९३४, १९३५, १९३६, १९३७ व १९४७ इतक्या सालीं भरलेल्या आय. एल. ओ. च्या परिषदांना ते सरकारनियुक्त कामगार प्रतिनिधि म्हणून हजर राहिले.

१९२२-१९३४ पर्यंत ते आय. एल. ओच्या गव्हर्निंग कौन्सिलचे डेप्युटी मेंबर निवडले गेले.

१९३४–१९४४ पर्यंत ते आय. एल. ओच्या गव्हर्निंग कौन्सिलवर पूर्ण मेंबर निवडले गेले.

१९५१मध्यें कराची येथें त्यानीं First Asian Regional Conference held under the auspices of the International confederation of the Trade Unions ह्या परिषदेचें अध्यक्षस्थान स्वीकारलें.

या तारखा तपशीलानीं देण्याचा हेतु असा कीं त्यांचा कामाचा व्याप केवढा होता याची बरोबर कल्पना यावी. ते जर सरकारी अधिकारी असते तर त्यांचा बोलबाला झाला त्यापेक्षां जास्त झाला असता. ते लिबरल होते, गोखल्यांचे अनुयायी होते व प्रसिद्धीविन्मुख होते म्हणूनच त्यांनीं प्रसिद्धीची कधींच पर्वा केली नाहीं. आय. एल. ओ खेरीज मध्यवर्ती कायदे मंडळ, सोशल सर्व्हिस लीग, कामगार संघटना वगैरे अनेक संस्थांतील कामांची जबाबदारी त्यांच्यावर होतीच.या सगळ्यांचा परिणाम असा झाला कीं अलिकडे चार पांच वर्षें त्यांचें शरीर साफ पोखरलेलें होतें.

१९१९ सालीं नानांची सरकारनें कामगार प्रतिनिधी म्हणून जी निवड केली तो प्रसंग मोठा मजेशीर आहे. आय. एल. ओ. वर सरकारचे दोन प्रतिनिधि, कारखानदारांनीं निवडलेला एक प्रतिनिधि, व कामगारांनीं निवड-लेला एक प्रतिनिधि असे चार प्रतिनिधि आय. एल. ओ. च्या परिषदेला पाठवावयाचे असतात. कारखानदारांच्या प्रतिनिधीला व कामगारांच्या प्रतिनिधीला सरकारची पसंति मिळवावी लागे त्यावेळीं हिंदुस्थानांत कामगार संघटित नसल्याकारणानें व त्यांच्या रजिष्टर्ड संस्था नसल्यामुळें कामगारांचा प्रतिनिधि कसा निवडावयाचा असा मोठा प्रश्न उभा राहिला. मुंबईतील नानांच्या कामाची माहिती कांहीं सरकारी अधिकाऱ्यांना असल्यानें नानांना सरकारनें नेमलें व त्यांनीं जाण्याचें मान्य केलें. १९१९ सालीं ते प्रथम अमेरिकेंत गेले.

आय. एल. ओ वर स्वायत्त ( Self Governing ) राष्ट्रांनाच प्रतिनिधित्व आहे. परंतु आश्चर्याची गोष्ट म्हणजे ( Self Governing ) स्वायत्त देशामध्यें त्यावेळीं हिंदुस्थानची गणना करावयास कोणी विरोध केला नाहीं. त्यावेळीं इंग्रज सरकारनें हिंदुस्थानला पायरीपायरीनें स्वराज्य देण्याचें वचन दिलें होतें

व हिंदुस्थानला आय्. एल. ओ.वर प्रतिनिधित्व मिळाल्यामुळें तें वचन आंतरराष्ट्रीयदृष्ट्या इंग्रजांवर बंधनकारक झालें होतें. अशा रीतीनें आय. एल. ओ. वर हिंदुस्थानला प्रतिनिधित्व मिळालें. राष्ट्रसंघावरही हिंदुस्थानला प्रतिनिधित्व होतें. पण आय्. एल. ओ. खेरीज इतर आंतरराष्ट्रीय समित्यांवर सरकारी प्रतिनिधीच जात असल्याकारणानें ब्रिटिश सरकारच आपल्या पसंतीची माणसें तेथें पाठवी. आय्. एल्. ओ वर सरकारच्या दोन प्रतिनिधींखेरीज एक कारखानदारांचा व एक कामगार संस्थांचा प्रतिनिधि सरकार व त्याच्या प्रत्येकाच्या संघटना या दोघांच्या पसंतीनें घ्यावयाचे असल्यानें आय्. एल. ओवर स्वतंत्र विचाराच्या व्यक्तीही जाऊं शकतात.

कामगारांचा प्रतिनिधि म्हणून नानांची निवड झाली. प्रत्येक प्रतिनिधीला आपल्याबरोबर सल्लागार घेण्याची परवानगी असे. श्री. वाडिया यांनीं नानांचे सल्लागार म्हणून काम करण्याचें कबूल केलें. हे श्री. वाडिया डॉ. ॲनी बेझंट यांच्या थियॉसॉफीच्या संप्रदायांतील एक गृहस्थ होते. ते मजूर चळवळ चालवीत. कामगारांत वर्गजागृति, लढे, व राजकीय कार्य असें कार्य ते करीत.

आन्तराष्ट्रीय परिषदेला नाना प्रथमच गेले होते. त्या परिषदेच्या अंतर्गत वेगवेगळया कमिट्या असत.

युरोपीय कामगार नेत्यांचा एकमेकाशीं परिचय होता, त्यामुळें वेगवेगळया कमिट्यांवर ते सभासद झाले. मागासलेल्या देशांतील कामगारांच्या प्रश्नासंबंधी एक निराळी कमिटी होती. तिच्यावर मात्र नाना होते. आशियायी राष्ट्रांचे फार थोडे प्रतिनिधि होते. हिंदुस्थानशिवाय फक्त जपानचे प्रतिनिधि त्यावेळीं हजर होते.

आय. एल. ओ तर्फे तीन प्रकारचे ठराव होत. ( १ ) कन्व्हेंशन्स–आदेशवजा ठराव. हे ठराव प्रतिनिधींनीं जरी परिषदेंत मान्य केले तरी त्यांना मागून त्या त्या देशाच्या कायदेमंडळाची संमति मिळून मगच ते बंधनकारक होतात. ( २ ) रेकमेंडेशन्स म्हणचे शिफारसी, हे ठराव अमलांत आणण्याची सूचना आय. एल. ओ. करते. त्याची शब्दशः अंमलबजावणी केली जावी अशी अपेक्षा नसते, पण त्यामधील भाव ओळखून देशांनीं कांहींतरी पावलें टाकलीं म्हणजे

पुरें असतें. तिसरा प्रकार म्हणजे रेझोल्युशन्स किंवा साधे ठराव. हे निव्वळ शिफारसवजा असतात. कन्व्हेन्शन्स व रेकमेंडेशन्सना ⅔ मतें मिळावीं लागतात. रेझोल्युशन्स बहुमतानें पास केले जातात. त्यावेळीं मागासलेल्या देशांना ठरावांत सवलती देत असत.

पहिल्या अधिवेशनांत आठवड्याचे कामाचे तास व कारखान्यांत काम करणाऱ्यांसाठीं किमान वयोमर्यादा ठरविणें या बाबींवर चर्चा झाली. ब्रिटिश ट्रेड युनियन्सचे प्रतिनिधि हे सरकारी प्रवक्ते नसल्यानें ब्रिटिश सरकारच्या प्रतिनिधींना विरोधी अशी वृत्ति कांहीं बाबतींत त्यांनीं दाखविली. पण औद्योगिक कामगार म्हणून काम करण्यासाठीं किमान मर्यादा काय असावी या बाबतींत मतभेद झाले. सर्व देशांत ही किमान वयोमर्यादा १४ वर्षाची ठरविण्यांत आली, पण भारतीय सरकारी प्रतिनिधीनें ही मर्यादा भारतापुरती १० वर्षांची असावी असें सुचविलें. ब्रिटिश ट्रेड यूनियन्सच्या प्रतिनिधींनीं त्याला विरोध केला. त्यानीं ही वयोमर्यादा १२ वर्षांची असावी असें सुचविलें. नानांनीं या सूचनेला पाठिंबा दिला. पुढारलेल्या देशांतील कामगारांचे जास्तींत जास्त कामाचे तास आठवड्याला ४८ ठरविण्यांत आले. हिंदुस्थानांतील कामगारांकरतां ६० ठरविण्यांत आले. आय. एल्. ओच्या घटनेमध्येंच देशाचा औद्योगिक विकास, नैसर्गिक परिस्थिति या गोष्टी लक्षांत घेऊन स्थानिक विवेक करण्याची मुभा ठेवली आहे.

अमेरिकेमध्यें नानांना श्री. लाला लजपतराय, डॉ. हर्डीकर ही मंडळी भेटली. त्याच वेळीं मिस स्मेड्ली नांवाच्या एका क्रांतिकारक बाईशीं नानांची ओळख झाली. ह्या बाईनें पुढें वीरेंद्र चट्टोपाध्याय यांच्याशीं जर्मनींत लग्न केलें. चीनमध्येंही तिनें बरेंच काम केलें.

कामगार परिषदेचें कार्य संपल्यावर एक महिना नानांनीं अमेरिकेंत प्रवास केला. त्यांनीं तीन प्रकारच्या संस्था पाहिल्या. ( १ ) मुंबईतील सोशल सर्विस लीगचें काम ते करीत असल्यामुळें त्यांनी अमेरिकेंतील समाज सेवा करणाऱ्या संस्था पाहिल्या. कांहीं ठिकाणीं ते हॉटेलांतून न उतरतां तेथील समाजसेवा करणाऱ्या संस्थानीं चालविलेल्या सेटलमेंटस्‌मध्यें जाऊन राहिले. शिकागोमधील "हल हाऊस" मध्यें राहून तेथील कामाचें त्यांनीं जवळून निरीक्षण केलें. ( २ )

भारतीय कामगारांचे प्रतिनिधि म्हणून ते तेथें गेले होते. त्यामुळें त्यांनीं सर्व कामगार चळवळी पाहिल्या. कांहीं ठिकाणीं डॉ. हर्डीकर यांच्या ओळखीचा उपयोग झाला. अमेरिकन सरकारतर्फे ओळखपत्रें मिळून तेथें चाललेलें कामगार कल्याणकार्य त्यांनीं पाहिलें. अशा प्रकारें सरकारी व बिनसरकारी ओळखीमुळें कामगार क्षेत्रांत जें वेगवेगळ्या प्रकारचें कार्य चालत होतें तें त्यांना पहातां आलें. ( ३ ) कामगारजीवन हें उद्योग धंद्यांवर फार अवलंबून असल्यानें वेगवेगळ्या मोठ्या धंद्यांचे कारखाने त्यांनीं पाहिले. कामगार जीवनाशीं संबंध असलेले सेवा, संघटना व उद्योग असें सर्व प्रकारचें काम ते पाहूं शकले. ते बहुधा रात्रीचा प्रवास करीत व दिवस कामांत घालवीत. काळ्यांची व गोऱ्यांची अशा दोन दुनिया त्यावेळीं अमेरिकेंत होत्या. वर्ण-भेदाचा थोडा फार ताप त्यांनाही त्यावेळीं सहन करावा लागलाच. हॉटेलांत जागा सुरक्षित करून ठेवली असली तरी त्रास होतच असे. त्यांनीं दक्षिण अमेरिकेंतही जावयाचें ठरविलें होते. पण उत्तर अमेरिकेपेक्षां, दक्षिण अमेरिकेंत वर्णद्वेष अधिक तीव्र आहे. वर्णभेदाला त्रासून शेवटीं ते दक्षिण अमेरिकेंत गेले नाहींत. परंतु रेड इंडियन लोकांचें जीवन समजून घेण्याचा मात्र त्यांनीं शक्य तो प्रयत्न केला.

युरोप व अमेरिकेंतील कामगार चळवळीसंबंधी माहिती मिळवून नाना हिंदुस्थानांत परत आले. कामगार चळवळीची त्यांना चांगली कल्पना आली होती. ते परत आले त्यावेळीं मुंबईंतच नव्हे तर हिंदुस्थानच्या इतर भागांत कामगार चळवळ वाढूं लागली होती. कामगार चळवळीचें एखादें अखिल भारतीय संघटन असणें जरूर होतें. जर अशी संघटना अस्तित्वांत आली तरच कामगारांचे खरे प्रतिनिधि आन्तरराष्ट्रीय परिषदांतून पाठवितां येतील अशा अर्थाचें एक पत्रक त्यांनीं त्यावेळीं वृत्तपत्रांत प्रसिद्ध केलें. बऱ्याच अंशीं त्याच पत्रामुळें भारतीय ट्रेड युनियन कॉंग्रेसच्या कल्पनेला मूर्त स्वरूप येऊन तिचा पाया घातला गेला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

यानंतर जिनीव्हा येथें झालेल्या आय. एल्. ओच्या दोन अधिवेशनांच्या वेळींही कामगारांच्या समितीकडून प्रतिनिधि म्हणून हजर रहाण्याची नानांना संधि मिळाली. १९२२ सालच्या परिषदेनंतर युरोपांत फिरतां यावें अशा

तयारीनें ते गेले. पहिल्या अधिवेशनांतील अनुभवामुळें त्यापुढील अधिवेशनांच्या वेळीं त्यांना अधिकाधिक काम करणें शक्य झालें. अधिवेशनाच्या वेळीं आशियायी व इतर मागासलेल्या राष्ट्रांतील मजुरांचे प्रतिनिधि घेण्याचाही त्यांनीं आग्रहपूर्वक पुरस्कार केला. ते भारतीय मजुरांचे प्रतिनिधि म्हणून जरी या परिषदांना गेले तरी ते स्वतःला केवळ भारतीय कामगारांचेच प्रतिनिधि समजत नसत. सर्व आशियायी व इतर परतंत्र देशांतील कामगारांचे प्रतिनिधि नसल्यानें कामगारांचा प्रतिनिधि म्हणून त्यांची स्थिति सुधारावी, त्यांच्या हक्कांचें रक्षण व्हावें यासाठीं सतत खटपट करणें हें आपलें कर्तव्य आहे असें ते समजत. आशिया व आफ्रिका या खंडांतील परतंत्र वसाहतीमधल्या मजुरांनीं प्रत्यक्ष आपले प्रतिनिधि पाठवावेत असा घटनेंत बदल व्हावा अशी त्यांची इच्छा होती. असा अपेक्षित बदल जरी घडून येऊं शकला नाहीं तरी त्यांच्या आग्रहाचा परिणाम मात्र झाला व युरोपीय देशांतील ट्रेड यूनियनचे प्रतिनिधि येतांना आपल्या राष्ट्रांच्या साम्राज्यांतील मजुरांपैकीं कोणाला ना कोणाला सल्लागार म्हणून त्या त्या देशांतून माणसें आणूं लागले. एका परतंत्र राष्ट्रांतील कामगारांचा प्रतिनिधि म्हणून स्वतंत्र राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेंत प्रवेश होण्याची ही जी संधि त्यांना मिळाली तिचा लाभ सर्व परतंत्र देशांतील कामगारांना करून देणें हें आपलें कर्तव्य आहे असें समजून आशिया व आफ्रिका यांतील परतंत्र वसाहतींचा प्रतिनिधि असें स्वतःला मानून ते त्यांची बाजू या सर्व आन्तरराष्ट्रीय परिषदेपुढें मांडीत असत.

ग्रंथ [illegible] ठाणे. स्थळप्रत.
[illegible] २२०५८ वि: ११३
क्रमांक ९८४ नों: दि: २२।६।५०

७

# आंतरराष्ट्रीय कामगारसंघटनेंतील कार्य– २

आय्. एल. ओची पहिली परिषद भरावयाचें ठरलें त्यावेळीं देशांत अखिल भारतीय स्वरूपाची कामगार संघटना नसल्यानें आय. एल. ओच्या पहिल्या अधिवेशनाला नानांची निवड झाली. तेथून परत आल्यावर कामगारांचा खरा प्रतिनिधि आय. एल. ओच्या परिषदांना जावयाचा तर एक अखिल भारतीय कामगार संघटना स्थापन केली पाहिजे असे विचार त्यांनीं मांडले व ऑक्टोबर १९२० मध्यें अखिल भारतीय ट्रेड यूनियन कांग्रेसची स्थापना झाली.

अ. भा. ट्रेड यूनियन कांग्रेसच्या स्थापनेनंतर लाला लजपतराय तिचे पहिले अध्यक्ष झाले. १९२१ च्या आय. एल. ओच्या परिषदेसाठीं त्यांची प्रतिनिधि म्हणून निवडणूक झाली होती. परंतु कांहीं कारणामुळें ते जाऊं शकणार नव्हते. म्हणून नानांना पुनः जावें लागलें. १९२२ सालींहि त्यांचीच निवड झाली. १९२१ सालीं ते मध्यवर्ति असेंब्लीचेहि सभासद झाले. १९२५ व १९२९ सालींहि आय. एल. ओसाठीं प्रतिनिधि म्हणून कामगार संघटनांनीं त्यांचीच निवड केली. पहिल्या परिषदेला ते नवीनच होते. पण पुढें अनुभव आला व परिचय झाले. International Federation of Trade Unions हा वेगवेगळ्या देशांतील कामगार संघटनांचा एक आन्तरराष्ट्रीय संघ त्यावेळीं अस्तित्वांत होता. पण त्यांत बहुतेक पाश्चात्य राष्ट्रांचेच कामगार संघ असत. त्यांचे आपापसांत परिचय असत व त्यामुळें वेगवेगळ्या कमिट्यांवर त्यांचेच प्रतिनिधि जात. आशियायी राष्ट्रें उपेक्षितच होतीं.

हिंदुस्थान स्वतंत्र नसला तरी त्याचे निदान आय्. एल्. ओ मध्यें प्रतिनिधि असत. त्याशिवाय चीन जपानचेही प्रतिनिधि येत. जपानचें प्रतिनिधिमंडळ नेहमीं मोठें असे. सल्लागार प्रतिनिधि म्हणून जेवढीं माणसें म्हणून आणतां येत तेवढीं ते घेऊन येत. जपान हा पाश्चात्य राष्ट्रांच्या तोडीचा देश आहे हें दाखविणें हा उद्देश यामागें मुख्यतः असे.

आय्. एल्. ओचें काम मुख्यतः इंग्रजी व फ्रेंच या भाषांतून चाले. स्पॅनिश व जर्मन या भाषांनाही दुय्यम स्थान असे. या भाषांपैकीं कोठल्याही एका

भाषेंत भाषणें झालीं कीं आय्. एल. ओतर्फे त्यांचे अधिकृत रीतीनें अनुवाद करण्याची व्यवस्था होती. इतरांना स्वतःच्या खर्चानें दुभाषे बरोबर आणावे लागत. जपानचें प्रतिनिधिमंडळ मोठें असलें तरी भाषेची त्याच्यापुढें मोठीच अडचण असे. त्यामुळें त्यांचे कामगार प्रतिनिधि परिषदेपुढें फार तर एखादेंच भाषण करीत. या उलट हिंदुस्थानांतून जाणाऱ्या प्रतिनिधींना इंग्रजी येत असल्यानें ते परिषदेच्या सर्व कामकाजांत जास्त भाग घेऊ शकत.

आय. एल्. ओची एक गव्हर्निंग बॉडी असते. तिच्यावर कामगारांच्या वतीनें १२ सभासद निवडलेले असतात. सहा मुख्य सभासद व सहा बदला सभासद. बदला सभासदांपैकीं निम्या सभासदांचा जाण्यायेण्याचा खर्च आय. एल्. ओ. तर्फे केला जातो. आय् एल्. ओवर सरकारचे दोन, कामगारांचा एक व उद्योगपतींचा एक असे प्रतिनिधि असतात. गव्हर्निंग बॉडीच्या सभासदांची निवड जर सभासदांची मतें मोजून केली तर सर्व प्रतिनिधि सरकारचेच निवडून येण्याची शक्यता असते. म्हणून निवडणूकींत विभागीय स्वायत्तता (Group Autonomy) असावी अशी आय्. एल्. ओ. च्या. घटनेंत तरतूद केलेली आहे. त्यामुळें कामगारांच्या तर्फे गव्हर्निंग बॉडीवर जे सभासद येतात त्यांची निवड कामगार प्रतिनिधीच करतात. परंतु या बाबत आशियायी प्रतिनिधींची मोठी अडचण होत असे. दोनतीनच आशियायी प्रतिनिधि त्यावेळीं जास्तींत जास्त येथें असत. वास्तविक आशियांतील कामगारांची संख्या पाश्चात्य राष्ट्रांच्या संख्येच्या मानानें कमी नव्हती. पण आय्. एल्. ओ. मध्यें कामगारांच्या संख्येच्या मानानें प्रतिनिधि न घेतां ते देशावर घेतले जातात. युरोपांत छोटीं छोटीं राष्ट्रें अनेक असल्यानें व त्यांचे एकमेकांशीं परिचय असल्यानें आपसांत तडजोड करून त्यांना बहुमत मिळवून निवडून जाणें सोपें असे. त्यामानानें आशियायी प्रतिनिधींची निवड होणें दुरापास्तच होई. आशियायी मजुरांच्या संख्येच्या प्रमाणांत त्यांना गव्हर्निंग बॉडीवर जागा मिळाव्यात म्हणून सतत झगडावें लागे. जर अशी कांहीं सोय न झाली तर गव्हर्निंग बॉडीवर आशियायी राष्ट्रांचा कोणी प्रतिनिधि निवडून जाणें पाश्चात्य राष्ट्रांच्या मर्जीवर अवलंबून राहील हें स्पष्टच होतें.

कांहीं कांहीं देशांतून तेच तेच लोक प्रतिनिधि म्हणून नेहमीं येत असत. त्याचा त्यांना फायदाही होत असे. कारण त्यांना अनुभव मिळत

असे, ओळखी होत असत व कामकाजांत विशेष भाग घेतां येई. तें एकच काम मुख्य असल्यानें त्याच कामावर आपलें सर्व लक्ष त्यांना केंद्रित करतां येई. पहिलें एखादें वर्ष तर नवीन माणसाला कामकाज समजून घेण्यालाच लागत असतें. परंतु असें असूनही नानांना दरवर्षी स्वतःच तिकडे जाणे शक्य नव्हतें. कारण त्यांच्यावर मध्यवर्ति कायदे मंडळाचा सभासद म्हणून कांहीं जबाबदाऱ्या असत. ट्रेड युनिअन कॉंग्रेसच्या कामाचीही बरीच जबाबदारी त्यांच्यावरच असे. त्यावेळीं अशा परिषदांना जावयाचें म्हणजे जलमार्गानें जावें लागे व त्यांत फार वेळ खर्च होई. आजच्याइतकी विमानवाहतूक त्यावेळीं नव्हती. पण दरसाल स्वतःच न जाण्यांत आणखी एक महत्त्वाचें कारण होतें. आंतरराष्ट्रीय कामगारसंघटनांत भाग घेण्याची संधि जितक्या जास्त कार्यकर्त्यांना देतां येईल तितकें कामगार संघटनेंत तेज येईल, परदेशी कामगार चळवळींची माहिती मिळाल्यामुळें कार्यकर्ते अधिक उत्साहानें व पद्धतशीर कामें करूं शकतील अशी त्यांची कल्पना असे. प्रतिनिधींच्या बरोबर सल्लागार म्हणूनही इतर माणसें दरवर्षी जातच असत. आन्तरराष्ट्रीय कामगार चळवळीशीं आपला प्रत्यक्ष संबंध तुटूं नये म्हणून ते मधून मधून परिषदेला प्रतिनिधि म्हणून जात असत.

पहिल्या वर्षी जरी आय्. एल्. ओच्या कामांत नानांनीं क्वचित क्वचित भाग घेतला तरी आशियांतील दलित व परतंत्र देशांतील मजुरांचा आवाज आपणच उठविला पाहिजे हें ओळखून ते त्या दृष्टीनें भाग घेऊं लागले. त्यामुळें आय. एल्. ओ.च्या गव्हर्निंग बॉडीवर त्यांची निवड होत गेली. परंतु गव्हर्निंग बॉडीच्या सभांनाही त्यांना सतत जातां येत नसे, कारण आय्. एल्. ओ, मध्यवर्ति कायदे मंडळ, मध्यवर्ति कामगार संघटना, हीं तीन कामें ते करीत होते, व मुंबईतील सोशल सर्व्हिस लीगचें कामही त्यांनीं सोडलें नव्हतें. मध्यवर्ति कायदे मंडळाच्या अधिवेशनाच्या निमित्तानें वर्षांतून त्यांचे चार महिने तरी दिल्ली सिमल्यालाच जात. त्यांतून एखाद्या परदेशी परिषदेला जावयाचें म्हणजे महिना सव्वा महिना बोटींत काढावा लागे. त्यामुळें इतर कामाची हानि होऊं नये म्हणून गव्हर्निंग बॉडीच्या सर्वच सभांना त्यांना हजर रहातां येत नसे.

गव्हर्निंग बॉडीच्या सभांच्या वेळीं आपल्या देशांतील कामगारांना आय्. एल्. ओ. चा जास्तींत जास्त उपयोग व्हावा असा नाना प्रयत्न करीत असत.

यासाठीं त्यांनीं प्रथम आय. एल. ओ. नें हिंदुस्थानांतील कामगारांची स्थिति पहाण्यासाठीं चौकशीसमिती नेमून अहवाल तयार करावा अशी सूचना केली.

अशा प्रकारचा अहवाल तयार झाला तर भारतीय कामगारांची गाऱ्हाणीं चव्हाट्यावर येतील व त्यांची स्थिति सुधारण्याला मदत होईल असें त्यांना वाटलें. हा ठराव पास झाला व कांहीं वर्षांनीं तसा रिपोर्टही प्रसिद्ध झाला.

१९३४ सालपर्यंत बदला सभासद म्हणून नानांची गव्हर्निंग बोर्डावर निवड होत असे. १९३४ सालीं मुख्य सभासद म्हणून त्यांची निवड झाली. १९४४ पर्यंत ते त्या बोर्डाचे सतत सभासद होते १९४० सालीं अ. भा. ट्रेड यू. कॉंग्रेसमध्यें फाटाफूट झाली, रॉयिस्ट बाहेर पडले व त्यांचे प्रतिनिधि जम्नादास मेहेता एक वर्षापुरते आय्. एल. ओ.चे सभासद झाले. युद्धानंतर १९४६ सालीं नानांचीच गव्हर्निंग बॉडीवर निवड झाली. १९४८ सालीं त्यांचा आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेशीं असलेला संबंध सुटला.

१९२२ सालीं युरोपच्या वेगवेगळ्या देशांत नानांनीं महिनाभर प्रवास केला. वेगवेगळ्या देशांतील कामगार संघटनांच्या प्रतिनिधींशीं अगोदर ओळखी झाल्या होत्या. पण भारतांत त्यांचीं विविध कामें असल्यानें त्यापूर्वीं ते जाऊं शकले नाहींत. त्यांतून त्या देशांत इंग्रजी जाणणारे लोक कमी असल्यानें भाषेची अडचण होतीच. अमेरिकेंत इंग्रजी भाषा सर्वत्र असल्यानें तेथें ते फिरून कामगार चळवळीची प्रत्यक्ष पाहणी करूं शकले. त्यांच्या कामगारसेटलमेंटमध्यें राहून कामगार जीवन पाहूं शकले, इंग्लंडमध्यें ही भाषेची अडचण नव्हती. पण युरोपांतल्या वेगवेगळ्या देशांत भाषा निरनिराळ्या असल्यामुळें कामगारचळवळीचें तितकें प्रत्यक्ष अवलोकन करतां आलें नाहीं व कामगारचळवळीचा अभ्यास करतां आला नाहीं. सर्वसाधारण प्रवासी वेगवेगळे देश पहातात तशीच ही यात्रा झाली. नाहीं म्हणायला परदेशांत राहणारे भारतीय मात्र भेटत. जर्मनींत नाना गेले त्यावेळीं तेथें अनेक भारतीय होते. सरोजिनी नायडूंचे भाऊ वीरेंद्र चटोपाध्याय हे त्यावेळीं तेथें होते. नानांना पूर्वीं अमेरिकेंत भेटलेल्या ॲग्निस स्मेडले ह्या क्रांतिकारक स्त्रीनें त्याच्याशीं लग्न केलें होतें. डॉ. खानखोजे यांच्याशींही येथेंच भेट झाली. भारतीय स्वातंत्र्यासाठीं चळवळ करणारी अशी बरीच मंडळी तेथें त्यांना भेटली.

१९२१ मध्यें ब्रिटनमध्यें पार्लमेंटच्या निवडणुका होत्या. शापुर्जी सकलातवाला हे भारतीय गृहस्थ त्यावेळीं निवडणुकीसाठीं उभे होते. टाटा धंद्यांचे व्यवस्थापक म्हणून ते तेथें काम करीत होते. त्यांचा व नानांचा सोशल सर्व्हिस लीगच्या कामाच्या निमित्तानें प्रथम संबंध आला होता. सकलातवालांना मजूरपक्षानें तिकिट दिलें होतें. त्यांच्या वतीनें इंग्लंडमध्यें नानांनीं निवडणूक प्रचाराचीं भाषणें केलीं. सकलातवाला पार्लमेंटमध्यें एकूण दोनदां निवडून आले.

आय्. एल. ओच्या परिषदेला चिनी व जपानी प्रतिनिधि येत. आशियायी देशांत कामगार संघटना विशेष नांवारूपाला आलेल्या नव्हत्या. आशियायी देशामध्यें पाश्चात्य राष्ट्रांचीं साम्राज्यें होतीं. तेथील कामगारांचे प्रश्न वेगळे होते. आय. एल्. ओ. सारख्या व्यापक संस्थेमार्फत ते सुटण्यासारखे नव्हते. त्याकरितां आय. एल्. ओच्या वतीनें एक विभागीय ( group ) परिषद स्थापून तिच्यामार्फत हे प्रश्न सोडवावेत अशी कल्पना नानांना सुचली. त्यासंबंधीं त्यांनीं इतर प्रतिनिधींपाशीं चर्चा केली. परंतु हिंदुस्थान सरकारचाच या परिषदेला विरोध होता. या परिषदेच्या निमित्तानें पाश्चात्य राष्ट्रांचे प्रतिनिधि इकडे येतील व त्यांना हिंदुस्थानच्या राजकीय परिस्थितिची जाणीव होईल व देशांतील राजकीय कार्यकर्ते सरकार विरोधी निदर्शनें केल्याखेरीज रहाणार नाहींत अशी सार्थ भीति हिंदुस्थान सरकारला वाटत असे. याच भीतिस्तव तें आय्. एल. ओच्या अधिकाऱ्यांना हिंदुस्थानांत बोलावण्यास तयार नव्हतें. १९१७ सालीं जपाननें चीनचा पराजय केलेला असल्या कारणानें तें आपल्याला पाश्चात्य राष्ट्रांच्या तोडीचें एक राष्ट्र असें समजत असे. वर उल्लेखिलेली विभागीय परिषद बोलविली तर एशियायी देशाच्या न्यूनगंडाचें प्रदर्शन त्या परिषदेंत होईल ही भीति जपानला वाटे. म्हणून जपानचाही या परिषदेला विरोध होता. यावेळीं चीन हें राष्ट्र दुर्बळ होतें. तेथें कामगार चळवळ विशेष जोरांत नव्हती. शिवाय चीन व जपान या दोन्ही देशांचें परंपरागत वैर ही या परिषदेच्या मार्गातील एक अडचण होती. यांचें दोघांचें सहकार्य एकाच वेळीं मिळणें शक्य नव्हतें, त्याचप्रमाणें या दोनही देशांना परिषदेंतून वगळून चालण्यासारखें नव्हतें. कारण हे दोन्हीही देश महत्त्वाचे होते.

आय. एल. ओ.च्या आश्रयाखालींच आशियायी मजूर परिषद भरवावी यासाठीं १९२५ सालापासून नाना खटपट करीत होते. परंतु या कामीं यश येण्यास फारच अवधि लागला. १९३० सालीं विभागीय परिषदा आय. एल्. ओ च्या मार्फतच भरवाव्या असा ठराव पास झाला. त्याचा फायदा आशियायी राष्ट्रांनीं जरी घेतला नाहीं तरी दक्षिण अमेरिकेनें मात्र विभागीय परिषद भरविली. १९३४ सालीं हा प्रश्न नानांनीं गव्हर्निंग बॉडीपुढें मांडला. तेव्हां गव्हर्निंग बॉडीनें त्यासाठीं एक कमिटी नेमली. परंतु हिंदुस्थान व जपान सरकारच्या विरोधामुळें या कल्पनेला मूर्तस्वरूप बरेच दिवस आलें नाहीं. १९४६ सालीं युद्धानंतर आन्तरराष्ट्रीय परिस्थिति बदलली. जपानचें महत्त्व नाहींसें होऊन चीनला महत्त्व आलें. हिंदुस्थानही स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर आला होता. १९४६ च्या अखेरीला कॅनडामध्यें गव्हर्निंग बॉडीची सभा भरली असतां चीन व हिंदुस्थान येथील सरकारांच्या संमतीनें सप्टेम्बर १९४७ मध्यें नव्या दिल्लींत एशियन प्रिपेरेटरी परिषद भरविण्याचें ठरलें. एशियाची पहिली विभागीय परिषद चीनमध्यें भरवावी असें दिल्लींत ठरलें. पण चीनच्या राजकीय क्षितिजावर क्रांतिकारक बदल झाला व परिषद चीन ऐवजीं सीलोन येथें भरवावी लागली.

वरील विभागीय परिषद भरविण्याचे प्रयत्न चालू असतानांच आशियांतील कामगार संघटनांचीच परिषद भरवून आशियन आन्तरराष्ट्रीय कामगार संघटना युरोपांतील International Federation of Trade Unions च्या धर्तीवर स्थापन करावी असा विचार सुचला. त्यासंबंधीं जपानी कामगार प्रतिनिधीबरोबर वाटाघाटी झाल्या. दोन तीन वर्षांनीं या योजनेला मूर्तस्वरूप आलें. त्याप्रमाणें पहिली परिषद आशियांतून समुद्रमार्गे परिषदेला जाणाऱ्या प्रतिनिधींना सोयीचें पडावें म्हणून सीलोनमध्यें घेतली गेली. चिनी प्रतिनिधि या वेळेला हजर नव्हते. पण जपानी प्रतिनिधि मात्र हजर होते. जपानचे एक मजूर कार्यकर्ते परिषदेचे अध्यक्ष झाले व नानांची उपाध्यक्षपदीं निवड झाली. श्री. आर्. आर्. बखले हे सेक्रेटरी झाले. यानंतरची परिषद जपानमध्यें टोकियोला भरली. पण त्यावेळीं नाना जाऊं शकले नाहींत. श्री. बखले व दुसरे दोन प्रतिनिधि मात्र परिषदेसाठीं टोकियोला गेले होते. ह्या परिषदा भरल्या तरी त्यांना आशियायी मजूरपरिषद म्हणण्यासारखें स्वरूप येऊं शकलें नाहीं.

यानंतर जपाननें चीनवर स्वारी केली. त्यावेळीं जपानच्या कामगार प्रतिनिधींनीं जपानी सरकारच्या धोरणास पाठिंबा दिला. हिंदुस्थानच्या कामगार संघटनांना जपानी सरकारचें हें आक्रमक धोरण पसंत नव्हतें व त्यांना चीनविषयीं सहानुभूति होती. त्यामुळें ही आशियन कामगार संघटना मोडली.

आय. एल. ओच्या परिषदेसाठीं जाणारे ब्रिटिश राष्ट्रकुलांतील वेगवेगळ्या देशाचे प्रतिनिधि परिषदेच्या सुमारास एकत्र जमले तर त्यांचे संबंध जिव्हाळ्याचे व घनिष्ठ होतील या दृष्टीनें कॉमनवेल्थ लेबर कॉन्फरन्सही कांहीं वेळां भरविण्यांत येत असे. या कॉन्फरन्समध्यें भारतीय स्वातंत्र्याचा प्रश्न नाना मांडित असत. हिंदुस्थान हें स्वायत्त राष्ट्र आहे असें मानून त्याला लीग ऑफ नेशन्स व आय्. एल. ओवर प्रतिनिधित्व मिळालें होतें. तेव्हां हिंदुस्थानला स्वातंत्र्य देणें आन्तरराष्ट्रीयदृष्ट्या ब्रिटिशांवर बंधनकारक होतें. ह्या आधारावर हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची मागणी करणारा ठराव नानांनी कॉमनवेल्थ लेबर कॉन्फरन्समध्यें मांडला. राष्ट्रकुटुंबांतील मजूर चळवळीचे नेते पुरोगामी विचाराचे असल्यानें तेथील प्रतिनिधींनीं त्यांच्या ठरावाला पाठिंबा दिला व तो ठराव पास झाला.

## ८

# आंतरराष्ट्रीय कामगारसंघटनेंतील कार्य—पुढें चालू

### आशियायी देशांतील कामगारांची परिस्थिति सुधारण्यासंबंधीं योजना.

पहिल्या जागतिक युद्धानंतर जगांत शांतता नांदावी, राष्ट्राराष्ट्रामध्यें संघर्ष उत्पन्न होऊं नयेत, या उदात्त हेतूनें राष्ट्रसंघ व तदंतर्गत आय्. एल. ओ. या संस्थांची स्थापना झाली. जगांत जर शांतता नांदायची असेल तर आर्थिक स्पर्धा नाहींशी झाली पाहिजे, सहकार्यानें कामें झालीं पाहिजेत, गरीबांची श्रीमंतांकडून, अडाण्यांची बुद्धिवंतांकडून, व अशक्तांची बलवंताकडून होत असलेली पिळणूक थांबली पाहिजे. आन्तरराष्ट्रीय मजूर परिषद हीं संस्था त्रिपक्षी आहे. हिच्यामध्यें सरकार, उद्योगपति व कामगार यांचे प्रतिनिधि असतात. जगांत आन्तरराष्ट्रीय आर्थिक स्पर्धा असल्यानें निरनिराळ्या राष्ट्रांमध्यें हितविरोध उत्पन्न होतो म्हणून ही स्पर्धा नाहींशी केली पाहिजे हा या संघटनेचा खरा हेतु. परंतु हा हेतु नीटसा साध्य होत नाहीं, कारण आशियांतील मागासलेल्या देशांकडे द्यावें तसें लक्ष दिलें जात नाहीं असें पहिल्या कांहीं अधिवेशनानंतर नानांना आढळून आलें.

१९२९ सालीं या दृष्टीनें त्यांनीं तेथें एक भाषण केलें. जगांत ज्या कामगारांची पिळणूक होते त्या कामगारवर्गाच्या परिस्थितींत समानता निर्माण झाली तरच स्पर्धा व त्यांतून उत्पन्न होणारें युद्ध नाहींसें होईल. परंतु ही समानता कशी आणायची हा खरा बिकट प्रश्न आहे व ह्या दृष्टीनें विचार केल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाहीं. स्पर्धारहित जग निर्माण करावयाचें तर सर्वांची परिस्थिति समान पाहिजे. आशियायी देश मागासलेले आहेत, त्यांना पाश्चात्य राष्ट्रांच्या बरोबरीनें आणलें पाहिजे. पण यासाठीं पाश्चात्य राष्ट्रें कांहीं थांबणार नाहींत व त्यांनीं तसें थांबणें योग्यही होणार नाहीं. पौर्वात्य व पाश्चात्य राष्ट्रांतील कामगारांच्या परिस्थितींल समानता आणायला एकच उपाय आहे आणि तो म्हणजे आशियायी देशांतील कामगारांची प्रगति वाढविली पाहिजे तरच ते कधींकाळीं पाश्चात्य राष्ट्रांतील कामगारांची बरोबरी करूं शकतील. एकादी योजना शोधून काढण्याला जेवढा वेळ लागतो तेवढा ती नंतर कार्यवाहींत

आणण्याला लागत नाहीं. त्याप्रमाणें पाश्चात्यांना प्रगति करण्याला जितका वेळ लागला तितका आशियायी देशांना लागणार नाहीं. म्हणून समानता आणा-यची तर मागासलेल्या कामगारांची गति वाढवली पाहिजे तरच कधींकाळीं सर्व देश एका पातळीवर येतील.

आशियायी राष्ट्रें मागसलेलीं आहेत. येथें मजुरी कमी लागते व वस्तूंचें उत्पादन कमी खर्चांत होतें. जागतिक बाजारांत मग स्पर्धा निर्माण होते. इतर देशांना वस्तूंच्या किंमती कमी कराव्या लागतात. तेथील उद्योगपती वस्तूंच्या किंमती उतरवण्याकरतां कामगारांच्या सुखसोयींना कातर लावतात. त्यांना हें निमित्त पुरें असतें व मजूर संघटनांना त्यामुळें अडचण होते. मग आशियायी राष्ट्रें ही त्यांना आपल्या प्रगतीच्या मार्गांतील एक धोंड वाटते. ही गोष्ट आशियायी राष्ट्रांना अपमानास्पद वाटते.

आय्. एल. ओ च्या घटनेंत जरी कोठें उल्लेख नसला तरी रशियांत झाली तशी हिंसक क्रांति कोठें होऊं नये हा एक उद्देश सुप्तपणें सर्वांच्याच डोक्यांत त्यावेळीं वास करीत होता. नाना स्वतः उत्क्रांतीवर ( Evolution ) विश्वास ठेवणारे होते. आशियायी लोकांनीं क्रांतिकारक उठाव केले तरी त्यांचा कांहीं उपयोग होणार नाहीं असें त्यांना वाटे. पण सामान्य जनतेच्या सहनशीलते-लाही कांहीं मर्यादा असते. जर आशियायी राष्ट्रांची गति गोगलगाई सारखी राहिली तर लोकांचा धीर सुटून अनिच्छेनें कां होईना पण ते मग क्रांतिकारी मार्गांकडे वळतील. जर त्यांनीं क्रांतिकारी मार्गांकडे वळूं नये असें वाटत असेल तर त्यांच्या प्रगतीची गति वाढविली पाहिजे. उत्क्रांतीचा वेग वाढला कीं क्रांतिकारी वृत्ति कमी होईल. पाश्चात्य राष्ट्रांच्या बरोबर एकदम ही आशियायी राष्ट्रें आणून बसवावीं असा नानांचा आग्रह नव्हता. निदान पांच किंवा दहा वर्षांत आय. एल. ओ मध्यें सामील झालेलीं सर्व आशियायी व पाश्चात्य राष्ट्रें एका पातळीवर येतील अशी योजना आंखली पाहिजे असें नानांनीं सांगितलें.

त्याच वेळीं हिंदुस्थानांत मीरत कटाचा खटला चालू होता. आपल्या राष्ट्राची योग्य प्रगति व्हावयाची तर त्यासाठीं क्रांति झाली पाहिजे असे मानणारे लोक या आशियायी राष्ट्रांत आहेत ही गोष्ट त्यावेळीं जगांतील इतर देशांच्या लक्षांत आली होती. हें प्रत्यक्ष उदाहरण समोर असल्यानें

आशियायी राष्ट्रांच्या प्रगतीचा वेग पाश्चात्य देशांपेक्षां अधिक ठेवला पाहिजे असें नानांना वाटत होतें. आशियायी राष्ट्रांतील कामगारांच्या प्रगतीचा वेग वाढवला तरच ते कधींकाळीं पाश्चत्यांच्या बरोबरीला येऊन त्यांच्याच गतीनें चालूं शकतील, परंतु ही प्रगती वाढविण्यांतही योजनाबद्धता पाहिजे असा नानांचा आग्रह होता.

राष्ट्राची प्रगति व्हावयाची तर केवळ तशी इच्छा असून भागत नाहीं. त्यासाठीं सर्वांगीण प्रगतीचा आराखडा बनवावा लागतो व तो आराखडा अंमलांत आणण्याचें वेळापत्रकही तयार करावें लागतें. जनतेच्या सहकार्यानें जर वेळापत्रकाप्रमाणें आराखडा अंमलात आणला तर राष्ट्राची चांगली प्रगति होते. पाश्चात्य राष्ट्रांनीं अशा योजना आखून त्या पुऱ्या केल्या होत्या व आश्चर्यजनक परिणाम घडवून आणले होते. रशियानें पंचवार्षिक योजना आखून प्रचंड कार्य केलें होतें. हिंदुस्थानची प्रगति व्हावयाची तर येथेंही अशी कांहीं योजना आखणें जरूर होतें. पण परकी सरकार असें कांहीं करील हें शक्य नव्हतें. त्यांना या गोष्टींत आवश्यक असलेलें जनतेचें सहकार्य मिळवितां आलें नसतें. त्यामुळें अगदीं नाइलाज झाल्याशिवाय कोठलीहि सुधारणा करायची नाहीं असें येथल्या त्या वेळच्या सरकारचें धोरण होतें. ब्रिटिशांची समृद्धि भारताच्या मागसलेपणावरच अवलंबून होती व त्यामुळें एखादी योजना ते तयार करतील अशी अपेक्षा नव्हती.

हें सर्व पाहून १९३९ सालीं कॉंग्रेसनें या बाबतींत पुढाकार घ्यावयाचें ठरविलें. बाबू सुभाषचंद्र बोस व पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं एक National Planning Committee स्थापण्याचें ठरविलें. त्यासाठीं वेगवेगळ्या विषयांचे हिंदुस्थानांत जे तज्ञ होते त्यांचें सहकार्य घ्यावयाची त्यांनी खटपट केली. नियोजनाशिवाय देशाची प्रगति होणार नाहीं ही गोष्ट स्पष्ट आहे. नियोजनाच्या आराखड्यांत सुधारणेची दिशा, उद्दिष्टें व वेळापत्रकें या तीन गोष्टी स्पष्टपणें निर्दिष्ट केलेल्या असतात. त्यामुळें फायदा होतो. कॉंग्रेसनें नेमलेल्या प्लॅनिंग कमिटीला बहुतेक सर्वांचें सहकार्य होतें. शेतकीतज्ञ, उद्योग तज्ञ, अर्थशास्त्रज्ञ या कमिटीवर होते. मजुरांच्या प्रश्नांशीं नानांचा घनिष्ठ संबंध होता व देशोदेशींच्या मजूरसंघटना व त्यांची स्थिति त्यांनीं पाहिली होती.

त्यामुळें त्यांना कॉंग्रेसच्या ह्या प्लॅनिंग कमिटीवर बोलाविलें व तिचे ते सभासद झाले. जी मजुरांकरतां उपसमिति होती तिचे ते चेअरमन होते.

परंतु यानंतरचा काळ जागतिक युद्धामुळें अत्यंत अनिश्चिततेचा गेला. सर्वांचें लक्ष युद्धाकडे लागलें. हिंदुस्थानांतील प्लॅनिंग कमिटीचें कामकाज विशेष चालूं शकलें नाहीं. प्रांतोप्रांतीच्या कॉंग्रेस सरकारनीं युद्ध सहकार्याच्या मुद्यावर राजीनामे दिले. पुढें वैयक्तिक सत्याग्रहाची व त्यानंतर १९४२ ची ‘ चले जाव ’ची चळवळ सुरू झाली व प्लॅनिंग कमिटीचें काम स्थगित झालें.

युद्ध संपलें. त्यानंतर पुनः आन्तरराष्ट्रीय संघटनेचा काळ सुरू झाला. आशियायी राष्ट्रांची विभागीय त्रिपक्षी मजूर परिषद भरवावी अशी नानांची पूर्वीपासूनच मागणी होती. महायुद्धानंतर १९४६ सालीं अशी विभागीय परिषद भरविण्याची आवश्यकता पटून १९४७ सालीं दिल्लीला एशियन प्रिपरेटरी कान्फरन्स भरली. आय्. एल्. ओच्या गव्हर्निंग बॉडीच्या चेअरमनना दिल्लीस पोचावयास उशीर झाल्यामुळें त्या कॉन्फरन्सच्या कामाचा प्रारंभ नानांच्या हस्तें झाला. ते त्यावेळीं गव्हर्निंग बॉडीचे सर्वांत जुने सभासद होते. अधिवेशनांत हिंदुस्थानच्या कामगारांचा प्रतिनिधि या नात्यानें आशियायी मजुरांसाठीं होणाऱ्या सुधारणाही आराखड्याप्रमाणें व वेळापत्रकानुसार केल्या गेल्या पाहिजेत हा मुद्दा त्यांनीं मांडला. पाश्चात्य राष्ट्रांच्या बरोबरीनें एकाच उडींत येथल्या मजुरांना जरी आणतां येणें शक्य नसलें तरी केवळ शिफारसी व ठराव करून स्वस्थ बसण्यापेक्षां आशियायी मजुरांना पाश्चात्य मजुरांच्या बरोबरीनें आणण्याकरतां आराखडा बनविला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. इंग्लंडमध्यें सुधारणा व्हायला ५०-१०० वर्षें लागलीं असें निमित्त या बाबत सांगणें बरोबर नाहीं. कोणतीहि गोष्ट प्रथम करतांना वेळ लागतो, पण नंतर तीच गोष्ट अधिक त्वरेनें करणें शक्य असतें ही गोष्ट लक्षांत घेऊन निदान येत्या दहा वर्षांत आशियायी मजुरांना पाश्चात्य मजुरांना मिळणाऱ्या सर्व सुखसोयी व शाश्वति उपलब्ध करून देणारी योजना आंखली पाहिजे असें नानांनीं त्यावेळीं सांगितलें.

त्या सुमारास युनायटेड नेशन्सचें आशियायी कमिशन स्थापण्यांत आलें होतें. तेव्हां मजुरांच्या सुधारणेचा जो आराखडा तयार करावयाचा तो तसेंच

एक कमिशन नेमून सर्व आशियायी देशांसाठीं केला पाहिजे असें नानांचें मत होतें. या प्रत्येक आशियायी राष्ट्रांतील स्थानिक परिस्थितीचा विचार करून योजनेंत स्थानिक वाव ठेवली तरीपण मजूरसुधारणेचा असा प्लॅन बनविण्यासाठीं कमिशन नेमावें अशी त्यांची सूचना होती. आशियायी व पाश्चात्य देश यांतील मजुरांच्या वेतनांत स्थानिक परिस्थितीप्रमाणें फरक राहिला तरी पाश्चात्य मंजुरांना असलेल्या सर्व सुखसोयी आशियायी मजुरांना मिळाल्या पाहिजेत. आजारीपणाची रजा, बेकारभत्ता, वृद्धापकाळीं निवृत्तिवेतन, व कामगारांच्या मरणानंतर अल्पवयी मुलाबाळांच्या संवर्धनाची जबाबदारी इत्यादि गोष्टी आशियायी मजुरांना मिळाल्या पाहिजेत असें त्यांना वाटे. परंतु आय. एल. ओ चे अधिकारी असें कमिशन नेमायला तयार नव्हते. गव्हर्निंग बॉडीनें आशियायी राष्ट्रांसाठीं एक विभागीय समिती नेमली आहे, परंतु ह्या समितीची नेमणूक झाल्यानंतर नानांचा आय्. एल्. ओ शीं असलेला सबंध सुटला. आतां जे प्रतिनिधि तेथें आहेत त्यांचें हें काम आहे कीं त्यांनीं ठराविक मुदतींत पांच दहा वर्षांची कांहींतरी निश्चित योजना आखावी व ती अंमलांत आणण्याचा जोरानें व नेटानें प्रयत्न करावा.

आय. एल. ओ च्या परिषदांत दरवर्षीं आदेश, शिफारसी व साधे ठराव केले जातात. पहिले दोन अंमलांत आणण्याची सक्ति नसते. साधे ठराव त्या त्या देशाच्या सरकारांनीं मान्य केले तरच ते अंमलांत आणले जावयाचे. यांत मागासलेल्या राष्ट्रांनीं आपल्या परिस्थितित्यनुरूप प्रगति करावी असा मूळ उद्देश होता. पण राष्ट्रें ठरावांना नापसंति दर्शवून स्वस्थ बसत. तेव्हां पुढें नवी प्रथा सुरू करण्यांत आली. जरी एखादा ठराव सर्वस्वी मान्य करणें शक्य नसेल तर अशक्यतेचीं कारणें दाखविलीं पाहिजेत. ठरावांत सुचविलेल्या सुधारणांची कोणत्या मर्यादेपर्यंत अंमलबजावणी त्या त्या देशांतले सरकार करील तें विचारण्यांत येऊं लागलें आहे.

पूर्वींपासून आय. एल. ओ. च्या कामाचा उपयोग मुळींच होत नसे असें मात्र नाहीं. आय्. एल् ओ. मध्यें होणाऱ्या ठरावांना होकार किंवा नकार देण्याचा देशांना अधिकार असला तरी त्यांनीं ते ठराव Ratifying Authority—मंजुरी देण्याचा अधिकार असलेल्या संस्थेपुढें मांडलेच पाहिजेत असें आय्. एल. ओ. चें बंधन होतें. हिंदुस्थानांत मॅांटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा

लागू झाल्या होत्या व त्यावेळीं वातावरणही चांगलें असल्यानें आय्. एल. ओ. चे ठराव मध्यवात कायदेमंडळापुढें मांडण्यांत येऊं लागले. सरकारनें Ratifying Authority म्हणून कायदेमंडळ असल्याचें मान्य केलें. नानांची नेमणूक मध्यवर्ति कायदेमंडळांत होत असल्यानें ते त्यावेळीं तेथें हजर असत. आय. एल. ओ. चे ठराव मांडले जात असतांना त्यांतील जास्तींत जास्त भाग मान्य करण्यांत यावा असा आग्रह ते धरीत असत. त्याचा थोडा फार परिणाम होत असे. कांहीं गोष्टींना सरकार पूर्णपणें नकार देत असलें तरी कांहीं बाबींचा अंशतः तरी स्वीकार केला जाई. परंतु हा सर्व त्रास चुकवावा असें सरकारला पुढें वाटलें. अनेक देशांतील सरकारांनीं Ratifying Authority–मंजुरीची सत्ता कायदेमंडळाला नसून सरकारलाच आहे असा अर्थ काढला व कायदे मंडळापुढें हे विषय चर्चेला मांडण्याची ते टाळाटाळ करूं लागलें.

हिंदुस्थान सरकारनेंही या गोष्टींच्या चर्चेंत विनाकारण वेळ जातो, तेव्हां जेवढ्या गोष्टी अमलांत आणावयाच्या असतील व ज्यासाठीं कायदा करावा लागेल तेवढयाच कायदेमंडळांत मांडाव्या असें ठरविलें. कायदेमंडळांतील इतर सभासदांना या विषयाचें महत्व वाटत नसल्यानें सरकारचा डाव यशस्वी झाला व अप्रत्यक्ष रीत्या प्रथम सरकारनें Ratifying Authority म्हणून कायदे मंडळाला जी मान्यता दिली होती ती काढून घेऊन सरकारच स्वतः Ratifying Authority बनलें. हल्लींच्या कॉंग्रेस सरकारनें ही ब्रिटिश सरकारनें घालून दिलेली प्रथा चालू ठेवली आहे. म्हणून आय. एल. ओच्या ठरावावर पार्लमेंटपुढें चर्चा होत असल्याचें आपणांस हल्लीं ऐकूं येत नाहीं.

अशाप्रकारें वेगवेगळ्या देशांचीं सरकारें आदेश आणि शिफारसी धाब्यावर बसवूं लागल्यानें आय. एल. ओनें केलेलें बरेचसें काम निरर्थक ठरूं लागलें. तेव्हां आय्. एल्. ओकडे तक्रारी येऊं लागल्या. परंतु युद्धकाळांत हे सर्व प्रश्न मागें पडले. युद्ध संपल्यानंतर युनायटेड नेशन्स आर्गनायझेशन (U. N. O.) स्थापन झाली. त्यावेळीं आय्. एल. ओच्या जुन्या घटनेंत बदल करणें जरूर होतें. ही संधि साधून ठरावांच्या अंमलबजावणीच्या बाबतींतही कांहीं तरी केलें पाहिजे हा मुद्दा नानांनीं आग्रहपूर्वक मांडला. जर हे ठराव अक्षरशः बंधनकारक ठरविले तर वेगवेगळीं सरकारें यांत

भाग घेणार नाहींत हे स्पष्ट होतें. तेव्हां त्यांची 'होकार' वा 'नकार' देण्याची सत्ता मान्य करण्यावाचून गत्यंतरच नव्हतें. परंतु त्यांत अशी सुधारणा करण्यांत आली की सरकार त्यापैकीं किती भाग अंमलांत आणील तें त्यांनीं आय्. एल्. ओ च्या कचेरीला कळविलें पाहिजे. परंतु एवढ्यानेंही भागण्यासारखें नव्हतें. कारण 'नकार' देऊन सरकारें स्वस्थ बसलीं असतीं. कारण नकारच दिला कीं दुसरे कांहीं प्रश्न उपस्थित होत नाहींत, म्हणून किती अंमलात आणणार हें विचारतांना जो भाग अंमलात आणणार नाहीं असें सरकार म्हणतें तो कां अंमलांत आणीत नाहीं याचीं कारणेंही आतां आय्. एल्. ओला द्यावीं लागतात. त्याचप्रमाणें ठराव जरी सर्वस्वी मान्य केले नाहींत, तरी त्यांच्या दिशेनें किती प्रमाणांत सुधारणा करण्यांत येतील हें सांगावें लागतें, व या दोन्ही गोष्टींची छाननी करण्यांत येते. हें करण्यासाठीं आय्. एल्. ओची एक खास समितीहि आहे. आय्. एल्. ओच्या घटनेंत आतां ही नवी महत्त्वाची सुधारणा करण्यांत आली आहे.

आय्. एल्. ओवर आतां जे प्रतिनिधि असतील ते स्वतंत्र-वृत्तीचे आणि दक्ष असतील तर ते या नव्या घटनेमुळें बरेंच काम करूं शकतील. ते सरकारनें नकाराचीं जीं कारणें दिली असतील तीं खरीं नसतील तर भांडूं शकतील. सरकारचें म्हणणें खोटें असल्याचें सिद्ध करूं शकतील व त्याचा कामगारहिताच्या दृष्टीनें खात्रीनें उपयोग होईल. पण राष्ट्राभिमान जागृत करून ज्यांचें साहाय्य या बाबतींत घेतलें जातें त्यांतून सरकारच्या धोरणाला साथ करणाऱ्या कामगार संघटनाहि असतात व त्यांचे प्रतिनिधि आय्. एल. ओवर असतात. सरकार म्हणतें त्या सर्व गोष्टींना त्यांची संमति असते. स्वतःच्या देशांतील लोकशाही सरकारशीं जरूर तर भांडलें पाहिजे अशी वृत्ति त्यांच्यांत आली तरच घटनेंतील ही नवी महत्त्वाची सुधारणा उपयुक्त होईल. त्याकरतां आपल्या देशांतील मजूर प्रतिनिधींनीं दक्षतेनें त्याचा उपयोग करून घ्यावयाला हवा.

# ९

## कामगार चळवळीसंबंधीं कांहीं अडचणी व प्रश्न

१ आय्. एल्. ओ.च्या गव्हार्निंग बॉडीवरील प्रतिनिधित्वाच्या मार्गांतील कांहीं अडचणी. २ आन्तरराष्ट्रीय संस्थांच्या निर्मितीसंबंधीं अडचणी. ३ कामगारप्रतिनिधिनिवडणूकमार्गांतील अडचणी. ४ कामगार संस्था-संबंधीं अशाच अडचणी. ५. यूरोप बाहेरच्या देशांसाठीं राखीव जागा. ६. आशियायी राष्ट्रांकरतां राखीव जागा. ७ वसाहतींतील मजुरांचा प्रश्न. ८ आदिवासींचा प्रश्न. ९ मजूर संघटनांची जातीयवादापासून अलिप्तता. १० आय्. एल्. ओ.वर जाण्यास सर्वांना संधि.

### आय्. एल्. ओ. च्या गव्हर्निंग बॉडीवरील प्रतिनिधित्वाच्या मार्गांतील कांहीं अडचणी.

आन्तरराष्ट्रीय मजूर संघटनेची स्थापना (I. L. O.) झाली तरी नांवा-प्रमाणें खऱ्या अर्थानें ती संस्था सर्व राष्ट्रांची प्रतिनिधिभूत संस्था नव्हती. वास्तविक यूरोपियनांचच प्राबल्य त्या संस्थेंत होतें. यूरोपीय राष्ट्रांचा औद्योगिक विकास झाला होता. तेथें मजूरसंघटना व मालकसंघटना महत्त्व पावल्या होत्या. यूरोपीय राष्ट्रसरकारांनीं मजूर प्रश्नांसंबंधीं पूर्वी आन्तरराष्ट्रीय परिषदाही भरविल्या होत्या. आन्तरराष्ट्रीय वृत्तींचा व संघटनांचा विकास केल्याखेरीज स्पर्धा नाहींशी होऊन मजुरांना सुखाचे दिवस दिसणार नाहींत या गोष्टीची त्यांना जाणीव असल्यानें वेगवेगळ्या देशांमधील लोकांचे संघटित संबंध होते. त्यामुळें आय्. एल्. ओ.च्या गव्हर्निंग बॉडीवर यूरोपीय सभासदच निवडून येत. बहुसंख्य सभासद तेच असल्यानें असें होत असे.

औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या आठ देशांचा एक वर्ग कल्पिलेला आहे. त्या वर्गांतील राष्ट्रांचे जे सरकारी प्रतिनिधि, ते गव्हर्निंग कौन्सिलचे पदसिद्ध सभासद असावे असें ठरविण्यांत आलें होतें. हा जो राष्ट्रांचा खास वर्ग कल्पिला होता तो फक्त सरकारी प्रतिनिधीं पुरताच मर्यादित होता. आय्. एल्. ओ. ही संस्था त्रिपक्षी म्हणजे सरकार, मजूर, व मालक यांच्या प्रतिनिधींची आहे. परंतु सरकारी प्रतिनिधींसारखी सोय मजूर व मालक यांना उपलब्ध

नव्हती. भारत सरकारला प्रतिनिधित्व मिळविणें फारसें कठीण गेलें नाहीं. कारण देशांतील मजुरांची प्रचंड संख्या व देशाचा व्याप मोठा असल्यानें इतर राष्ट्रांपेक्षां उद्योगधंद्याची मोठी असलेली संख्या त्यांना सहज पटवून देतां आली. परंतु कामगारांच्या व मालकांच्या प्रतिनिधींना मात्र निवडून जावें लागे व त्यांत त्यांची मोठी अडचण होई. युरोपीय राष्ट्रें संख्येनें अधिक असल्यानें त्यांचे प्रतिनिधि बहुसंख्येनें येत. त्यांच्या इच्छेनें आलेच तर अगदीं थोडे बाहेरचे यावयाचे.

## २ आन्तरराष्ट्रीय संस्थांच्या निर्मितीसंबंधीं अडचणी.

आन्तरराष्ट्रीय संस्थांची निर्मिति हा एक कठिण प्रश्न आहे. जगांतील बहुसंख्य राष्ट्रें त्यांत सामील झालीं तरच अशा संस्था सार्थ होतात. पण त्यांना प्रतिनिधित्व देण्याचा प्रयत्न मोठा बिकट असतो. लोकसंख्येप्रमाणें त्यांना प्रतिनिधित्व द्यायचें म्हटलें तर छोटीं राष्ट्रें अशा संघटनेंत सामील व्हायला राजी नसतात. तेव्हां लोकशाही पद्धतींत प्रत्येक व्यक्तीला तिच्या लहान मोठेपणाचा विचार न करतां एक मत देण्याचा अधिकार देतात. त्याचप्रमाणें या आंतरराष्ट्रीय संस्थांत लहान मोठेपणाचा विचार न करतां समान प्रतिनिधित्व द्यावें लागतें. यामुळें आपलीं लहान राष्ट्रें अशा संस्थांत सामील होतात. पण मोठ्या राष्ट्रांना त्यामुळें एक प्रकारचा अन्याय होतो. लहान राष्ट्रांतील एका माणसाची किंमत मोठ्या राष्ट्रांतल्या एका माणसाच्या शंभर पट ठरते. लॅटिन अमेरिका, आइसलंड यांना हिंदुस्थान, चीन या देशांच्या बरोबरीनें प्रतिनिधित्व असतें. चीन आणि हिंदुस्थान यांची मिळून लोकसंख्या जगाच्या जवळ जवळ निम्मी पण त्यांना प्रतिनिधित्व मात्र त्या मानानें कमी.

## ३ कामगारप्रतिनिधिनिवडमार्गांतील अडचणी

आन्तरराष्ट्रीय संघटनेंत हा अन्याय जाचक होऊं नये अशा तजविजी केलेल्या असतात. पूर्वींच्या राष्ट्रसंघांत मुख्य कमिटीमध्यें सर्व ठराव एकमतानें पास होण्याची शर्त असे. युनोमध्यें कांहीं राष्ट्रांना व्हेटोचा अधिकार दिलेला आहे. आय्. एल. ओ.मध्येंही यासाठीं औद्योगिक दृष्टया पुढारलेल्या देशांचा एक वर्ग कल्पिलेला आहे. या वर्गांतील राष्ट्रांचे जे सरकारी प्रतिनिधि ते

गव्हर्निंग कौन्सिलचे पदसिद्ध सभासद असावे असें ठरविण्यांत आलें होतें. या देशांतील सरकारांच प्रतिनिधि यामुळें आपोआपच गव्हर्निंग कौन्सिलवर येत. (Eight Nations of Industrial Importance) म्हणून त्यांना प्रतिनिधित्व मिळे. या यादींत सुरवातीला हिंदुस्थानचा समावेश नव्हता. परंतु हिंदुस्थान सरकारनें ब्रिटिश सरकारच्या मदतीनें या यादींत आपला समावेश करून घेतला व सरकारी प्रतिनिधिसाठीं गव्हर्निंग कौन्सिलवर जागा मिळविली.

## ४. कामगारसंस्थांसंबंधींच्या अशाच अडचणी

कामगारसंघटनांत सुद्धां असे प्रश्न येतात. ट्रेडयुनियनला जोडलेल्या संघटनांना समान प्रतिनिधित्व दिल्याखेरीज त्यांची एक संघटना तयार होत नाहीं. पण पंचवीस पन्नास हजार सभासद असलेल्या संघटनेच्या बरोबरीनें छोट्या संघटनेला प्रतिनिधित्व देणें अवास्तव ठरतें. त्यावर असा तोडगा काढण्यांत आला आहे कीं प्रत्येक संघटनेला प्रतिनिधि जरी समानतेनें दिले तरी त्या संघटनेच्या सभासद संख्येच्या मानानें त्यांच्या मतांची किंमत धरली जाते. अशा प्रकारें या अन्यायाची भरपाई केली जाते.

## ५. यूरोप बाहेरच्या देशांसाठीं राखीव जागा

सुरवातीला आय्. एल्. ओ. मध्यें अमेरिका मिळाली नव्हती. त्यामुळें दक्षिण अमेरिकन राष्ट्रेंहि येत नसत. पण पुढें अमेरिका लीग ऑफ नेशन्सची व नंतर आय्. एल्. ओची सभासद झाली व दुसरीं अमेरिकन राष्ट्रेंही येऊं लागलीं. तेव्हां यूरोपबाहेरच्या राष्ट्रांसाठीं म्हणून खास दोन प्रतिनिधिजागा राखून ठेवण्यांत आल्या. या दोन जागांपैकीं एक जागा अमेरिकेला मिळत असे, व दुसरी बहुधा भारताच्या वांट्याला येत असे, कारण आशियायी राष्ट्रांपैकीं हिंदुस्थान हें एक महत्त्वाचें राष्ट्र तर होतेंच पण इतर देशांच्या प्रतिनिधींना भाषेचा प्रश्न नडत असे. भारतीय प्रतिनिधींना मात्र इंग्रजी भाषा येत असल्यानें त्यांची तेवढी सोय होती.

## ६. आशियायी राष्ट्रांकरतां राखीव जागा

याच सुमारास अमेरिकेला चीनसंबंधीं विशेष प्रेम वाटूं लागलें. ह्या बैठकीच्यावेळीं एक चिनी मनुष्य तेथें गेला होता, भारतीय प्रतिनिधीची

गैरहजेरी असल्यामुळें अमेरिकेचा पाठिंबा मिळवून चीननें यूरोपबाहेरच्या लोकांसाठीं असलेली एक जागा पटकावली व नेहमींप्रमाणें एक अमेरिकेच्या वांट्याला गेली.

यानंतर लौकरच युद्ध संपलें. दुसऱ्या महायुद्धांत जुना राष्ट्रसंघ संपूर्णपणें बारगळला. परंतु युद्धकाळांतच नव्या आन्तरराष्ट्रीय संघटनेची कल्पना निघाली व युनायटेड नेशन्स आर्गनायझेशनची ( संयुक्तराष्ट्रसंघाची ) स्थापना झाली.

युद्धकाळांत इतर आन्तरराष्ट्रीय संस्था निर्जिव झाल्या तरी आय्. एल. ओ. तग धरून होती. नव्या राष्ट्रीय संघटनेंत आय्. एल. ओ. चा समावेश करून घ्यावयाचा तर तिच्या घटनेंत बदल करण्याची जरूर होती. त्यावेळीं आय्. एल. ओ. अधिक प्रभावी व्हावी म्हणून जे प्रयत्न झाले त्यांचा आढावा मागल्या एका प्रकरणांत घेतला आहे. याचवेळीं प्रतिनिधित्वासंबंधींही नानांनीं मागणी केली. चीनच्या ऐवजीं हिंदुस्थानला प्रतिनिधित्व द्या अशी मागणी त्यांनीं केली नाहीं. कारण कांहीं झालें तरी चीन एक आशियायी देश आहे. त्याऐवजीं पूर्वी नॉन यूरोपीयन देशांना ज्याप्रमाणें दोन राखीव जागा मिळत त्याप्रमाणें आशियायी राष्ट्रांसाठींही राखीव जागा ठेवाव्या अशी नानांनीं मागणी केली. तसें झालें असतें तर चीनला एक जागा मिळून शिवाय हिंदुस्थानालाहि जागा मिळूं शकली असती. " आशियायी देशांत कामगार वर्गाची संख्या अधिक आहे. परंतु कामगार असंघटित व मागासलेले आहेत. त्यांच्यासाठींच आय. एल्. ओ. चा खरा उपयोग होणार असल्यानें त्यांना राखीव जागा दिल्या पाहिजेत ", असा युक्तिवाद यांनीं पुढें मांडला. परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं व आशियायी देशांसाठीं राखीव जागा मिळाल्या नाहींत. परंतु राखीव जागा मिळाल्या नाहींत तरी आय्. एल्. ओमधील हिंदुस्थानची स्थिति आज चांगली आहे. कारण चँग कै शेकचा चीन आज दुर्बल आहे. कम्युनिस्ट चीन बलवान असला तरी तो या संघटनेंत भाग घेत नाहीं. त्यामुळ हिंदुस्थानची जागा सुरक्षित आहे.

## ७. वसाहतींतील मजुरांचा प्रश्न

नाना मजूर परिषदांना जात त्यावेळीं वसाहतींतील मजुरांचा प्रश्न महत्वाचा

होता. ते जवळ जवळ गुलामगिरींत काम करीत असत. परंतु त्यांना स्वतंत्र प्रतिनिधित्व नव्हतें. आय. एल्. ओमध्यें फक्त स्वायत्त देशांचेच प्रतिनिधि बसूं शकत. त्यामुळें खरोखर त्यांची स्थिति सुधारण्यासाटीं खटपट करण्याची गरज. त्या वसाहतींतील मजुरांना फारसा फायदा मिळत नसे. ज्या ज्या राष्ट्रांच्या ताब्यांत वसाहती असत त्यांच्या प्रतिनिधिमंडळांतून ह्या वसाहतींनीं आपले प्रतिनिधि पाठवावे असा दंडक होता. पण त्यामुळें कामगारांचीं खरीं गाऱ्हाणीं वेशीवर टांगली जात नसत. सम्राट राष्ट्रांच्या प्रतिनिधींच्या विरोधी आवाज उठवणें वसाहतींतील मजूर प्रतिनिधींना फार कठीण होत असे. परंतु आतां स्थिति पालटली आहे. सीलोन, ब्रह्मदेश वगैरे कांहीं देश स्वतंत्र झाले आहेत. मलाया व आफ्रिका या वसाहतींतील मजुरांचा प्रश्न अजून भिजतच पडला आहे. कारण ही वसाहत राष्ट्रें असल्यानें त्यांना आय्. एल्. ओवर स्वतंत्र प्रतिनिधित्व नाहीं. त्यांनाही प्रतिनिधित्व मिळावें म्हणून नानांनीं केलेली खटपट फलद्रूप होऊं शकली नाहीं.

आज ह्या वसाहतदेशांतील मजुरांना प्रत्यक्ष प्रतिनिधित्वाचा हक्क नसला तरी त्यांची स्थिति सुधारण्याची आशा उत्पन्न होऊं लागली आहे. आय्. एल्. ओच्या त्रिपक्षी संघटनेशिवाय केवळ मजुरांच्या अशा दोन आंतरराष्ट्रीय घटना आज जगांत अस्तित्वांत आहेत. एक कम्युनिस्टांच्या प्रभावळींतील आहे. आय्. एल्. ओमध्यें कम्युनिस्टेतर संघटना भाग घेतात. वसाहतींतील मजुरांच्या योग्य मागण्यांची दाद घेतली नाहीं तर ते सर्व कम्युनिस्ट बनतील ही जाणीव आतां कम्युनिस्टेतरांच्या आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेला ( International Confederation of Trade Unions ) झाली असल्यानें ह्या वसाहतींतील मजुरांतूनही आपापल्या शिष्टमंडळासमवेत सल्लागार आणण्याची प्रथा पडत आहेत. परंतु वसाहतींना जेव्हां स्वातंत्र्य मिळेल तेव्हांच तेथील मजुरांच्या प्रतिनिधित्वाचा प्रश्न खऱ्या अर्थानें सुटेल. तोंपर्यंत सुटणार नाहीं.

## ८. आदिवासींचा प्रश्न

जगांतल्या वेगवेगळया देशांत तेथील आदिवासींचाही प्रश्न आहे. मागून आलेल्या लोकांनीं त्यांना डोंगरदऱ्यांत आश्रयार्थ पिटाळून लावलें

आहे. मोलमजुरी करूनच त्या लोकांची गुजराण होत असते. आय्. एल्. ओतर्फे आदिवासींच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठीं एक कमिटी नेमण्यांत आली असून त्या कमिटीवर हिंदुस्थानच्या आदिवासींचा प्रतिनिधि घेतला आहे.

## ९. मजूर संघटनांची जातीयवादापासून अलिप्तता

(१) मजुरांची संघटना जातीयवादापासून अलिप्त रहावी असा प्रयत्न नानांनीं सुरवातीपासूनच केला होता. आंतरराष्ट्रीय परिषदांच्या वेळीं ती दृष्टि ठेवली जात असे. हिंदुस्थानच्या प्रतिनिधि मंडळांत एखादा तरी मुसलमान कार्यकर्ता असे. त्यामुळें कामगारांत धर्मभिन्नत्वानें उत्पन्न होणारा जातीयवाद कधीं फोफावला नाहीं. १९२६ सालची एक गोष्ट. त्यावेळीं मुंबईतील मदनपुरा वगैरे मुसलमान मोहल्यांत नानांनीं चांगलें काम केलें होतें. तेथील सगळे मजूर त्यांच्यामागें असत. एकदां त्या भागांतील मजुरांनीं इतर मजुरांशीं सहकार्य करून मोठा संप केला. कारखानदारांत कांहीं मुसलमान होते. मजुरांवर नानांचा जसा प्रभाव तसा शौकतअल्लींचाहि असे. त्यांना " बडे भैय्या " म्हणून सारे ओळखीत. बडे भैय्यांना त्या कारखानदारानीं गाठलें. धर्माच्या नांवानें शौकतअल्लींच्या करवीं संप फोडण्याचा त्यानीं प्रयत्न केला.

" हा पगडीवाला ब्राह्मण एन्. एम्. जोशी तुमचा पुढारी कसा ? " बडे भैय्या कामगारांना म्हणाले.

" बडे भैय्या, आम्ही संपावर आहोंत. तुम्हीं आम्हांला मदत करा, तुम्हांला आम्हीं पुढारी मानूं. जोशी आम्हांला मदत करतात, आमची बाजू घेतात, म्हणून त्यांना आम्हीं पुढारी मानतों " असें त्या कामगारांनीं बडे भैय्यांना ऐकविलें. मतांची मोजणी करून व अल्पसंख्याकांची उपेक्षा करून बहु-संख्याकांच्या इच्छेप्रमाणेंच नाना निर्णय घेत नसत. प्रत्येक काम शक्यतों एक-मतानें व एकदिलानें पार पाडण्याची ते कोशीस करीत असल्यानें जातीय वादापासून ते चळवळ अलिप्त ठेऊं शकले.

(२) १९३७ सालीं भारतीय प्रतिनिधिमंडळांत त्यांच्याच अडचणीमुळें नाना मुसलमान प्रतिनिधि घेऊं शकले नाहींत. त्यावेळीं मजुरांच्या प्रतिनिधि-

मंडळांत एखाद्या मुसलमान कार्यकर्त्याचा समावेश करावा असें त्या वेळच्या व्हाइसरायनें सुचविलें. अल्पसंख्याकांच्या हक्कांची आपणच तेवढी जपणूक करतों असें जणूं त्यांतून त्याला सुचवायचें असावें. दरवर्षी सल्लागार मंडळांत एक तरी अल्पसंख्याकांचा प्रतिनिधि घेतला जात होता हें नानांनीं पुराव्यानिशीं सिद्ध केलें व व्हॉइसरायला निरुत्तर केलें! ना. गोखले व न्या. रानडे यांनीं त्यांना एक सिद्धान्त शिकविला होता. " त्रिकोणाच्या दोन बाजूंची बेरीज तिसऱ्या बाजूपेक्षां नेहमीं जास्त असते हा भूमितीचा सिद्धान्त राजकारणांत सत्य आहे. हिंदी राजकारणांतही असाच त्रिकोण आहे. त्या त्रिकोणाच्या तीन बाजू हिंदु, मुसलमान व ब्रिटिश सरकार या आहेत. कोणत्याही दोन बाजू तिसरीपेक्षां मोठ्या होणार हें निश्चित." याच सूत्रावर त्यांचें सर्व धोरण अवलंबून असे.

( ३ ) यानंतर युद्धकाळांत डॉ. आंबेडकर व्हाइसरायच्या कार्यकारी मंडळांत असतांना त्यांनीं प्रतिनिधिमंडळासमेवत एखाद्या हरिजन कार्यकर्त्याला न्यावें अशी इच्छा प्रदर्शित केली. त्यांच्याकडून हें कळण्यापूर्वीच प्रतिनिधि मंडळाच्या निवडी होऊन गेल्या होत्या. परंतु या विनंतीवर कांहीं कार्यकर्ते म्हणाले कीं ही डॉ. आंबेडकरांची सूचना जातीय आहे व यामुळें कामगारांत फूट पडेल.

नानांनीं विचारलें, 'आपल्याकडे हरिजन मजूर किती आहेत ?'

**उत्तर :** ' बरेच आहेत. '

**प्रश्न :** " गेलीं २५ वर्षें आपण आंतरराष्ट्रीय परिषदेला माणसें पाठवीत आहांत. त्यांत हरिजन माणसें आपण किती पाठविलीं ?"

**उत्तर :** " योग्य माणसें त्यांच्यांत नव्हतीं. "

**प्रश्न :** योग्य माणसें नाहींत याचा दोष कोणाकडे ? तुम्ही इतके दिवस काम करतां. एखादाही लायक इसम कां नाहीं तुम्ही तयार करूं शकलेत ? वास्तविक हरिजन मजुरांचें प्रमाणही कांहीं कमी नाहीं ! डॉ. आंबेडकरांची मागणी जातीय कीं त्यांना आतांपर्यंत वगळणारे आम्ही जातीय ?" असा नानांचा प्रश्न ऐकून ते निरुत्तर झाले. नानांनीं आंबेडकरांना कळविलें, " आमची

प्रतिनिधींची निवड यंदा अगोदर होऊन गेली आहे, पण तुम्ही एक जादा सभासद न्यायला परवानगी देत असाल तर आम्ही जरूर हरिजन प्रतिनिधि बरोबर घेऊं."

त्यावेळेपासून त्यांनीं हरिजन व मुसलमान कार्यकर्ते सल्लागार म्हणून नेण्याचें धोरण ठेवलें होतें.

## १०. आय्. एल्. ओवर जाण्यास सर्वांस संधि

आय्. एल्. ओवर हजर राहण्याची नाना इतरांनाही संधि देत असत. पण युद्धकाळांत एकदां लोकांनीं निवडलेला एक प्रतिनिधि सरकारला नापसंत होता. मजुरांचे व मालकांचे आय्. एल्. ओवर जाणारे प्रतिनिधि त्यांच्या संघटनांनीं निवडलेले असले तरी ते सरकारला मान्य असावे लागतात. सरकारनें त्या वर्षी परिषदेला पाठवावयाच्या प्रतिनिधींच्या बाबतींत घोळ घातला. त्याच सुमारास इकडे जपानशीं युद्ध सुरूं झालें. नाना गव्हर्निंग बॉडीच्या सभेला जाणार होते. पण सरकारनें बोटी, विमानें इत्यादि वाहनांची अडचण पुढें करून त्यावर्षी त्यांच्या मार्गांत खो घातला व ते कोणी जाऊं शकले नाहींत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 22045 वि:
क्रमांक ..... नों: दि:

१०

# नानांचा मध्यवर्ति विधिमंडळांत प्रवेश

इ. स. १८५८ मध्यें ब्रिटिशांचें सार्वभौमत्व प्रस्थापित झालें व ईस्ट इंडिया कंपनीकडून राज्यकारभार ब्रिटिश राजसत्तेकडे गेला. इ. स. १८५८ पासून हिंदुस्थानच्या गव्हर्नर जनरलास व्हाइसरॉय म्हणजे राजाचा प्रतिनिधि हा किताब मिळाला. तेव्हांपासून गव्हर्नर जनरल म्हणून सर्व प्रांतिक गव्हर्नरांवर हुकमत चालविणारा व व्हाइसरॉय म्हणजे इंग्लंडच्या राजाचा प्रतिनिधी असें त्या अधिकाराचें दुहेरी स्वरूप झालें आहे. अधिकाराच्या दृष्टीनें गव्हर्नर जनरलावर भारत मंत्र्याची हुकमत चालते. परंतु तो राजाचा प्रतिनिधि असल्यानें त्याला भारत मंत्र्यापेक्षां मोठा मान आहे. क्वचित् राजा हिंदुस्थानांत आला म्हणजे अर्थातच व्हाइसरॉयचें प्रतिनिधित्व तात्पुरतें बाजूस राहतें.

इ. स. १८३३ सालीं झालेली कायदेपंडितांची नेमणूक ही हिंदुस्थानांतील कायदेमंडळाची सुरवातच होय. इ. स. १८५३ सालपर्यंत कार्यकारीमंडळ हेंच सर्व कायदे करीत असे. त्या सालीं कायदे करण्याकरतां प्रत्येक प्रांतिक सरकारकडून एक एक प्रतिनिधि बोलावून त्यांचा कायदेमंडळांत समावेश करण्यांत आला. इ. स. १८६१ सालीं ही पद्धत बदलण्यांत आली. प्रत्येक प्रांतिक सरकारास आपआपले कायदे करण्याची मोकळीक देण्यांत आली त्यांचे प्रतिनिधि वरिष्ठ सरकारच्या कायदेमंडळांतून काढून टाकण्यांत आले व वरिष्ठ कायदेमंडळांत कार्यकारी मंत्र्याखेरीज सहा ते बारा सभासद सरकारनें नेमावेत व त्यांतील निम्मे सरकारी अधिकारी असावेत असें बंधन घातलें. कार्यकारी मंत्री चार व बाकीच्या बारांपैकीं सहा अधिकारी मिळून दहा सरकारी व सहा बिनसरकारी सभासद अशा प्रकारचें कायदेमंडळ बनविलें. सरकारच्या हातांत हुकमी बहुमत होतें. इतकें असूनही पास केलेला कायदा कार्यकारी मंत्र्यांनीं अमलांत आणलाच पाहिजे अशी सक्ति होऊं शकत नसे. प्रमुख प्रांतांतूनही अशाच प्रकारचीं कायदेमंडळें स्थापन झालीं.

इ. स. १८९२ सालीं वरिष्ठ व प्रांतिक कौन्सिलांची वाढ करणारा महत्वाचा कायदा पास झाला. हिंदुस्थानांतील कायदेकौन्सिलांचे ठराव सरकारवर

बंधनकारक नसत. त्या कौन्सिलांचा सल्लागार मंडळाप्रमाणें उपयोग होत असे. इ. स. १८९२ सालीं वरिष्ठ कायदे कौन्सिलांतील जादा सभासदांची संख्या १६ पर्यंत वाढविण्यांत आली व प्रांतिक कायदे कौन्सिलांत २० पर्यंत जादा सभासद नेमावे असें ठरलें. वरिष्ठ कायदेकौन्सिलांत प्रांतिक कायदेकौन्सिलांच्या बिन-सरकारी सभासदांनीं निवडलेले दहा प्रतिनिधि घेण्यांत आले व प्रांतिक कायदे कौन्सिलांत म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्डें, युनिव्हर्सिट्या अशासारख्या सरकार-मान्य संस्थांच्या शिफारसीवरून पाठविलेले प्रतिनिधि घेण्यांत आले. तरी अजून सर्व कायदेमंडळांतून सरकारच्या हातीं हुकमी बहुमत होतें. सभासदांना प्रश्न विचारण्यास व वार्षिक अंदाजपत्रकावर चर्चा करण्यास परवानगी दिलेली होती. ह्या स्थितींत इ. स. १९०९ पर्यंत बदल झाला नाहीं. विसाव्या शतकाच्या सुरवातीला हिंदुस्थानांतील सुशिक्षितांत या वेळीं दोन पक्ष उत्पन्न झाले. दोन्ही पक्ष सनदशीरपद्धतीनें म्हणजे कायद्याचें उल्लंघन न करतां चळवळ करणारे होते व दोघांसही लोकप्रतिनिधींना जबाबदार अशी राज्यपद्धति स्थापन होणें इष्ट वाटत होतें. त्यांतील तरुण "राष्ट्रीय" पक्षाचें मत असें कीं, वीस वर्षें सरकारकडे मागण्या मागून व अर्ज करून ज्याअर्थीं कांहीं हक्क प्राप्त झालेले नाहींत, त्याअर्थीं एकीकडे मागण्या मागण्याचा क्रम चालू असतां दुसरीकडे देशांत जागृति उत्पन्न करून आपल्या मागणीस जोरदार पाठबळ उत्पन्न करावें व विलायतच्या मालावर बहिष्कार घालून तेथील लोकांस येथील असंतोषाची आंच लावावी. परंतु 'नेमस्त' किंवा जुन्या पक्षाचें म्हणणें असें कीं, राष्ट्रीय सभा सुरू झाल्यापासून उदार पक्ष प्रथमच अधिकारारूढ झाला आहे. तेव्हां विरोधक चळवळीनें त्या पक्षाचा मार्ग बिकट न करतां सलोख्यास व सहकारितेस तयार होऊन सामोपचाराच्या वाटाघाटीनें जें कमजास्त मिळेल तें घ्यावें, कारण हिंदुस्थानसारख्या मोठ्या देशांत क्रमाक्रमानेंच जबाबदारीचें स्वराज्य स्थापन होईल, एकदम होणार नाहीं. लो. टिळक व लाला लजपतराय हे त्यावेळीं तरुण राष्ट्रीय पक्षाचे प्रमुख पुढारी असून नेमस्त पक्षाचें धुरीणत्व ना. गोखले, सुरेंद्रनाथ बानर्जी व फिरोजशहा मेथा यांच्याकडे असे. याबरोबर तिसराही एक पक्ष देशांत होता. तो म्हणजे बंगालच्या फाळणीमुळें व दडप-शाहीच्या धोरणामुळें निराश होऊन त्रस्त झालेल्या क्रांतिकारकांचा. यांच्या यत्नामुळें बंगाल व महाराष्ट्र या प्रांतांतून कांहीं इंग्रज अधिकाऱ्यांचे

खून झाले ( १९०९ ); व ठिकठिकाणीं गुप्त कट होऊं लागले. सत्तावन सालच्या लढ्यापासून कधीं झाली नाहीं एवढी अस्वस्थता त्यावेळीं हिंदुस्थानांत उत्पन्न झालेली होती.

**मोर्लेमिंटो सुधारणा**—ह्या परिस्थितीला मोर्ले व मिंटो यांनीं मोठ्या युक्तीनें तोंड दिलें. चळवळीचा जोर लक्षांत घेऊन त्यावेळीं कांहींतरी सुधारणेचे हक्क दिले पाहिजेत असें सरकारच्या लक्षांत आले. नेमस्त, राष्ट्रीय व क्रांतिकारक यांच्यापैकीं नेमस्त लोक थोडेबहुत हक्क दिले असतां संतुष्ट होतील असें सरकारला वाटलें व बरीच वाटाघाट करून शेवटीं इ. स. १९०९ मध्यें कायदे कौन्सिलची वाढ करणारा कायदा पास झाला. वरिष्ठकायदेकौन्सिलच्या सभासदांची संख्या ६० पर्यंत वाढविली व प्रांतिक कायदेकौन्सिलांतील सभासदांची संख्या पूर्वींहून दुप्पट करण्यांत आली. प्रांतिक कायदेकौन्सिलांतील बिनसरकारी सभासदांचें ( सरकार नियुक्त बिनसरकारी व निवडून आलेले बिनसरकारी मिळून ) बहुमत केलें, निवडणूकीचें तत्त्व सरकारनें मान्य केलें. मुसलमानांना, बंगालच्या जमीनदारांना व अशा कित्येक महत्त्वाच्या अल्पसंख्यांक वर्गांना प्रतिनिधि राखून ठेवण्यांत आले. बिनसरकारी सभासदांस ठराव आणून ते मतास घालण्याचा हक्क मिळाला. वार्षिक अंदाज पत्रकावर कलमवार चर्चा करण्याची संधि मिळाली व फेर प्रश्न विचारण्याची परवानगी मिळाली. इ. स. १९०७ सालीं ठिकठिकाणच्या कार्यकारी मंडळांतून हिंदी सभासद नेमण्याचें ठरलें. त्याप्रमाणें इंडिया कौन्सिलांत दोन, वरिष्ठ कार्यकारी मंडळांत एक व प्रांतिक कार्यकारी मंडळांत प्रत्येकी एक असे हिंदी सभासद नेमले. यामुळें सरकारच्या अगदीं गुप्त खलबतांत देखील हिंदी लोकांचा प्रवेश झाला.

मोर्ले मिंटो सुधारणा झाल्या तरी त्यामुळें लोकांचें समाधान झालें नाहीं. अधिक सुधारणासाठीं लोकांची मागणी चालूच होती. परंतु यानंतर १९१४ चें पहिलें महायुद्ध सुरू झालें. महायुद्धकाळांत हिंदी जनतेचें सहकार्य मिळावें व जनतेमधला असंतोष कमी व्हावा या हेतूनें त्यावेळचे भारतमंत्री मॅंटेग्यू यांनीं १९१७ च्या ऑगष्ट महिन्यांत बादशहांचा जाहीरनामा प्रसिद्ध करून जबाबदार राज्यपद्धति देशाला देण्याचा साम्राज्य सरकारचा मनोदय

जाहीर केला. यानंतर ते स्वतः हिंदुस्थानांत आले व नवीन सुधारणांची दिशा ठरविण्यासाठीं त्यांनीं देशांतल्या वेगवेगळ्या पुढाऱ्यांशीं वाटाघाटी केल्या. मध्यवर्ति विधिमंडळाची रचना कशी असावी हे ठरविण्यासाठीं दोन कमिट्या नेमण्यांत आल्या होत्या. मतदार संघ, मतदानाचे अधिकार व निवडणूक पद्धत ठरविणें अशीं कामें या कमिट्याकडे होती. मध्यवर्ति विधिमंडळासाठीं आजच्याप्रमाणें प्रौढमताधिकार त्यावेळीं नव्हता. किमान ठराविक सारा भरणारे व इन्कमटॅक्स देणारे इसम मध्यवर्ति मंडळासाठीं मतदार म्हणून पात्र ठरविण्यांत आले होते. अशाप्रकारें मतदानाचा अधिकार मर्यादित असल्यानें मध्यवर्ति विधिमंडळांत एका ठराविक वर्गांचेच प्रतिनिधि जाणारे ही गोष्ट उघड होती. गरीब मजूर वर्गाला मध्यवर्ति विधिमंडळांत कांहींच स्थान या नव्या घटनेंत नाहीं ही गोष्ट नानांच्या लक्षांत आली. त्यावेळीं ते कामगारांत कार्य करीत असल्यानें प्रत्येक ठिकाणीं दक्षतेनें कामगार हिताची जपणूक करणें हें त्यांचें कर्तव्य होतें. कामगारवर्गाची बाजू सरकारपुढें मांडण्याचा त्यांनीं निश्चय केला. सरकारनें विधिमंडळाची रचना ठरविण्यासाठीं नेमलेल्या दोन्ही कमिट्यांपुढें त्यांनीं कामगारांची बाजू मांडली व कामगार वर्गाला मध्यवर्ति विधिमंडळांत प्रतिनिधित्व अशाप्रकारें नाकारण्यांत येत आहे ही गोष्ट त्यांच्या ध्यानांत आणून दिली. त्यापूर्वीं सुमारें दहा वर्षें ते सार्वजनिक कामें करीत असल्यानें आपली बाजू मांडण्याची संधि त्यांना सहज मिळूं शकली. कामगारांना आपले प्रतिनिधि मध्यवर्ति विधिमंडळांत निवडून पाठविण्याचा अधिकार मिळाला पाहिजे अशी त्यांची मागणी होती व ठराविक सारा व इन्कम टॅक्स भरणाऱ्यांनाच मतदानाचा अधिकार दिल्यामुळें कामगारांचे प्रतिनिधि पाठविण्याची तर गोष्ट सोडाच पण साधा मतदानाचा अधिकारही त्यांना मिळत नव्हता. कमिटीच्या सभासदांना त्यांचें म्हणणें पटत होतें परंतु कशा तऱ्हेनें कामगार प्रतिनिधि घ्यावे हें मात्र त्यांना उमजत नव्हतें.

१९१९ सालीं मॉंटेग्युचेम्सफर्ड सुधारणांचा कायदा पार्लमेंटपुढें विचारासाठीं आला. ह्या नव्या कायद्याच्या खर्ड्यामध्यें कनिष्ठ किंवा प्रांतिक विधिमंडळांत कामगारप्रतिनिधींची नेमणूक करण्यात यावी अशी तरतूद करण्यांत आली होती. पार्लमेंटमध्यें या कायद्याचा खल चालू असतांनांच आयू. एल्. ओच्या अधिवेशना

साठीं प्रतिनिधि म्हणून नाना वॉशिंग्टनला जात होते. जातांना वाटेंत इंग्लंडमध्यें ते थांबले. लंडनमध्यें पूर्वी हिंदुस्थानांत असलेले एक युरोपियन गृहस्थ त्यांना भेटले. हे गृहस्थ हिंदुस्थानांत असतांना टाइम्स ऑफ इंडियाचें संपादक होते. कामगारांच्या विविध गाऱ्हाण्यांना वाचा फोडण्यासाठीं नानांना वृत्तपत्राचें साहाय्य घ्यावें लागे. टाइम्सहि त्यांच्या लेखांना प्रसिद्धि देत असे व त्यामुळें त्या गृहस्थांशीं त्यांची पूर्वी ओळख झालेली होती. ते पार्लमेंटचे सभासद होते. त्यांच्या कानांवर नानांनीं आपलें गाऱ्हाणें घातलें व कामगारांवर हा अन्याय होत आहे असें दाखवून दिलें, कामगारांना मध्यवर्ति विधिमंडळांत प्रतिनिधित्व मिळवून देण्यासाठीं शक्य ती खटपट करण्याचें त्या गृहस्थांनीं मान्य केलें.

त्या मित्रानें केलेल्या खटपटीला दृश्य असें फळ आलें नाहीं, कारण कायद्यांत कामगार प्रतिनिधित्वाची कांहींही सोय केली नव्हती. परंतु सरकारनें या गोष्टीचा विचार करण्याचें आश्वासन मात्र दिलें. १९२१ सालीं मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा अंमलांत आल्या. निवडणुका झाल्या. वॉशिंग्टन परिषदेमुळें नानांच्या वेगवेगळ्या प्रकारच्या लोकांशीं ओळखी झाल्या होत्या. व्हाइस रॉयच्या कार्यकारी मंडळांत कांहीं आपले लोक होते. १९२० सालीं भारतीय ट्रेड युनियन कॉंग्रेसची स्थापना होऊन कामगार चळवळ बाळसें धरूं लागली होती. कामगारांचे प्रतिनिधि या ट्रेड यूनियन संघटनेमार्फत घ्यावेत अशी योजना नानांनीं सुचविली होती. पण याचा कांहींच परिणाम झाला नाहीं. सरकारच्या दृष्टीनें कामगारांचा प्रश्न महत्वाचा नव्हता. त्यांचें सर्व लक्ष राजकीय प्रश्नांवरच केंद्रित झालें होतें. देशांत असंतोष वाढला होता व संघटित स्वरूपांत व्यक्त होत होता. तेव्हां कामगरांचे प्रतिनिधि निवडणुकीच्या मार्गानें घ्यावे ही त्यांची मागणी मान्य झाली नाहीं. मध्यवर्ति विधिमंडळांत सभासदांची नेमणूक करण्याची मुळांत योजना नसली तरी कांहीं सभासद नॉमिनेट करावयाचे होते. नॉमिनेट होणाऱ्या सभासदावर कायद्यानें सरकारच्याच बाजूनें मत दिलें पाहिजे असं कोणतेंही बंधन नाहीं. त्याचप्रमाणें ही नेमणूक ठराविक मुदतीसाठीं होते. मुदत भरण्यापूर्वी नेमलेल्या माणसाचें सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार सरकारला नाहीं. हें एक प्रकारचें संरक्षणच नॉमिनेट होणाऱ्या सभासदाला मिळालेलें असतें.

नवें विधिमंडळ अस्तित्वांत येतांच मध्यवर्ती सरकारनें नानांना, “ तुम्ही नॉमिनेट होण्यास तयार आहांत काय ?” म्हणून विचारणा केली. कामगार प्रतिनिधि म्हणून त्यांचा समावेश तेथें होणार होता. मतदानविषयक स्वातंत्र्य कायद्यानें दिलेलें असल्यानें त्यांनीं नॉमिनेट होण्यास मान्यता दिली. सरकारकडे त्यासाठीं त्यांनीं कोणत्याही प्रकारें खटपट केली नव्हती. त्यांची नेमणूक लाचारीनें झालेली नव्हती. त्यामुळें त्यांना आपलें मतस्वातंत्र्य अबाधित राखतां येणें सुलभ होतें. मध्यवर्ति विधिमंडळांत जाऊन कामगारहित साधतां येईल तेवढें साधावें म्हणून त्यांनीं सरकारला आपली संमति कळविली व त्यांची नेमणूक मध्यवर्ति विधिमंडळांत कामगारवर्गाचा प्रतिनिधि म्हणून झाली. कामगारांचे ते प्रतिनिधि आहेत या गोष्टीला साऱ्या देशांत कोणाचा विरोध नव्हता कारण ते प्रत्यक्ष कामगार चळवळींत काम करीतच होते.

ब्रिटिश राजवटीपूर्वी हिंदुस्थानांत संघटित स्वरूपांतले मोठे उद्योगधंदे नव्हते. शेतींत लागणारे मजूर तात्पुरते असत. परंतु ब्रिटिशांचा एकछत्री अंमल सुरू झाल्यावर, रस्ते, आगगाड्या, सरकारी इमारती इत्यादिसाठीं सरकारचें पब्लिकवर्क्स खातें सुरू झालें. त्यानंतर खाणी, चहाकॉफीचे मळे, नीळेची शेती, कापडाच्या व तागाच्या गिरण्या असे संघटित उद्योग सुरू झाले. कामगारांची संख्या वाढून एका वर्गाच्या स्वरूपांत तो अस्तित्वांत येऊं लागला.

भारतीय कामगारांची स्थिति चांगली नव्हती. मालकांवर कामगारांना वागविण्यासंबंधीं कोणत्याही प्रकारचे निर्बंध नव्हते. मालक आपल्या फायद्यासाठीं मजुरांना वाटेल तसें वागवीत. त्यांच्या सोयी गैरसोयींचा कांहींही विचार केला जात नसे. कामाचे तास, कामगारांचें किमान वय इत्यादि बाबतींत कांहीं नियम नव्हते. कामगार संघटित नसल्यानें त्यांची दाद लागणेंहि कठिण होतें. परंतु मुंबईत ज्योतिबा फुले यांचे अनुयायी नारायणराव लोखंडे काम करीत असत. मजुरांच्या तक्रारींची दाद लावून घेण्याची खटपट करीत असत. त्यांचें दिनबंधु म्हणून एक वर्तमानपत्र होतें, त्यांतहि कामगारांची गाऱ्हाणीं मांडली जात.

१८८० पूर्वी कामगारवर्गासाठीं कोणताही कायदा नव्हता. सरकारनें कमिशनें नेमलीं होतीं व कामगारांच्या स्थितीची चौकशी होत होती. हिंदुस्था-

नांतील कामगारांची स्थिति चांगली नाहीं अशा तक्रारी इंग्लंडमधून सतत होत. लँकेशायर हें इंग्लंडमधील कापड उत्पादन करणारें प्रमुख केंद्र आहे. तेथून बहुधा भारतीय कामगारांच्या दुर्दशेबद्दल तक्रारी येत व ह्या तक्रारीमागें कांहींतरी काळेंबेरें आहे असा संशय हिंदी कारखानदार व्यक्त करीत. कारण कापडधंद्याच्या बाबतींत हिंदुस्थान लँकेशायरचें प्रतिस्पर्धी होतें. भारतीय कामगारांच्या हिताच्या नांवाखालीं येथल्या मजुरांना अवास्तव सवलती देऊन येथलें कापड लँकेशायरपेक्षां महाग पडावें व स्पर्धा नाहींशी व्हावी हा उद्देश या तक्रारीच्या बुडाशीं आहे असा समज येथला भांडवलदार वर्ग राष्ट्रीयतेच्या नांवाखालीं सहज पसरवूं शकत असे. त्याकाळीं स्वदेशीची चळवळही जोरांत होती. वंगभंगाच्या राष्ट्रीय चळवळीपासून स्वदेशी बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण हीं राष्ट्रीय लढ्यांचीं अंगें बनलीं होतीं. त्यामुळें भांडवलदारांचें आयतेंच फावत असे.

कामगारांचे कामाचे आठवड्याचे तास, किमानवेतन, संरक्षक उपाययोजना या गोष्टींचा विचार करण्यासाठीं १९०८ सालीं सरकारनें फॅक्टरी कमिशन नेमलें. या कमिशनच्या शिफारसी अंमलांत आणण्यासाठीं सरकारनें १९११ मध्यें फॅक्टरी ॲक्ट पास केला; स्त्रिया, मुलें यांच्या कामाचे तास, किमान वयोमर्यादा, व विश्रांतीच्या वेळा यांवर कांहीं निर्बंध घालण्यांत आले. यावेळींहि भांडवलदारांचा विरोध झाला.

गिरणी–मालक, भांडवलदार, मळेवाले, इत्यादींना पैशाचें पाठबळ असतें व ते संघटीतहि असतात. १८३४ सालीं कलकत्याच्या युरोपियन व्यापाऱ्यांनीं आपले हितसंबंध राखण्यासाठीं पहिला संघ काढला. मजुरांची पहिली संघटना मात्र या नंतर ५० वर्षांनीं अस्तित्वांत आली. फॅक्टरी कमिशनपुढें मजुरांची बाजू मांडण्यासाठीं पहिली परिषद १८८४ मध्यें भरविली होती. त्यानंतर कामगारांच्या संघटना स्थानिक स्वरूपांत होत राहिल्या. १९११ सालचा फॅक्टरी कायदा हा अपुरा होता. त्यांतून वॉशिंग्टनच्या आय्. एल्. ओ. परिषदेंत मजूर प्रतिनिधींनीं केलेल्या शिफारसींची दखल घेणें सरकारला अवश्य होतें. यासाठीं नवा कायदा करण्याची गरज होती. अशा प्रकारचा कायदा करण्यासाठीं सरकारनें पुढाकार घेतला कीं तो इंग्लिश कारखानदारांना

वांचविण्याचा प्रयत्न आहे असें वाटत असे. तेव्हां सरकारची बाजू या बाबतींत बळकट करील असा एखादा सभासद त्यांना मध्यवर्ती विधिमंडळांत हवाच होता. नाना भारतसेवकसमाजासारख्या प्रतिष्ठित व सनदशीर मार्गांचें अनुसरण करणाऱ्या संस्थेचे सभासद व आयू. एल्. ओ. वरील प्रतिनिधि असल्यामुळें मध्यवर्ति मंडळांत त्यांची नेमणूक झाली. त्यांतून अखिल भारतीय ट्रेड युनियन कॉंग्रेसची संघटना उभारण्यांतही त्यांचा प्रमुख भाग होता.

भारतीय कामगारांच्या दुर्दशेबद्दल लँकेशायर या प्रतिस्पर्धी कापडउद्योग केंद्रांतून तक्रारी येत असल्यानें येथील भांडवलदारांना आयतेंच विरोध करावयाला फावत असलें तरी वाईट उद्देशानेंच अशा तक्रारी येत असा संशय घेण्याला पुरेसा पुरावा नव्हता. इंग्लंडमध्यें कारखान्यांतील मजूरवर्गाची स्थिति सुधारावी म्हणून लॉर्ड शाफ्ट्सबरी यांनीं पहिला फॅक्टरी ॲक्ट आणला. लॉर्ड शॅफ्ट्सबरी स्वतः कारखानदार नव्हता. तो एक जमीनदार होता परंतु समाजसेवेचें काम तो नेहमीं करीत असे. गरीबांचें दुःख हरावें असें त्याला वाटे व ह्याच तळमळीनें त्यानें मजुरांची स्थिति सुधारावी म्हणून कायदे होण्यासाठीं खटपट केली. इंग्लंडमध्यें कारखानदारी निर्माण झाली तेव्हां शेतमजुरांचा लोंढा शेतीचीं कामें सोडून ह्या कारखानदारीकडे वळला व शेतमजुरांचा तुटवडा पडूं लागला. जर हे मजूर कारखानदारांना परवडेनासे झाले तर पुन्हां शेतींत येतील अशा कल्पनेनें इतर जमीनदारांनी लॉर्ड शॅफ्टस्बरीच्या कायद्याचा पाठपुरावा केला. तेव्हां कारखानदारांना संशयाला जागा झाली. परंतु तो जमीनदाराच्या कुळांत जन्मला हा कांहीं त्याचा दोष नव्हता. हीच स्थिति लँकेशायरच्या सूचनांबद्दल होत असे. त्या दुर्भावनाप्रेरित नसल्या तरी संशय घेण्याला जागा असे परंतु मध्यवर्ति विधिमंडळांत नाना नॉमिनेट झाले व आयू. एल्. ओच्या शिफारसीच्या अनुरोधानें व येथील मजूरसंघटनांचें बळ त्यांच्या पाठीशीं असल्यानें मजुरांची स्थिति सुधारण्यासाठीं येणाऱ्या कायद्यांचा नाना स्वतंत्रपणें पाठपुरावा करूं लागले, व त्यामुळें व्हाइसरायच्या कार्यकारी मंडळांतील मजुर सभासदाचें काम सुकर होऊं लागलें.

---

११

# कामगारांच्या हितासाठीं विधिमंडळांतील लढा

मध्यवर्ति विधिमंडळांत पहिला फॅक्टरी ॲक्ट पास होण्यापूर्वी सरकारनें कमिटी नेमून येथल्या मजुरांची स्थिति तपासली होती. त्या कमिटींत सर ठाकरसी होते व त्यांच्याच बरोबर डॉ. नायर या नांवाचें एक गृहस्थ होते. त्यांनीं कमिटीच्या वृत्तान्ताला स्वतःची अशी मतपत्रिका जोडली व फॅक्टरी ॲक्ट असण्याची जोरदार शिफारस केली. सरकारनें त्यानंतर पहिला फॅक्टरी कायदा पास केला. पहिल्या महायुद्धानंतर मॉटेग्यू-चेम्सफर्ड कायद्यान्वयें मध्यवर्ति विधिमंडळांत लोकप्रतिनिधींची संख्या वाढली. परंतु त्यासाठीं मतदानाचे अधिकार फार मर्यादित होते व ते संपन्न लोकांच्याच वांट्याला आले होते. त्यामुळें एका अर्थानें मध्यवर्ति विधिमंडळांतील लोकप्रतिनिधि म्हणजे संपन्नांचे प्रतिनिधि होते व त्यांचा दबाव सरकारवर वाढणार हें निश्चित होतें. कामगारांना आपले प्रतिनिधि निवडून पाठविण्याचा अधिकार द्यावा या मागणीला वाटाण्याच्या अक्षता लावल्या होत्या. कामगारांचे प्रतिनिधि कशा तऱ्हेनें घ्यावे असा सरकारपुढें प्रश्न होता. आय. एल. ओ. साठीं प्रतिनिधि निवडतांना हीच अडचण होती. ह्या दोन्हींतून मार्ग काढावयाचा तर कामगारांची अखिल भारतीय संघटना असण्याची आवश्यकता होती. मध्यवर्ति विधिमंडळांत पैसेवाल्यांचें प्राबल्य असणार हें उघड होतें. जर कामगार अखिल भारतीय स्वरूपांत संघटित झाले तर त्यांचा दरारा निर्माण होणार हें निश्चित होतें. ह्यामुळें अ. भा. ट्रेड यूनियन कॉंग्रेसची स्थापना करणें आवश्यक होतें व त्याला अनुकूलताही होती. मध्यवर्ति विधिमंडळांत ट्रेड यूनियनतर्फे प्रतिनिधि घ्यावेत ही नानांची सूचना नामंजूर झाली. तेव्हां कामगारांचा आवाज स्वतंत्रपणें मध्यवर्ति विधिमंडळांत उठविण्याचा एकमेव मार्ग म्हणून ते नॉमिनेट झाले.

महायुद्ध आटोपलें होतें. जगभर पुन्हां व्यापार सुरू झाला होता. युद्ध काळांत वहातुकीच्या अडचणीमुळें जो फायदा येथल्या कारखानदारांना झाला तो कमी होत होता. व्यापार डबघाईला येण्याची धास्ती होती. त्यांतून युद्धो-

त्तरकाळांत आय्. एल्. ओ. सारख्या आन्तरराष्ट्रीय कामगारसंघटना निर्माण झाल्यानें दिवसेंदिवस कामगारांच्या सोयी वाढवाव्या लागणार होत्या. ह्या सर्व परिस्थितींत कारखानदारी जगवायची तर सरकारनें संरक्षण दिलें पाहिजे नाहीं-तर जागतिक स्पर्धेत मागासलेल्या देशांतले धंदे कोलमडतील असे विचार पुढें येऊं लागले.

संरक्षणाची मागणी पुढें आली कीं सर्वसाधारणपणें आपल्या देशांतील उद्योगधंद्याच्या वाढीसाठीं बहुतेक सर्व लोकप्रतिनिधि ती उचलून धरीत. नाना आपलें धोरण स्वतंत्रपणें ठरवीत असत. उद्योगधंद्यांना भांडवलदारांनीं संरक्षण मागितलें कीं ते त्याला विरोध करीत नसत पण फक्त त्याला पुस्ती जोडीत असत. उद्योग म्हणजे केवळ भांडवलदार नव्हे. उद्योगांत कामगारांचाहि समावेश झाला पाहिजे असा त्यांचा आग्रह असे. संरक्षण देण्यामुळें जो फायदा होईल त्याचा हिस्सा कामगारांनाही मिळण्याची सोय संरक्षण देणाऱ्या कायद्यांत करावी असें ते आग्रहपूर्वक प्रतिपादित असत. त्यांचा हा मार्ग नवा व तर्कशुद्ध होता. १९२१ सालीं उद्योगधंद्यांच्या विकासासाठीं देशी धंद्यांना उत्तेजन देण्याचें तत्त्व मंजूर झालें व त्यासाठीं टॅरिफ बोर्ड नेमण्यांत आलें. भांडवल-दारांना बिनशर्त संरक्षण पाहिजे होतें. संरक्षित उद्योगधंद्यांतील कामगारांच्याहि हिताचें संरक्षण झालें पाहिजे अशी शर्त असली पाहिजे अशी नानांची सारखी मागणी असे. त्यामुळें त्यांच्यावर इतर सभासद चिडत असत.

मध्यवर्ति विधिमंडळांत नाना बहुतेक सर्वच बैठकांना दक्षतेनें हजर रहात असत. कामगारकायदा म्हणून लेबल लागलेल्या कायद्यांशींच आपल्याला काय तें कर्तव्य आहे असें त्यांनीं कधीं मानलें नाहीं. जीवन हें एक व अखंड असल्यानें प्रत्येक कायद्याचा कामगारजीवनावर कांहींना कांहीं बरावाईट परिणाम होणारच हें ओळखून प्रत्येक कायद्यासंबंधीं ते अभ्यास करीत असत व त्याचा परिणाम कामगारहितावर काय होईल हें पहात असत. आपण एकटेच कामगारांचे प्रतिनिधि आहोंत ही जाणीव ठेवून ते अत्यंत सावधानतेनें सर्व कामकाजांत भाग घेत असत व जेथें जेथें कामगारांचा संबंध येई तेथें तेथें स्पष्टपणें भाषण करून आपलें मत व्यक्त करीत असत. कधीं सरकार कामगारवर्गाच्या हिताचे कायदे आणी. व्हाइसरॉयच्या कौन्सिला

मधल्या मजूर सभासदाला नेहमी असें वाटे कीं आपल्या कारकीर्दींत आपण कांहीतरी चांगलें करावें व लोकांनीं आपल्याला बरें म्हणावें. सरकारनें सुचविलेल्या सुधारणा अगदीं सौम्य असत. अधिक सुधारणा करायचें ठरविलें तर भांडवलदारांच्या प्रतिनिधींच्या विरोधाला मजूर सभासदाला एकाकी तोंड द्यावें लागत असे. पण नाना मध्यवर्ति विधिमंडळांत गेल्यावर सरकारच्या सुधारणा अत्यंत अपुऱ्या असल्याबद्दल ते तक्रार पुढें मांडीत. वॉशिंग्टनच्या आय्. एल. ओ परिषदेच्या निमित्तानें जगांतल्या इतर देशांतील कामगारांची स्थिति त्यांना ठाऊक झाली होती. त्याचें तुलनात्मक चित्र समोर मांडून सरकारचें धोरण कसें अपुरें आहे हें ते दाखवीत असत. त्यांच्यामागें ट्रेडयूनियन कॉंग्रेसची शक्ति आहे हें सर्वांना ठाऊक असल्यानें त्यांच्या भाषणाचा परिणाम होऊन सरकारच्या मजूर सभासदाला त्याची अप्रत्यक्ष मदत होई.

१९२२ सालीं सरकार नवा फॅक्टरी कायदा करणार होतें. हा कायदा चर्चेला यावयाचा त्याचवेळीं आयू. एल. ओची परिषद जिनीव्हाला असल्यामुळें नानांना तेथून यावयाला उशीर लागणार होता. "मला यावयाला ३।४ दिवस उशीर होणार असल्यानें फॅक्टरी ॲक्ट मांडणें पुढें ढकललें तर बरें," असें नानांनी पत्रानें मजूर सभासदाला सुचविलें. पण बिल मांडणें लांबणीवर पडलें नाहीं. त्याचा परिणाम असा झाला कीं कामगारांची बाजू हिरीरीनें मांडणारे विधिमंडळांत कोणीच नसल्यानें सर विठ्ठलदास ठाकरसी यांनीं कायद्याला एक उपसूचना मांडली. कायद्यानें कामगारांना होणारा फायदा कमी करणारी ही उपसूचना कायद्याबरोबरच पास झाली. तेव्हां मजूर सभासदाला नानांची गैरहजरी जाणवली. कामगारांची बाजू नाना उचलून धरीत असल्यानें कायदा निष्प्रभ करणारी कोणतीहि उपसूचना मंजूर करून घेणें शक्य होत नसे.

१९२० सालच्या निवडणुकींच्या वेळीं कॉंग्रेसनें बहिष्कार पुकारला. परंतु त्यानंतर चळवळ बंद झाली व कॉंग्रेसमध्येंच फेरवादी व नाफेरवादी असे दोन पक्ष पडले. चित्तरंजनदास व मोतीलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखालीं स्वराज्यपक्षानें निवडणुका लढविल्या. स्वराज्य पक्षातर्फे निवडून आलेल्यांत दिवाण-चमनलाल होते. ते ट्रेड यूनियन कॉंग्रेसचे पूर्वीं चिटणीस होते. त्यांच्यामुळें सरकारविरोधी पक्षांतही मजुरांची बाजू घेणारे सभासद आले. स्वराज्यपक्ष

येण्यापूर्वीं सारे सभासद भांडवलदारांचेच प्रतिनिधि असत. - मोतीलाल नेहरू व स्वराज्य पक्षांतले इतर लोक केवळ राष्ट्रीय वृत्तीचे होते व सरकारचा पराभव करण्याच्या हिरीरीनें त्यांनीं कायदेमंडळांत प्रवेश केला होता. भांडवलदारांना त्यांच्या राष्ट्रीय दृष्टीचा फायदा घेणें सोपें असलें तरी मोतीलाल नेहरू स्वतंत्र बाण्याचे होते व दिवाण चमनलाल वगैरेंच्यासाठीं त्यांना उघडपणें भांडवलदारांची बाजू उचलून धरणें जड होतें. गोस्वामी नांवाचे एक श्रीमंत जमीनदार गृहस्थ कायदेमंडळाचे सभासद होते. तेहि चमनलाल यांचे स्नेही असल्यामुळें मजुरांच्या प्रश्नावर नानांच्या बाजूला असत. मध्यवर्ति विधि-मंडळाच्या दुसऱ्या निवडणुकीनंतर पुन्हा नानांची नेमणूक सरकारनें केली. ह्या दुसऱ्यावेळीं त्यांचें काम अधिक सुकर झालें. सरकारनें नेमलेल्या सभा-सदांत नाना मजुरांच्या बाजूनें भाग घेत असत तर लोकप्रतिनिधींच्या बाजूनें दिवाण चमनलाल वगैरे मंडळी नानांचा पाठपुरावा करीत. पूर्वीं सरकारतर्फे कामगार हितासाठीं केलेले कायदे पास होणेंही जरा जिकिरीचें होत असे. परंतु आतां कायद्यांत कामगारांच्या हिताच्या दृष्टीनें कांहीं सुधारणा ते सुचवूं लागले व त्यांच्या लहानसहान उपसूचना मंजूरही होऊं लागल्या.

## १२

# मध्यवर्ति विधिमंडळांतील कामाचें धोरण

सरकारनें कामगारहिताचे सर्व कायदे एकदम पास करावे अशी एकान्तिका मागणी नाना करीत नसत. सरकारला तसें करणें शक्य नव्हतें. तशी मागणी करणें नानांना श्रेयस्करही वाटत नसे. त्यामुळें अव्यवहार्य सूचना ते करीत नसत. शक्यतेंतील अशा त्यांच्या उपसूचना असत. अव्यवहार्य उपसूचना करून त्या न मिळण्यापेक्षां नेमस्त सूचना करून त्या पदरांत पाडून घेणें कामगारांच्या हिताच्या दृष्टीनें फायदेशीर ठरेल असें त्यांचें मत आणि अनुभव होता. कायद्यावर एकाच माणसाला एका मागोमाग एक अशा अनेक सूचना मांडतां येतात. तेव्हां नानांची एखादी सूचना नापास झाली कीं ते पहिल्या उपसूचनेपेक्षां अधिक नेमस्त दुसरी व कधीं ती नापास झाल्यास दुसरीपेक्षांही कमी मागणी करणारी तिसरी मांडीत असत. मिळेल तेवढे कामगारांच्या पदरांत पाडून घ्यावयाचें असा त्यांचा रिवाज होता. या धोरणाचा फायदा होत असे. पुष्कळ वेळां नेमस्त उपसूचना मांडली तर लोक काय म्हणतील असा विचार ते करीत नसत, कारण लोकांची भीति हाही एक भित्रेपणाच आहे असें ते म्हणत. मिळेल तेवढें ते कामगारांच्या पदरांत पाडून घेत असत. कामगारबंधूंच्या सर्व सिलेक्ट कमिट्यांवरही ते काम करीत असत. त्यावेळीं कांहीं कामगारहित साधण्याचा ते प्रयत्न करीत. पण जर इच्छेनुरूप फारसें जमलें नाहीं तर निदान "ह्या विषयाचा पुनः दोन वर्षांनीं विचार व्हावा" अशी पुस्ती जोडून घेत असत. त्याला फारसा विरोध होत नसे. परंतु सरकारी वृत्तांतांत हें जोडलें गेलें कीं सरकारला त्याचा विचार करावा लागे व त्यावेळीं पुनः कामगारांची दाद लावून घेण्याचा प्रयत्न करण्यांत येत असे.

मध्यवर्ति कायदेमंडळांत त्यांनीं बिनसरकारी म्हणून कांहीं बिलें मांडलीं. स्त्री मजुरांना बाळंतपणापूर्वी व नंतरही हक्काची रजा मिळावी अशासाठीं त्यांनीं एक बिल मांडलें होतें, त्यावर खूप चर्चा झाली परंतु बिल पास होऊं शकलें नाहीं. परंतु त्यावरील वादविवादाची दखल सरकारला घ्यावी लागली. त्यावेळीं जरी तो कायदा झाला नाहीं तरी पुढें प्रांतिक कायदेमंडळांनीं तशा प्रकारचे कायदे पास करून घेतले.

चळवळीवरील अस्तित्वांत असलेलें एक प्रकारचें नियंत्रण काढून घेण्या-संबंधाचें एक बिल होतें. तेंही पास झालें नाहीं. त्यांनीं तिसरें बिल आणलें होतें त्यावेळीं पीनल कोडांत कामगारास त्रासदायक वेठीच्या कामाच्या स्वरूपाची कांहीं कलमें होतीं, ती रद्द करून घेणें हा एक त्या बिलाचा उद्देश होता. त्याशिवाय वेठकाम करण्यासंबंधाचे कॉंट्रॅक्ट मोडणें हा त्यावेळीं फौजदारी गुन्हा समजण्यांत येणारे कांहीं कायदे होते ते रद्द करून घेणें हाही त्या बिलाचा उद्देश होता. हें बिलही पास झालें नाहीं. पण सरकारनें अशाच धर्तीचा कायदा करण्याचें आश्वासन दिलें व त्यांच्या बिलांतील तत्त्व मान्य केलें. साधारण माणसांनी बिल तयार केलें तर त्यांत कायद्याच्या दृष्टीनें उणीवा रहा-ण्याचा संभव असतो कारण तज्ञाचा सल्ला त्याला मिळत नाहीं. त्यामुळें सरकारनें त्यांच्या बिलामागील तत्त्वग्रहण केल्यामुळें त्यांनीं समाधान मानलें. पुढें सरकारनें आपलें आश्वासन पाळलें व त्यांनीं सुचविलेलीं सर्व अनिष्ट कलमें व कायदे रद्द केले.

साधारणतः बिल पास झालें म्हणजे तो कायदा बनतो व त्याची अंमलबजावणी सरकारला करावी लागते. परंतु बिलामागें ठराव म्हणूनही एक प्रकार असतो. ठरावाचें स्वरूप शिफारसवजा असतें. त्यांत कांहीं गोष्टी घडाव्या अशी अपेक्षा व्यक्त केलेली असते. अशा प्रकारचे ठराव त्यांनीं बिलां-पेक्षां अधिक संख्येनें मांडले. त्यांचे ठरावही मजूर विषयक प्रश्नाबाबतच असत. याशिवाय साधारणतः रोजचा एक तास प्रश्नोत्तरासाठीं असतो. कांहीं प्रश्नांना तोंडीं उत्तरें दिलीं जातात व कांहींचीं लेखी देण्यांत येतात. प्रश्नोत्तराच्या दृष्टीनेंही ते पुष्कळच महत्त्वाचे प्रश्न विचारीत असत.

परंतु पुढें नानांना नागरीक स्वातंत्र्याचें महत्त्व अधिक वाटूं लागलें व त्याही प्रश्नांत ते लक्ष घालूं लागले. १९४० सालीं युद्धविरोधी सत्याग्रह चालू असतां नागरिक स्वातंत्र्याची सरकारनें चालविलेली गळचेपी थांबवावी व सर्व सत्या-ग्रहींना बंधमुक्त करावें अशा अर्थाचा ठराव त्यांनीं मांडला. सरकारनें त्यांच्या ठरावामागील तत्त्व मान्य केलें व सर्व राजबंद्यांच्या प्रकरणांचा विचार करण्याचें कबूल केलें तेव्हां त्यांनीं ठराव मागें घेतला व पुढें सर्व राजबंद्यांची सुटका झाली.

बिल, ठराव, उपसूचना, प्रश्न या सर्व कायदेमंडळी मार्गांचा अवलंब नाना विशिष्ट तऱ्हेनें करीत असत; त्यांचा मुख्य हेतु, बिल, ठराव, उपसूचना प्रश्न इत्यादि सुचवितांना असा असे कीं लोकांच्या पदरांत अधिकांत अधिक गोष्टी पडाव्यात; या दृष्टीनें ते कोणत्याही गोष्टीचा आत्यंतिक आग्रह न धरतां नेमस्तपणाचें धोरण ठेवीत असत. त्यांनीं मांडलीं त्यापेक्षां अधिक बिलें त्यांना कायदेमंडळांत मांडतां आलीं असतीं असें वाटतें. पण ठरावापेक्षां बिल तयार करण्यास अधिक वेळ लागतो. कायद्याचें सखोल ज्ञान असावें लागतें. त्यांना तितका वेळ मिळत नसे. कारण त्यांना वेगवेगळीं चार प्रकारचीं कामें करावीं लागत.

(१) मजूर संघटनांत काम.

(२) कायदेमंडळांत त्यांचे चार महिने खर्च होत.

(३) कायदेमंडळाच्या वेगवेगळया कमिट्यांवर सभासद म्हणून काम करण्यांतही बराच वेळ खर्च होत असे.

(४) परदेशांत भरणाऱ्या वेगवेगळया मजूर परिषदांना त्यांना जावें लागे व त्यासाठीं तयारी करावी लागे.

साहजिक यामुळें बिलें तयार करण्यास आवश्यक तो वेळ त्यांना मिळत नसे.

देशांतल्या मजूरसंघटनांनीं वास्तविक आपापल्या क्षेत्रांत आवश्यक असलेलीं बिलें तयार केलीं पाहिजेत. त्यांचा प्रत्यक्ष मजुरांशी संबंध असल्यानें त्यांना त्यांतील खांचाखोंचा अधिक चांगल्या रीतीनें ठाऊक असतात. इंग्लंड-मध्यें कामगार संघटना असें करतात. एका माणसाच्या शक्तीला व ज्ञानाला मर्यादा असतात पण त्यांचा प्रतिनिधि म्हणून जो जातो त्यांनीं जर काम करावयाचें ठरविलें तर आपल्या मर्यादित शक्तीनेंही तो खूप काम करूं शकतो. नाना मजुरांत काम करणाऱ्यांना सांगत कीं तुम्ही या दृष्टीनें काम करा. बिलें तयार करा, त्यावर चर्चा करा, व तुमच्यापैकीं जे कोणी कायदेमंडळांत असतील त्यांच्यामार्फत तें मांडण्याची खटपट करा. पण अजूनही आमच्या यूनियन्स हें करीत नाहींत. अशा कामामुळें त्यांची कार्यक्षमता वाढेल व कामगार हिताचें कार्यही जास्त होईल. आज जी केवळ निषेधात्मक शक्ति त्यांच्यांत दिसते

त्याऐवजीं विधायक वृत्तीचें दर्शन होऊं लागेल. पण अजूनही कार्यकर्त्यांनीं हें मनावर घेतलें नाहीं. जर यूनियन्सकडून अशा प्रकारें कायद्याची रूपरेषा तयार करण्यांत आली व त्या मसुद्यांतील दोष त्यांनीं आपल्या वकिलामार्फत निवारण करून घेऊन तो कायदेमंडळांत मांडला गेला तर नवें वळण मिळेल असे ते म्हणत.

वेगवेगळया धंद्यांना संरक्षण देण्याचा प्रश्न कायदेमंडळांत येई. नाना स्वतः संरक्षणाच्या विरुद्ध नव्हते, परंतु एकदां संरक्षण मिळालें कीं व्यापारी त्याचा दुरुपयोग करतात. मग त्यांना धंदा चांगल्या रीतीनें चालावा अशी तांतडी वाटत नाहीं. स्वतांच्या पायावर उभे रहाण्याचा प्रयत्न ते करीत नाहींत. सरकारनें उद्योगधंद्यांना संरक्षण दिलें कीं त्याचा फायदा व्यापाऱ्यांना मिळतो, तसाच तो कामगारांनाही मिळाला पाहिजे अशी मागणी ते करीत असत.

व्यापाऱ्याला संरक्षण देण्याच्या दोन पद्धति असतात. (१) आयात होणाऱ्या मालावर जकात बसवून परदेशाच्या मालाची स्पर्धा नाहींशी करणें. अर्थात् परदेशाहून येणारा माल गिऱ्हाइकाला महाग पडतो व ही जकात अप्रत्यक्षपणें देशांतील गिऱ्हाइकांकडूनच वसूल केली जाते. ही पद्धत अप्रत्यक्ष असल्यामुळें लोकांना संरक्षणाकरतां महाग वस्तु विकत घेऊन किती स्वार्थ-त्याग करावा लागतो त्याची मोजदादही होत नाहीं. म्हणून नाना उद्योगधंद्याना (२) प्रत्यक्ष मदत देण्याचा मार्ग अधिक पसंत करत. त्यांत कोणत्या कोणत्या धंद्याला किती रक्कम दिली जाते हें प्रत्यक्ष लोकांना समजतें. व त्यामुळें अधिक जागरूकपणें ते त्या धंद्याकडे बघतात. सबसिडि देण्यासाठीं जरूर तर लोकांवर करही बसवावा असें त्यांना वाटे. अप्रत्यक्ष मदतीपेक्षां प्रत्यक्ष मदत करणें फायदेशीर ठरेल कारण त्यामुळें प्रत्यक्ष रकमेचा अंदाज येईल असें आपलें म्हणणें ते या प्रश्नावरील चर्चेच्या वेळीं मांडीत असत. धंद्याला संरक्षण याचा अर्थ केवळ भांडवलदाराला संरक्षण असा होऊं न देतां त्या धंद्याच्या सर्व घटकांना त्याचा फायदा मिळाला पाहिजे असा त्यांचा आग्रह असे. साहजिकच मजुरांना त्याचा फायदा मिळावा अशी त्यांची मागणी असे.

धंद्याना संरक्षण देण्याप्रमाणेंच वेगवेगळया प्रकारच्या कर आकारणीचा प्रश्न चर्चेला येत असे. करांना नाना विरोध करीत नसत. पण कराची आकारणीही

दोन प्रकारची होते. ( १ ) प्रत्यक्ष ( २ ) अप्रत्यक्ष. सरकाराचा कल अप्रत्यक्ष करांकडेच नेहेमीं असतो कारण जनतेला ते कळत नाहींत. परंतु त्यांचें म्हणणें प्रत्यक्ष कर आकारणी करावी असें असे. जनतेला अधिक सुखसोयी करून द्यावयाच्या तर अधिक कर जनतेनें दिले पाहिजेत. पण कर जनतेच्या दैनंदिन आवश्यक वस्तूंवर नसावेत. त्यांना सर्वांत पसंत इन्कमटॅक्स. तो वाढत्या उत्पन्नाप्रमाणें वाढता बसविला म्हणजे राज्यकारभारासाठीं आवश्यक उत्पन्न मिळतें आणि सामान्य जनतेवर त्याचा भार पडत नाहीं. ज्यांना रोजच्या जीवनाची अडचण त्यांच्यावर आणखी भार टाकण्यापेक्षां चार खुशालचेंडूंची चैन थोडी कमी झाली म्हणून कांहीं बिघडत नाहीं.

जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठीं सरकार नोकरकपातीचें धोरण अवलंबितें. तेंही त्यांना पसंत नसे. राज्यकारभारांत होणारी उधळमाधळ थांबवावी पण जरूर तेवढा नोकरवर्ग ठेविल्याशिवाय कार्यक्षमतेनें कारभार चालत नाहीं. सरकारचा होणारा खर्च शहाणपणानें केला जावा व त्याचा फायदा गरीब जनतेला मिळावा असें त्यांचें धोरण असे.

कायदे मंडळांत रेल्वेच्या कारभारावर चर्चा निघाली कीं नाना तिसऱ्या वर्गाच्या उतारूंच्या अडचणी मांडून सरकारच्या धोरणावर टीका करीत असत. रेल्वेला तिसऱ्यावर्गाकडून जितके टक्के उत्पन्न मिळतें तितके टक्के खर्च त्या वर्गासाठीं केला जात नाहीं. उलट कमी टक्के देणाऱ्या वरच्या वर्गासाठीं सरकार अधिक खर्च करतें हें ते आंकड्यावरून दाखवीत असत व तिसऱ्या वर्गाच्या उतारूंच्या अडचणी निवारण करण्यासाठीं उपाययोजना करण्याची मागणी करीत असत.

जनतेच्या नागरिक हक्कावर निर्बंध घालणाऱ्या सरकारच्या धोरणाला नानांचा विरोध असे. शांततेच्या मार्गानें आपली गाऱ्हाणी मांडण्याचा हक्क जनतेला असलाच पाहिजे असें ते मानीत. गांधीजींनीं आपल्या सर्व लढ्यांना अहिंसेचें बंधन घातल्यानें त्यांच्याशीं इतर बाबतींत मतभेद असले तरी ते व्यक्त करण्याचा प्रसंग येत नसे. गांधीजींचें राजकारण वेगळें होतें व त्यांचें वेगळें होतें.

## १३

# मध्यवर्ति विधिमंडळांतील कामाचें धोरण—पुढें चालू

पूर्वी मध्यवर्ति विधिमंडळांत सरकार कांहीं सभासद-नियम करीत असे, मध्यवर्ति विधिमंडळाच्या मतदारांची संख्या अत्यंत मर्यादित असे व विशिष्ट कर देणाऱ्यांनाच मतदानाचा हक्क असे. त्यामुळें देशांतील मजूर वर्गाच्या प्रतिनिधींना तेथें निवडून जाणें कठीण. ही अडचण सरकारच्या ध्यानीं आणून दिल्यावर त्यांनीं मतदानाचा हक्क व्यापक न करतां मजुरांचें प्रतिनिधित्व करणारी एखादी व्यक्ति नॉमिनेट करण्याचा पायंडा पाडला. नानांना निवडतांना त्यांच्या नेमणूक पत्रांत स्पष्टपणें "कामगार हिताची जपणूक करण्यासाठीं" असें लिहित. वरिष्ठ कायदेमंडळांत दोनपक्ष असत. एक सरकारचा पक्ष व दुसरा विरोधीपक्ष. त्यामुळें नानांनीं काय धोरण ठेवावें असा प्रश्न साहजिकच त्यांच्यापुढें उभा रहात असे.

आपल्या धोरणासाठीं नानांनी एक निकर्ष ठरवून ठेवला होता. जर प्रौढमतदानपद्धतीनें निवडणूक होऊन कामगार प्रतिनिधि निवडून आले असते तर ते कसे वागले असते ? असा ते स्वतः विचार करीत असत व त्यानंतर आपलें धोरण ठरवीत असत. कामगारसंघटनाशीं त्यांचा जिव्हाळ्याचा संबंध असल्यानें त्यांच्या काय अपेक्षा आहेत हें त्यांना चांगल्या रीतीनें ठाऊक असे. कुठल्याही राजकीय पक्षाशीं त्यांनीं आपल्याला बांधून घेतलें नाहीं. सरकारनें त्यांची नेमणूक केली असली तरी इतर सभासदांच्या नेमणुकींत व त्यांच्या नेमणुकींत फरक असे, त्यांच्या नेमणूकपत्रांत " कामगारांच्या हिताची जपणूक " करण्याचा स्पष्ट उल्लेख असे. त्यामुळें इतर नियुक्त सभासदांप्रमाणें सदैव सरकारचा पाठपुरावा करण्याचें त्यांना कारणच नव्हतें. त्यांची दृष्टि नक्की ठरलेली असल्यानें ते पक्षाच्या दृष्टीनें विचार न करतां प्रत्येक प्रश्नाचा कामगारदृष्टीनें विचार करीत व आपल्या सद्सद्विवेक बुद्धीचा कौल घेऊन निर्णय घेत असत.

लोकशाहीमध्यें मन वळविण्याच्या मार्गाला अर्थातच स्थान आहे. त्यामुळें सरकार पक्षाचे प्रतोद त्यांना आपल्या बाजूनें मत देण्यासाठीं वळविण्याचा

प्रयत्न करीत. त्याप्रमाणेंच ज्यावेळीं सरकारविरोधी पक्षाला ५।१० मतांचा प्रश्न पडे तेव्हां काँग्रेसचे प्रतोदही त्यांच्याकडे येत असत. विधिमंडळांत जे सभासद स्वतंत्र असतात त्यांचीं मनें वळविण्याचे असे प्रयत्न नेहेमींच होत असतात. ते स्वतःला स्वतंत्र सभासद समजत असत व सरकारविरोधी पक्ष त्यांना तसें मानीत असे, हें त्यावरून दिसून येई. परंतु स्वतंत्र सभासदाला प्रत्येक वेळेला आपलें मत बनविणें कठीण असतें. कामगार प्रश्न चर्चेला येत तेव्हां नानांचा कामगारसंघटनांशीं प्रत्यक्ष संबंध असल्यानें मत देण्यांत त्यांना अडचण पडत नसे. परंतु जनहिताचे इतरही अनेक प्रश्न तेथें चर्चेला येत, त्यावेळीं सरकारला विरोध हें राष्ट्रियत्वाचें लक्षण मानलें जात असे. पक्षाच्या सभासदाचें काम स्वतंत्र सभासदांच्या कामापेक्षां फार सोपें असतें, कारण सबंध पक्ष त्या त्या प्रश्नावरील धोरण ठरवीत असतो व त्याप्रमाणें सर्व सभासदांना मतें द्यावयाचीं असतात. याउलट स्वतंत्र धोरणानें वागणाऱ्या सभासदांची स्थिति असते. विधिमंडळांत होणाऱ्या भांडणांचा त्याच्यावर परिणाम होण्याची शक्यता असते व वादविवादपटु ज्यांच्याकडे असतील त्यांच्याच बाजूला मत दिलें जाण्याचा संभव निर्माण होतो. नानांना आपलें मत बनवितांना विधिमंडळांतील भाषणें ऐकून केवळ त्याचाच प्रभाव राहूं नये म्हणून तीं मनःपटावरून पुसून मत बनवावें लागे. सूचना उपसूचना ठरावावर येतात व त्याविषयीं विचार करावा लागे. या त्यांच्या धोरणामुळें कांहीं कांहीं ठरावाच्यावेळीं ते मतदान करीत नसत.

विधिमंडळासमोर मजुरांच्या प्रश्नाशिवाय इतर प्रश्न चर्चेला येत असत. तेव्हां जगांतल्या वेगवेगळ्या देशांतील कामगारहितेच्छु पक्षांची त्या स्वरूपाच्या प्रश्नावर काय मतें आहेत याचाही नाना अभ्यास करीत असत. त्यावेळीं सोशालिस्ट आणि कम्युनिस्ट यांचीं मतें आजच्या इतकीं वेगळीं नव्हतीं त्यामुळें इतर देशांतील या पक्षांचीं मतें एकसारखींच असत. ब्रिटिश लेबर पार्टीच्या वृत्तान्तामधून त्यांचें वेगळ्या प्रश्नांसंबंधीचें धोरण समजत असे. त्यांचीं मतें सोशालिस्ट असल्यानें ह्या अभ्यासाचा त्यांना उपयोग होत असे. परंतु त्यांचें धोरण स्वतंत्र असल्यानें तें लोकांना पटतच असे असें नाहीं. सरकार विरोधी ते सारे देशभक्त व सरकारच्या बाजूनें मतें देणारे ते सारे देशद्रोही असा

एकांतिक समज पुष्कळ लोकांचा असे. पण काँग्रेसचें तेवढें सारें राष्ट्रीय असें त्यांचें समीकरण नव्हतें. ना. गोखले यांच्या परंपरेंत ते वाढलेले असल्यानें पक्ष म्हणजे सत्य अशी आग्रही वृत्ति त्यांची नव्हती. काँग्रेस म्हणजे जनता असेंही ते मानीत नसत. अर्थांत लोकांची कल्पना वेगळी होती.

विधिमंडळांत काँग्रेसपक्षाचें धोरण सरकार विरोधाचें असे. काँग्रेसचें स्पष्ट असें आर्थिक धोरण नसल्यानें काँग्रेसपक्षाची आर्थिक बाबतींत मतें भांडवलदारांशीं जुळतींच असत. मजूर प्रश्नाबाबत सुद्धां सुरवातीला राष्ट्रीय समजल्या जाणाऱ्यांचें धोरण भांडवलदारांसारखेंच असे. आरंभीच्या काळांत सरकारनें फॅक्टरी ॲक्ट विधिमंडळांत मांडला तेव्हां तें देशाच्या हिताच्या विरोधी आहे असें मानण्यांत येत असे. परंतु पुढें ट्रेड युनियन चळवळ निघाली, श्री. व्ही. व्ही. गिरी, दिवाण चमनलाल ही मंडळी काँग्रेसपक्षांत होती, आणि इकडे ट्रेड यूनियनमध्यें काम करीत. त्यांचे व नानांचे सहकार्याचे संबंध असत. पुढें पुढें कामगारांच्या प्रश्नांबाबत काँग्रेसपक्षाचें धोरण ठरवितांना श्री. गिरी व दिवाण चमनलाल यांच्या मतांचा थोडा फार प्रभाव पडूं लागला. सरकार जे कामगार–कायदे विधिमंडळापुढें आणी ते फार क्रान्तिकारक होते असे नव्हे पण तरीहि त्यांना भांडवलदारीचा विरोध असे व ते कायद्यानें देऊं केलेले फायदे कामगारांच्या पदरांत पडूं नये अशी उपसूचना वगैरे मांडून खटपट करीत. सरकारनें देऊं केलेलें अपुरें आहे असें मांडून आणखी हक्कांची मागणी करण्याच्या उपसूचना नाना मांडीत असत. ट्रेड यूनियनमध्यें काम करणारे काँग्रेसपक्षांतील लोक त्यांच्या उपसूचनांना पाठिंबा देत त्यामुळें त्या उपसूचना जरी पास झाल्या नाहींत तरी भांडवलदारांच्या उपसूचना बारगळत व सरकारचे ठराव पास होत. सरकारच्या विरुद्ध वेळप्रसंगीं नाना मतदान करीत असले तरी कामगार खातें सांभाळणाऱ्या व्हॉइसरॉयच्या कारभारी मंडळांतील सभासदाला त्यांचा उपयोग होत असे व त्यामुळें वेळोवेळीं त्यांची केंद्रिय मंडळांत नेमणूक होत असे.

नानांनीं आपल्याला कोणत्याही पक्षाशीं बांधून घेतलेलें नसलें तरी लोकांचा त्यांच्यावर विश्वास होता. कामगारसंघटनांत ते भाग घेत असल्यानें विधिमंडळांतील त्यांचें धोरण ते त्यांना समजावून सांगत असत. त्यामुळें कामगार

संघटनांनीं त्यांच्या धोरणाविरुद्ध कधींच मतप्रदर्शन केलें नाहीं, किंवा कामगारांचा प्रतिनिधि म्हणून त्यांचा समावेश होण्याला विरोधही दर्शविला नाहीं. उलट भांडवलदारांच्या विरुद्ध मत दिलें कीं त्यांच्याच आधीन असलेलीं वर्तमान पत्रें त्यांच्या विरुद्ध लिहीत पण त्याचा परिणाम नानांच्या दृष्टीनें फारसा विरुद्ध होत नसे.

पुढें नागपूरच्या ट्रेड यूनियन कॉंग्रेसच्या अधिवेशनाच्या कांहीं दिवसापूर्वी सरकारनें कामगारप्रश्नांची चौकशी करण्याकरतां एक रॉयल कमिशन नेमलें. मध्यवर्ति विधिमंडळांतील कामगारांचा प्रतिनिधि या नात्यानें सदर्हू कमिशनचा सभासद म्हणून नानांची नेमणूक झाली. परंतु नागपूरच्या ट्रेड युनियन कॉंग्रेसच्या अध्यक्षपदीं जवाहरलाल नेहरू होते व त्या अधिवेशनांत रॉयल कमिशनवर बहिष्कार टाकावा असें ठरलें, त्यावेळीं नानांना ट्रेड यूनियन कॉंग्रेसच्या बाहेर पडावें लागलें. श्री. गिरी यांचें मत नानांच्या मताप्रमाणें होतें. परंतु आजच्यप्रमाणें राजकीय पक्ष आपल्या सभासदांकडून सर्वकाळ निष्ठेची अपेक्षा त्यावेळीं करीत नसत. त्यामुळें कुठें थोडेसें इकडेतिकडे झालें कीं लगेच शिस्तभंगाचा बडगा उभारण्यांत येत नसे. त्यामुळें श्री. गिरी व दिवाण चमनलाल यांची मजूर प्रश्नाबाबतचीं मतें कॉंग्रेस पक्षाच्या एकवट धोरणापेक्षां भिन्न असूनहि ते कॉंग्रेस पक्षांत राहूं शकले.

सरकारनें नानांची नेमणूक केली तरी त्यांनीं त्याचा सदैव पाठपुरावा करावा अशी सरकार अपेक्षा करीत नसे. नानाही स्वतंत्र धोरणानें वागत असत. आणीबाणीच्या वेळीं सरकार पक्षाचे प्रतोद त्याच्या बाजूनीं नानांनीं मत द्यावें म्हणून सुचवायला येत. विरोधी पक्षाचे प्रतोदही तसा प्रयत्न करीत व त्यांत वावगें कांहीं नाहीं. लोकशाहींतील विधिमंडळांत असें चालायचेंच.

परंतु एकदां मात्र पेंचप्रसंग निर्माण झाला. त्याचें वर्णन नानांनीं खालीं दिल्याप्रमाणें केलें आहे. " ग्रिग नांवाचे एक इंग्रज गृहस्थ त्यावेळीं अर्थमंत्री होते. सरकारनियुक्त सभासद असूनही मी स्वतंत्रपणें मतप्रदर्शन करतों हें त्यांना खटकलें. ते म्हणाले, ' सरकारनें तुमची नेमणूक करावी म्हणून मी तुम्हांला मत दिलें आहे. असें असून तुम्ही सरकार विरोधी मतप्रदर्शन कसें करतां ! ' मी सांगितलें ' मी कांहीं मत मागायला आलों नव्हतों. कामगारांच्या

हिताची जपणूक करण्यासाठीं माझी नेमणूक होत असते व नेमणूक पत्रांत तसा निर्देशही असतो.' पण त्यांना हें मानवेना. कामगार खात्याचें काम पाहणाराला मी हवा असे. परंतु ग्रिग कामगारखातें पहाणारे सभासद नॉइस यांना उपद्रव देऊं लागला. तोंडाचा तो वाईट असल्यानें खाजगी संभाषणांत वाटेल तें निरर्गल बोले. इतर सरकारनियुक्त सभासद सदैव सरकारच्या बाजूनें मतें देत. कारण सरकारच्या कृपाछत्राखालीं राहाण्याची त्यांची इच्छा असे. त्यामुळें माझी स्वतंत्र वागणूक त्यांच्या डोळ्यांत सलत असे. 'कामगारांचा प्रतिनिधि म्हणून नेमणूक झालेली असल्यानें त्यांची गोष्ट निराळी आहे.' असें सरकारच्या वतीनें ग्रिगला उत्तर देण्यांत येत असे. नॉइस हा माझा स्नेही. जेव्हां त्याला फारच उपद्रव होऊं लागला तेव्हां मी म्हणालों 'स्वतंत्र मतदानाचा हक्क मीं कांहीं सोडणार नाहीं, हवा तर राजीनामा देतों तुझा त्रास वाचविण्यासाठीं. पण मी समाजसेवक आहे. मला जनतेला राजीनाम्याचीं कारणें सांगावीं लागतील. तेव्हां माझी वरिष्ठ विधिमंडळांत कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें नेमणूक करावी म्हणजे मला व तुम्हांलाही अडचण होणार नाहीं, आतां कनिष्ठ विधिमंडळाचें काम मला झेंपतही नाहीं. वरिष्ठ विधिमंडळांत कामगार प्रश्नावर मीं आपलीं मतें मांडूं शकेन आणि त्यांचीं अधिवेशनें फार काळ चालत नसल्यानें मलाही सोईचें होईल. आणि खरोखरच मी विधिमंडळाचें काम सतत वीस वर्षें करीत असल्यामुळें कांहींसा कंटाळलेलाही आहे.' मला कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें नेमण्याची कल्पना नॉइससाहेबालाही पटली; कारण तेथें सरकारचें बरेंच मोठें बहुमत असल्यानें मीं कसें मतदान करतों याला महत्त्व नव्हतें."

मी राजीनामा देण्याची तयारी दर्शविल्याची बातमी नॉइसनें व्हाइसरॉयच्या कानीं घातली. तेव्हां आयर्विन व्हाइसरॉय होते. ते म्हणाले "वरिष्ठ विधिमंडळांत घातले तरी तेवढ्यानें प्रश्न मिटणार नाहीं. राजीनाम्याची चर्चा सर्वत्र होईल. आणि विधिमंडळांत एकाच मतानें कायदा नापास होण्याचा तरी प्रसंग कोठें येतो कीं जोशी कोणत्या बाजूनें मत देतात यावरच सारें भवितव्य अवलंबून रहावें! शिवाय नापास झालेल्या कायद्याला जीवदान देण्याची सत्ता माझ्यापाशीं आहेच. त्यांना विधिमंडळांतच राहूं द्या."

व्हाइसरायांच्या या बोलण्यामुळें मी आपला राजीनामा परत घेतला. एक फायदा झाला कीं माझा मतदान करण्याचा हक्क मात्र शिक्कामोर्तब झाला व त्या विरुद्ध "ब्र" काढण्याचेंहि कारण ग्रिगला उरलें नाहीं.

## १४

## गोखले एज्युकेशन सोसायटी तर्फे नानांचा सत्कारसमारंभः—

बुधवार ता. २० डिसेंबर १९५० रोजीं गोखले एज्युकेशन सोसायटीतर्फे नानांचा सत्कार करण्यांत आला. अध्यक्षस्थानीं श्री. वैकुंठलाल मेहेता हे होते. सुरवातीला संस्थेचे सेक्रेटरी श्री. जी. व्ही. गाडगीळ यांनीं प्रसिद्ध सार्वजनिक व्यक्तींकडून आलेले संदेश वाचून दाखवले. त्यानंतर संस्थेचे चेअरमन श्री. टी. ए. कुळकर्णी, नाना यांनीं गेल्या ४५ वर्षांत हातीं घेतलेल्या कार्याचें वर्णन करतांना म्हणाले, "श्री. जोशी हे १९०९ सालीं सव्हर्टस ऑफ इंडिया सोसायटीला येऊन मिळाले; आणि जरी ते १९४० सालीं त्या संस्थेंतून निवृत्त झाले तरी पूर्वीप्रमाणेंच भारताच्या सेवेचें काम त्यांनीं चालू ठेवलें आहे. कोणत्याहि शैक्षणिक संस्थेजवळ नाहीं अशी घटना त्यांनीं गोखले एज्युकेशन सोसायटीला करून दिली ह्याबद्दल ही संस्था त्यांची नेहेमीं ऋणी राहील. त्यांच्या सर्व कामामधील विशेष गुण म्हणजे कर्तव्य-तत्परता, निर्भयता, आणि कुशलता हे आहेत."

श्री. डी. जी. दळवी, श्री. कानजी द्वारकादास आणि श्रीमती मणिबेन कारा यांनींही या प्रसंगीं भाषणें केलीं. श्रीमती मणिबेन कारा यांनीं "हिंदुस्थानांतील कामगार संघटनेच्या चळवळीचे पिताजी," एक मार्गदर्शक मित्र, आणि उद्योगधंद्याचे एक तत्त्वज्ञानी म्हणून त्यांचें अभिनंदन केलें. श्री. व्ही. एल्. मेहेता आपल्या अध्यक्षीय भाषणांत म्हणाले कीं श्री. जोशी यांच्या निरनिराळ्या सामाजिक कार्यामध्यें मी त्यांचा सहकारी होतो. श्री. मेहेता यांनीं श्री. जोशी यांचा एक सद्गृहस्थ व "आपले गुरुजी" म्हणून उल्लेख केला. श्री. जोशी यांच्या सामाजिक कार्यासंबंधी बोलतांना श्री. मेहेता म्हणाले सोशल सर्व्हिस लीग, मुंबई ही संस्था श्री. जोशी यांनीं यशस्वी केलेल्या कार्यापैकीं एक अति उत्तम संस्था असून ती संस्था त्यांच्या सामाजिक कार्याचें शाश्वत स्मारक आहे. ते पुढें म्हणाले, मुंबईतील सहकारी चळवळीचा पहिल्यानें पुरस्कार करणाऱ्यापैकीं श्री. जोशी हे एक आहेत.

आपल्या भाषणाच्या आधीं श्री. व्ही. एल्. मेहेता यांनीं श्री. जोशी यांना एक स्मृतिचिन्ह अर्पण केलें. त्यानंतर श्री. जोशी यांनीं समाजाची व विशेषतः

कामगार वर्गाची जी सेवा केली त्याकरितां आपला आदर व्यक्त करण्याकरितां १०० वर निरनिराळ्या संस्थांनीं श्री. जोशी यांना हार अर्पण केले.

उत्तरादाखल भाषण करितांना नाना म्हणाले, "आयुष्यामध्यें अनुकूल संधि मिळण्याचें भाग्य मला लाभलें, माझ्या मोठेपणाचें श्रेय माझे सहकारी, माझे आईबाप, आणि माझे थोरले बंधु यांना दिलें पाहिजे. त्यांनीं जर मदत केली नसती तर मी माझ्या खेड्यामध्यें तसाच रखडत पडलों असतों." आपल्या जीवनतत्त्वांविषयीं बोलतांना ते म्हणाले कीं इतर कोणत्याहि गोष्टीपेक्षां माझा तडजोडीवर अधिक विश्वास आहे. आणि ते विनोदानें म्हणाले कीं तडजोडीला तयार असणें हें मनुष्याच्या फायद्याचें असतें.

संस्थेच्या नांवापाशीं श्री. जोशी यांचें नांव कायमचें निगडित करण्याकरितां संस्थेच्या चालकांनीं हंसराज प्रागजी ठाकरसी कॉलेज मधून अर्थशास्त्र या विषयामध्यें जास्तींतजास्त मार्क मिळवून बी. ए. च्या परीक्षेंत पास होणाऱ्या विद्यार्थ्याला रु. १००/- चें बक्षीस देण्याचें जाहीर केलें. श्री. एल. एम्. दातार यांनीं आभारप्रदर्शन केल्यानंतर हा गोड समारंभ संपला.

१५

# ब्लॅव्हेट्स्की लॉजमधील सत्कारसमारंभ

गुरुवार ता. ५ जून १९५२ रोजीं श्री. नारायण मल्हार जोशी यांना ७४ वें वर्ष लागलें म्हणून ब्लॅव्हेट्स्की लॅाज हॉलमध्यें निरनिराळ्या जवळ जवळ १०० संस्थांनीं त्यांचा सत्कार केला. हॉल माणसांनीं चिक्कार भरून गेला होता. सत्कार समारंभाच्या कमिटीचे अध्यक्ष दिवाण बहादूर के. एम्. जव्हेरी यांनीं हिंदुस्थान सरकारचे कामगार खात्याचे मंत्री श्री. व्ही. व्ही. गिरी यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी विनंति करून सत्कार समारंभाला सुरुवात केली. अध्यक्ष स्थानापन्न झाल्यानंतर श्री. व्ही. बी. कर्णिक यांनीं निरनिराळ्या प्रांतांचे राजपाल, हिंदुस्थानचे मुख्य प्रधान, आय. एल. ओचे डायरेक्टर जनरल श्री. डेव्हिड मॉर्स, श्री. एम. एन. रॉय आणि दुसऱ्या पुष्कळ नामांकित व्यक्तींकडून आलेले अभिनंदनपर संदेश वाचून दाखविले. श्री. गिरी, श्री. जोशी यांचें गुणवर्णन करितांना म्हणाले. " श्री. जोशी हे कामगारसंघाच्या चळवळीचे पिताजी ", एक श्रेष्ठ सद्गृहस्थ आणि हिंदुस्थानचे स्वार्थत्यागी पुढारी आहेत. माझ्या मताप्रमाणें ज्या थोड्या लोकांनीं द्रव्य अधिकार किंवा सत्ता यांचा कधींही अभिलाष धरला नाहीं त्या पैकीं हे एक आहेत.

हिंदुस्थानांतल्या कामगारवर्गांचें जीवनमान सुधारण्याकरितां सतत काम करण्यावर त्यांची श्रद्धा आहे. श्री. जोशी माझ्या मताप्रमाणें कामगार वर्गाला आपले मूलभूत हक्क मिळवून देण्याचे प्रयत्न करणाऱ्यामध्यें पहिले आणि अग्रगण्य गृहस्थ होत. या कामामध्यें त्यांनीं कामगार कामगारामध्यें त्यांचा पक्ष किंवा पंथ यामुळें कधींही भेद केला नाहीं. श्री. गिरी म्हणाले. " मी श्री. जोशी यांचा शिष्य आहे हे सांगण्यास मला मोठा अभिमान वाटतो. "

आय. एल्. ओच्या हिंदुस्थान शाखेचे डायरेक्टर डॉ. पी. पी. पिले म्हणाले. " श्री. जोशी हे हिंदुस्थानांतल्या कामगार चळवळीचे प्राण आहेत. श्री. जोशी यांचा कामगार क्षेत्रांतील प्रत्येक चळवळीशीं संबंध आलेला असून ज्या ज्या क्षेत्रांत त्यांनीं काम केलें त्या त्या क्षेत्रांत त्यांनीं आपली छाप बसविली.

पहिली आशियायी कामगार परिषद घडवून आणण्यांत श्री. जोशी यांचा शहाणपणा व दूरदर्शीपणा स्पष्टपणें दिसून आला.”

श्री. दिनकरराव देसाई, श्री. जोशी यांचा हिंदमझदूर सभेच्या वतीनें सत्कार करतांना म्हणाले कीं श्रीनिवासशास्त्री यांनी श्री. जोशी यांच्यासंबंधीं म्हटलेल्या खालील उक्तीचें मला या प्रसंगीं स्मरण होतें :—

“जी गोष्ट हिंदी कामगार चळवळीच्या बाबतींत श्री. जोशी यांना माहीत नव्हती ती लक्षांत घेण्याच्या लायकीची नव्हती.” मी, श्री. जोशी यांचा शिष्य आहे. असें श्री. देसाई म्हणाले.

समाजसेवा संघाचे श्री. त्रिं. आ. कुळकर्णी यांनीं गेल्या ४१ वर्षांमध्यें श्री. जोशी यांनीं समाजसेवासंघासंबंधीं केलेल्या सुरवातीच्या कामाचा उल्लेख केला. श्री. कुलकर्णी यांनीं, २८ वर्षांपूर्वी श्री. जोशी यांनीं समाज सेवा संघा-तर्फे स्थापन केलेल्या टेक्सटाईल टेक्निकल स्कूलचा विशेष उल्लेख केला.

समाजवादी पुढारी अशोक मेहेता, श्री. जोशी ह्यांचा आदरपूर्वक सत्कार करतांना म्हणाले कीं श्री. जोशी सबंध देशाच्या एक पिढीच्या स्फूर्तीचें उगम-स्थान आहेत. त्यांनीं हिंदुस्थानच्या कामगार खात्याच्या मंत्र्यांना कामगार चळवळीमध्यें एकी घडवून आणण्याची विनंति केली. श्री. जोशी यांच्या उपदेशानें आणि मार्गदर्शनानें कामगारांच्या निरनिराळ्या वर्गांमध्यें एकी उत्पन्न होईल असें मत त्यांनीं व्यक्त केलें. ते म्हणाले कीं श्री. जोशी यांच्या प्रागतिक तत्त्वज्ञानामध्यें इतर कोठेंही दिसण्यांत न येणारें चैतन्य, आणि प्रामाणिकपणा आढळून येतो. त्यांनीं हा जो दीप प्रज्वलित केला आहे तो कधींही विझूं देतां कामा नये.

कम्युनिस्टांचे पुढारी श्री. मिरजकर म्हणाले, श्री. अशोक मेहेता यांनीं व्यक्त केलेल्या भावनांशीं मी सहमत आहे. माझी एवढीच इच्छा आहे कीं कामगार संघटनेच्या चळवळीमध्यें एकी घडून यावी.

यानंतर श्री. गिरी यांनीं संघटना चळवळींतल्या श्री. जोशी यांच्या मित्रांनीं व श्री. जोशी यांच्या स्वार्थत्यागाबद्दल व चारित्र्याबद्दल आदर असणाऱ्या इतर चाहत्यांनीं गोळा केलेली रुपये १५००० हजारांची थैली श्री. जोशी यांना अर्पण केली. यानंतर जवळ जवळ १०० निरनिराळ्या संस्थांनीं श्री. जोशी यांना

हार घातले. हार घालणारांची गर्दी इतकी झाली कीं ज्यांनीं अगाऊ सूचना दिलेली नव्हती अशा हार घालणाऱ्या गृहस्थांचीं नांवें जाहीर करणें अशक्य झालें.

या कृतज्ञतेनें नाना इतके भारावून गेले कीं कांहीं वेळपर्यंत त्यांना कांहीं बोलतां येणें अशक्य झालें. आपल्या भावना आवरल्यानंतर ते म्हणाले, "ज्या कामाकरितां माझी स्तुति करण्यांत आलेली आहे तें काम माझें एकट्याचें नाहीं. त्यांतला माझा भाग फार लहान आहे. हें सर्व काम माझे सहकारी व स्नेही यांच्या सहकार्याचें फळ आहे. हे माझें मोठें भाग्य. कीं "सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटी" या संस्थेचें मार्गदर्शन मला मिळालें आणि विशेषतः कै. गोपाळ कृष्ण देवधर यांचा बहुमोल उपदेश मला मिळाला.

माझ्या कामाचें ९०% श्रेय संस्थेकडे जावें. दुसरी गोष्ट मी आपल्या नजरेस आणूं इच्छितों कीं, 'सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटी'नें माझ्या योगक्षेमाची व्यवस्था केल्यानें आणि सेवा करण्याची संधि मला दिल्यानें माझें काम सुकर झालें. या देशामध्यें सार्वजनिक कार्यकर्त्याला त्याच्या योगक्षेमाची व्यवस्था केल्याखेरीज आपल्या कामाला सर्वस्वी वाहून घेतां येत नाहीं या गोष्टीची जाणीव लोकांना नाहीं. समाजसेवासंघाचें काम ४० वर्षांवर मला करतां आलें याबद्दल मी आपल्या सहकाऱ्यांचा अत्यंत ऋणी आहे. मला कबूल केलें पाहिजे कीं कामगार संघांतील पुढाऱ्यांपैकीं बहुतेकांना तुरुंगांत जावें लागलें आणि मला सांगण्यास लाज वाटते कीं मला तशा तऱ्हेची संधि मिळाली नाहीं. कामगारांनीं आणि कामगारसंघाच्या पुढाऱ्यांनीं मी त्यांच्या बरोबर काम करीत असतांना माझ्यावर जो विश्वास टाकला त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. माझ्या प्रागतिक तत्त्वज्ञानाचा समावेश स्वातंत्र्य, समता, आणि बंधुता या त्रयीमध्यें झालेला आहे. या तीन तत्त्वांनीं माझ्या आयुष्यामध्यें मला मदत केली आहे. जॉन मोर्ले साहेब यांच्या "कॉंप्रोमाईज" या प्रसिद्ध ग्रंथाचा माझ्या विचारांवर फार परिणाम झालेला आहे."

आभार प्रदर्शन करितांना श्रीमती मणिबेन कारा यांनीं सत्कार समितीला श्री. जोशी यांचें चरित्र प्रसिद्ध करण्याकरितां अधिक मदत करण्याची श्रोत्यांना विनंति केली. त्या म्हणाल्या कीं मित्रांनीं जर सढळ हातांनीं मदत केली तर सत्कार समितीच्या मनांतून पुढल्या वाढदिवशीं श्री. जोशी यांना आणखी एक थैली अर्पण करावयाची आहे.

---

१६

# आयुष्याचीं शेवटलीं पंधरा वर्षें

नाना १९४० सालीं भारतसेवासमाजांतून निवृत्त झाले. आंतरराष्ट्रीय कामगारपरिषदेंतील काम, मध्यवर्ति कायदेमंडळांतील काम, सोशल सर्व्हिस लीगमधील काम, कामगार संघटनांमधील काम, मुलगी भिकूताई हिचा मृत्यु, आण्णांचा मृत्यु, तात्यांचा मृत्यु, तात्यांचा मुलगा बंडु यांचा पुण्यास इस्पितळांत मृत्यु, आण्णांचे चि॥ डॉ. दत्तोपंत यांचा मृत्यु, आण्णांचे दुसरे चि॥ डॉ. सीताराम यांचा दादरला झालेला अल्पवयी मृत्यु, थोड्याच वर्षांपूर्वी आण्णांचे तिसरे चि॥ बाळू यांचा कैरोच्या विमान अपघातांत झालेला आकस्मिक मृत्यु, आण्णांचे जांवई श्री. देवधर यांचा मुंबई येथें नानांच्या बिऱ्हाडीं हृदयाच्या झटक्यानें आलेला मृत्यु, त्यानंतर तात्यांचे चि॥ गणेशपंत यांचें आजारपण या सर्वांचा परिणाम त्यांच्या एका काळच्या निरोगी व सशक्त शरीरयष्टीवर किती झाला असेल याची कल्पनाच करावयास पाहिजे. त्यांच्या निकटच्या नातेवाईकांच्या बाहेरच्या मंडळींना त्यांच्यावरील या कौटुंबिक आपत्तीची कल्पनाही नसेल. १९२७ सालीं पत्नी निवर्तल्यामुळें तिच्याकडून मिळणाऱ्या मदतीसंबंधीं व मानसिक स्वास्थ्याचाहि अभाव. याशिवाय सायाटिका व हर्निया व हृदयाची अशक्तता ह्या रोगांची त्यांतच भर. या सर्व कारणामुळें त्यांची तब्येत बरीच ढांसळली होती. त्यांना पोक आले होतें. तरीसुद्धां सोशल सर्व्हिस लिग, सामाजिक परिषद, कामगार संघटना, सिव्हिल् लिबर्टिज यूनियन वगैरेमधील कामें त्यांनीं चिकाटीनें चालू ठेविलीं होतीं. अलिकडे दोनचार वर्षें त्यांचे थोरले चि॥ धोंडोपंत दादरला शारदाश्रममध्यें रहात. त्यांच्याकडे साधारण महिन्यांतून एकदां ते टॅक्सीमधून येत. आगगाडींतून किंवा बसमधून येण्याची दगदग त्यांना अलिकडे अलिकडे सहन होत नसे. पुण्यास त्यांच्या घरीं रहात असलेले जे विद्यार्थी पुढें मामलेदार होऊन आतां सेवानिवृत्त होऊन आतां दादरला रहातात म्हणून मागें उल्लेख आला आहे ते आणि मी एकाच घरांत रहातों. ते तळमजल्यावर रहातात व मी पहिल्यावर रहातों. नाना धोंडोपंतांकडे आले म्हणजे आपल्या स्नेह्यानां भेटायला येत. ते खालीं आले म्हणजे ते वर मला बोलावणें पाठवीत व मग मी खालीं जाऊन त्यांना भेटत

असें. होताहोइतों जिना चढून वर येण्याचें ते टाळीत असत. त्याचा त्यांना त्रास होत असे. मला नक्की आठवतें ते आपल्या स्नेह्यांकडे आठदहा वेळां आले असतील. पण त्यापैकीं एकदांच ते जिना चढून वर माझ्याकडे आले होते. लांबच्या प्रवासावर जायचें झालें तर ते सोबतीला मनुष्य घेतल्याखेरीज जात नसत. सर्व्हिस मोटारनें प्रवास करणें त्यांना मानवत नसे. टूरिंगकारची व्यवस्था झाल्यास ते दूरचा प्रवास करण्यास तयार होत.

१९४५ सालची गोष्ट. त्यांच्या ग्रामस्थांनीं, गोरेगांव (जिल्हा कुलाबा) करांनीं त्यांना तेथें स्थापन होणाऱ्या हायस्कूलचें व कै. वामन मल्हार जोशी स्मारक ग्रंथसंग्रहालयाचें उद्‌घाटन करण्याकरतां आमंत्रण दिलें. मुंबई ते गोरेगांवचा प्रवास फार त्रासदायक. नानांचें डॉक्टर त्यांना हा प्रवास करण्यास संमति देईनात. नानांनीं ग्रामस्थांना सांगितलें कीं टूरिंगकार व सोबत यांची व्यवस्था होत असेल तर मी येण्याचा विचार करीन. डॉक्टर जरी परवानगी देण्यास कुरकर करीत होते तरी नानांना आपल्या गांवाला जाण्याची ओढ लागली होती. आज ३५ वर्षांनीं ते आपल्या गांवाला जाणार होते. आपली आई कशीही असली तरी ती जशी प्रिय असते, त्याप्रमाणें आपलें गांव कसेंही असलें तरी त्याचें आकर्षण विलक्षण असतें. गोरेगांवजवळ असलेल्या निजामपूर गांवचे एक रहिवाशी माझे मित्र आहेत. निजामपूरला पाण्याचें मोठें दुर्भिक्ष असतें गांवाबाहेरील तळें उन्हाळ्यांत पार सुकून जात असे. परंतु मे महिन्यांत आपल्या गांवाला जातांना त्यांना आपल्या गांवाला जाण्याची जी हुरहुर वाटे तिचें वर्णन ते खालील श्लोकपंक्तींत करीत.

'केव्हां पाहिन तें निजामपुरिचें डोळे भरूनि तळें'

यावरून ३५ वर्षानंतर नानांना गोरेगांवला जाण्याची उत्कंठा लागली असावी हें सहाजिक आहे.

गोरेगांवकरांनीं टूरिंगकारची व्यवस्था करण्याचें कबूल केलें. व मी स्वतः प्रवासांत त्यांना सोबत करण्याचें कबूल केलें. दोन्हीही समारंभ गोरेगांव मुक्कामीं रविवार, तारीख ३ जून १९४५ रोजीं व्हावयाचे होते. नानांच्या बरोबर मी धरमतरच्या बोटीनें जावयास निघालों. ११ वाजतां आम्ही धरमतरला पोंचलों. धरमतरला जेवणाची व गाडीची व्यवस्था केली होती.

जेवण उरकून आम्हीं धरमतरहून गोरेगांवला जाण्याकरतां निघालों. वास्तविक आम्हीं दुपारीं २, २॥ ला गोरेगांवला पोचायचे. पण धरमतरहून ६, ७ मैल गेल्यानंतर एकदम अनपेक्षित रीतीनें इतक्या जोराच्या पावसाला सुरवात झाली कीं आम्हांला नागोठण्यास दोन तास मुक्काम करावा लागला. अशा रीतीनें आम्हीं दुपारीं २, २॥ च्या ऐवजीं संध्याकाळीं पांच वाजतां गोरेगांवला जाऊन पोचलों. डॉ. खंडेरावच्या प्रशस्त बंगल्यांत आमची उतरण्याची व्यवस्था केली होती. आमची निजण्याची व्यवस्था एकाच मोठ्या खोलींत दोन कॉटस् टाकून करण्यांत आली होती. संध्याकाळीं गांवांतील नानांची परिचयाची वृद्ध मंडळी येऊन गेली. रात्रीं ११ वाजतां विविध पक्षांची मंडळी जमली होती. त्यांची नानांपाशीं राजकीय प्रश्नांवर चर्चा झाली. नानांचीं मतें लोकांना किंवा लोकांचीं मतें नानांना सर्वस्वी पसंत पडलीं असतील असें नाहीं. परंतु चर्चा मात्र अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणांत पार पडली. दुसऱ्या दिवशीं आगाऊ ठरल्याप्रमाणें गोरेगांव इंग्लिश हायस्कूलचा त्याचप्रमाणें कै. वामन मल्हार जोशी स्मारक ग्रंथसंग्रहालयाचा असे दोन्ही उद्घाटन समारंभ उत्तम तऱ्हेनें पार पडले. दुसऱ्या दिवशीं बऱ्याच मंडळींना नाना त्यांच्या घरीं जाऊन भेटले. त्याच दिवशीं विष्णुमंदिरासमोरील आपल्या आजोबांच्या समाधीचें त्यांनी मोठ्या भक्तिभावानें दर्शन घेतलें. ते म्हणत "आमच्या आजोबांनीं संन्यास घेऊन आम्हांला स्वार्थत्यागाचा धडा शिकविला." ४ तारखेच्या दिवशीं आम्हीं गोरेगांवाहून निघून मुंबईला आलों.

या दोन दिवसांच्या व दोन रात्रींच्या सहवासांत नानांच्या दिनचर्येंतील कांहीं गोष्टी मला समजून आल्या. सिगरेटच्या त्यांच्या व्यसनाची सर्वांना माहिती आहे. रात्रीं झोंप लागेपर्यंत ते मधून मधून सिगारेट ओढीत. निजण्यापूर्वीं ते दररोज रेचक घेत. सकाळीं ५॥ वाजतां ते हिंदुकप सारख्या एक मोठा कपभर चहा घेत. एक दोन वेळां बहिर्दिशेला जाऊन आल्यानंतर त्यांच्या दिनचर्येला सुरवात होत असे. त्यांचा आहार साधा होता— पोळी--भात—आणि नुसत्या शिजविलेल्या भाज्या. ते तिखटाचा उपयोग आपल्या खाण्यांत मुळींच करीत नसत. आयुष्याच्या शेवटल्या दहाबारा वर्षांत हा कार्यक्रम अखंड चालू होता. त्यावरून त्या कालांतील त्यांच्या तब्येतीची बरोबर कल्पना येईल.

एरवीं अलिकडे अलिकडे त्यांनी कोणत्याही संस्थेंत प्रत्यक्ष काम करण्याचें सोडून दिलें होतें. कोणा व्यक्तीनें किंवा संस्थेनें विचारल्यास ते जरूर ती सल्लामसलत देत असत. मार्गदर्शनही करीत असत.

१९५२ त नानांचें डॉ ब्रालिगा यांच्या हॉस्पिटलांत एन्लार्जड प्रोस्ट्रेटचें ऑपरेशन झालें.

यानंतर पुणें व मुंबई येथें झालेल्या सामाजिक परिषदांना ते हजर होते.

त्याचप्रमाणें सिव्हिल लिबर्टीज यूनियनमध्येंही ते शेवटपर्यंत काम करीत असत.

शेवटीं शेवटीं तर चौपाटीवर फिरायला जाणें हा त्यांचा नित्याचा व्यवसाय झाला होता.

प्रकृतीची हीं अशी स्थिति असतांनासुद्धां त्यांच्या स्नेह्यासोबत्यांवर प्रसंग आलेला असतां ते त्यांच्याकरितां व्यक्तिशः सक्रिय सहानुभूति दाखविल्या शिवाय राहत नसत.

११ डिसेंबर १९५४ रोजीं नानांच्या दादर येथें राहणाऱ्या स्नेह्यांची पत्नी निवर्तली. त्या दिवशींच्या प्रेतयात्रेला हजर राहण्याकरितां नाना मुद्दाम दादरला आले होते.

स्वतःच्या मृत्यूच्या आधीं पांच दिवस ते आपले स्नेही श्री. वसंतराव राऊत यांच्या अंत्यविधीकरितां सोनापुरांत गेले होते. अशा तऱ्हेनें अखेरचे दिवस जात असतांना ३० मे १९५५ रोजीं अनपेक्षित रीतीनें हृदयक्रिया बंद पडून त्यांचें निधन झालें.

मंगळवार तारीख ३१ मे १९५५ रोजीं नानांच्या पार्थिव देहाची यात्रा त्यांच्या निवासस्थानाहून सकाळीं ८–३० वाजतां निघाली. यात्रा निघण्यापूर्वी त्यांच्या स्नेहीमंडळीपैकीं पुष्कळ प्रसिद्ध व्यक्ति त्यांचें अंत्यदर्शन घेऊन गेल्या.

मिरवणूक गिरगांव रोड, प्रिन्सेस स्ट्रीट, क्वीन्स रोडवरून १०–३० वाजतां सोनापुरांत जाऊन पोचली. कामगार संघाचे व इतर अनेक संस्थांच्या वतीनें पुष्कळ गृहस्थांची नानांच्या गुणवर्णनपर भाषणें झालीं. शेवटचें भाषण मुंबईचे मुख्य प्रधान श्री. मुरारजी देसाई यांचे झालें.

यानंतर नानांचे थोरले चिरंजीव श्री. धोंडोपंत यानीं चितेला अग्निसंस्कार दिला.

अशा रीतीतें नानांचा पार्थिव देह पंचमहाभूतांत विलीन झाला !

नानांच्या मृत्युबाबत दुःख प्रदर्शन करण्याकरतां मुंबईचे शेरीफ श्री. मोतीचंदजी शहा यांनीं मुंबईचे गव्हर्नर डॉ. हरेकृष्ण मेहताब यांच्या अध्यक्षतेखालीं ३ नवंबर १९५५ रोजीं मुंबईच्या नागरिकांची सभा बोलाविली होती. सभेपुढें मांडलेला खालील ठराव सर्वांनीं दोन मिनिटें उभें राहून मंजूर केला.

**ठराव :—**

"ही मुंबईच्या नागरिकांची सभा श्री. ना. म. जोशी यांच्या ३० मे १९५५ रोजीं झालेल्या मृत्यूबद्दल आपल्या दुःखाच्या व त्यांच्या मृत्युमुळें झालेल्या नुकसानीबद्दल आपल्या तीव्र भावना नमूद करीत आहे. गिरणी कामगारांच्या चळवळीचे आद्यप्रवर्तक, मध्यवर्ति कायदे मंडळाचे पंचवीस वर्षें असलेले सभासद, आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचे हिंदी मजुरांचे प्रतिनिधि या नात्यानीं श्री. जोशी यांनीं हिंदुस्थानची फार मोठी सेवा केलेली आहे. श्री. जोशी यांचें मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशनमधील काम, कामगारांचे जीवनमान सुधारण्याकरतां त्यांनीं केलेले प्रयत्न, आणि 'समाज सेवा संघा' सारख्या संस्था सुरू करून चालविण्याच्या कार्यांत त्यांनीं जें अपूर्व यश मिळविलें या सर्व गोष्टी अत्यंत प्रशंसनीय असून, पददलित लोकांचे ते प्रिय व स्वार्थत्यागी वाली होते ही गोष्ट सिद्ध करतात."

१७

# नानांच्या ठिकाणीं असलेले विशेष गुण

'लेखकाच्या निवेदनां'मध्यें मी नानांच्या गुणांचें वर्णन करणार आहे म्हणून उल्लेख आलेला आहे. त्याप्रमाणें या प्रकरणांत त्यांच्या कांहीं विशेष गुणांचे वर्णन करून हें चरित्र पुरें करणार आहे.

कोणीहि मनुष्य सर्व गुणंसपन्न नसतो. परंतु यशस्वी व लोकप्रिय पुढारी होण्याला मनुष्याच्या ठिकाणीं कांहीं गुण अवश्य असावे लागतात. त्यापैकीं कांहीं गुणांचा उल्लेख या पुस्तकांत त्या त्या ठिकाणीं ओघाओघानीं आलेला आहे.

अशापैकीं कांहीं गुणांचा उल्लेख या ठिकाणीं प्रामुख्यानें करण्याचें ठरविलें आहे. कारण त्यापैकीं कांहीं गुण आज दुर्मिळ होऊं लागले आहेत. नानांच्या चरित्राच्या अभ्यसनानें आपल्या ठिकाणीं हे गुण बाणविण्याचा प्रयत्न तरुण पिढी करील अशी आशा आहे.

गुणांचा विचार करतांना 'संगीताची, गाण्याची आवड' हा गुण त्यांचे बंधु वामनराव यांच्याप्रमाणें त्यांच्या ठिकाणीं नव्हता असें म्हणावें लागेल. कदाचित असेंही असूं शकेल कीं कार्यव्याप्तिमुळें ह्या गुणाची आवड उत्पन्न करण्यास त्यांना सवड झाली नसेल. या गुणाची जोपासना ज्यांच्या ठिकाणीं झाली नाहीं अशीं दुसरीही कांहीं पुढाऱ्यांचीं उदाहरणें नाहींत अशी नाहींत.

**१ स्वार्थत्याग**—नानांच्या ठिकाणचा सर्वांत महत्वाचा गुण ज्यावेळीं ते 'भारत समाज सेवका'चे सभासद झाले त्याच वेळीं दिसून आला. १९४९ सालीं ते आपल्या गांवीं गोरेगांवीं गेले त्यावेळीं त्यांनीं आपल्या आजोबांच्या समाधीचें दर्शन घेतलें. व त्यांच्यापासून मला स्वार्थत्यागाची स्फूर्ति मिळाली असें म्हटलें.

**२ सेवावृत्ति**—मनुष्याच्या ठिकाणीं असलेल्या सर्व गुणांची परिणति या गुणांत होते. पशु, पक्षी, मानव यांची सेवा म्हणजे परमेश्वराची सेवा 'भारत सेवा समाजा'चें हें ब्रीद आहे. नानांनीं आपलें सर्व आयुष्य समाजसेवेंत वेचलें.

**३ साधेपणा**—सेवा, स्वार्थत्याग, व साधेपणा या तीन गुणांचें साहचर्य सर्व पुढाऱ्यांमध्यें असतें.

**४ परोपकारवृत्ति**—अष्टादशपुराणेषु व्यासस्य वचनद्वयम् ।
परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम् ॥

'परोपकारानें पुण्यप्राप्ति होते व दुसऱ्याला त्रास दिला असतांना पाप लागतें' ही अठरा पुराणांतली व्यासमहर्षींची मुख्य शिकवण; नानांना 'पाप' 'पुण्याच्या' कल्पना पसंत होत्या किंवा नव्हत्या हें कळण्याला साधन नाहीं. परंतु परोपकरानें मनुष्याची उत्क्रांति होते व परपीडेनें मनुष्यांची अधोगति होते हें त्यांना कबूल होतें. 'स्वसुखनिरभिलाष' वृत्तीनें ते सदा दुसऱ्यांची काळजी वहात होते. कामगारांच्या कल्याणाकरतां त्यांनीं जे कष्ट सोसले ते या गोष्टीची साक्ष देतील.

**५ दुर्दम्य आशावाद**—१९२० सालापासून १९३० पर्यंत हिंदुस्थानांत जें एक आंदोलन झालें त्यामुळें 'वैफल्य' किंवा 'नैराश्य' निर्माण झालें. १९३० च्या गोल मेल परिषदेला हजर राहण्यापासून कांहीं फायदा होणार नाहीं असें कांहीं लोकांना वाटूं लागलें, परंतु नाना प्रयत्नवादी होते. त्यांचा आशावाद दुर्दम्य होता, म्हणून ते तिन्ही गोलमेज परिषदांना हजर राहिले. त्यांना अंधार असा कधींच दिसला नाहीं, त्यांना आशेचा किरण नेहमींच दिसत असे.

**६ निरलसपणा**—संस्कृत सुभाषित म्हणतें:—

आलस्यं हि मनुष्याणां शरीरस्थो महारिपुः ।
नास्त्युद्यमसमो बंधुः कृत्वा यं नावसीदति ॥

अर्थ:—आळस हा मनुष्याच्या शरीरांतला मोठ्यांतला मोठा शत्रु आहे, व उद्योगीपणासारखा त्याचा मित्र नाहीं, उद्योग केला असतांना मनुष्याला अवनति प्राप्त होत नाहीं.

या सुभाषिताचा अर्थ बहुतेकांना कळतो पण वळत नाहीं, म्हणजे कृतींत उतरवता येत नाहीं. नानांच्या आयुष्यांत असे पुष्कळ प्रसंग आले कीं, ज्यावेळीं त्यांचें हृदय अशक्त झालेलें, शरीर प्रवासाक्षम तरीसुद्धां ते दिल्लीच्या किंवा विलायतच्या प्रवासास जाण्यास निघत. 'If you will rest you will rust–' 'तुम्ही जर निरुद्योगी रहाल तर गंजून जाल' हें त्यांना पूर्ण पटलें होतें.

**७ कामाची तडफ**—या गुणाबद्दल नानांचें खरोखर कौतुक करायला पाहिजे. बाराव्या प्रकरणांत उल्लेख आलेला आहे कीं नानांना (१) मजूर संघटनांत काम (२) कायदे मंडळांतील काम (३) कायदे मंडळाच्या वेगवेगळया कमिट्यांवरील काम व (४) परदेशांत भरणाऱ्या वेगवेगळया परिषदांना जाणें व त्यासाठीं तयारी करणें वगैरे कामें करावीं लागत. सेंट्रल ॲसेंब्लीमधलीं त्यांची भाषणें वाचलीं तर तीं तयार करण्यास किती त्रास पडत असेल व किती वेळ लागत असेल याची थोडीशी कल्पना करतां येईल. त्यावरून हीं सर्व कामें व्यवस्थित रीतीनें वेळच्या वेळीं ते कशीं पार पाडीत असतील याचें आश्चर्य वाटतें. ही काम करण्याची जी पद्धति तिचेंच नांव कामाची तडफ.

**८ अपरिग्रहीवृत्ति** : पतंजलीच्या योगसूत्रांत—अहिंसासत्यास्तेयब्रह्मचर्यापरिग्रहा :—यमा: व शौचःसंतोषस्वाध्यायेश्वरप्राणिधानानि नियमा: असे यम नियम सांगितलेले आहेत., ' यम ' हे समष्टीच्या हितार्थ सांगितलेले आहेत व ' नियम ' हे व्यष्टीच्या हितार्थ सांगितलेले आहेत. यांत ' अपरिग्रहा ' चा समावेश यमांत केलेला आहे. अपरिग्रह म्हणजे परिग्रह किंवा संचय न करणें. हा एकच गुण जर सर्वांनीं कृतींत आणला तर समाजवाद अथवा सर्वोदय आजच सिद्ध होईल. ही कल्पना आमच्या लोकांना पुष्कळ वर्षांपूर्वी सुचली होती व मोठ्या प्रमाणांत त्यानीं ती कार्यवाहींत आणली होती. त्या वेळीं श्रीमंतांकडून, पुंजीपतींकडून गरीबांची पिळणूक होत नसे. नाना अपरिग्रही होते म्हणजे त्यांनी परिग्रह म्हणजेच संचय केला नाहीं आणि म्हणूनच ते कामगारामध्यें यशस्वीरीतीनें काम करूं शकले.

**९ सहिष्णुता** :—सहिष्णुता म्हणजे सोशिकपणा. इंग्रजीमध्यें याला ' Toleration ' म्हणतात. याच्या विरुद्ध प्रवृत्ति म्हणजे ' असहिष्णुता अथवा तापटपणा '. सहिष्णुतेनें विरोध नाहींसा होऊन कार्यसिद्धि होते. असहिष्णुतेनें कार्यनाश होतो. सहिष्णुता ही " सुई, स्वागी व सुमनुष्य " याप्रमाणें दोन वस्तु जोडते. असहिष्णुता " कुऱ्हाड, कोयती व कुमनुष्य " याप्रमाणें तोडते. जेथें दोन अथवा अधिक पक्षामध्यें धार्मिक, सामाजिक राजकीय, बाबतींत विरोध किंवा मतभेद असतात त्या ठिकाणीं या गुणाची फार

जरूरी असते. त्यामुळें दोन किंवा अधिक विरोधी पक्षामध्यें तडजोड होऊं शकते. १९५२ च्या सत्कारसमारंभाच्या वेळीं नाना म्हणाले होते कीं जॉन मोर्ले साहेबांच्या 'Compromise' या प्रसिद्ध ग्रंथाचा त्यांच्या विचारावर फार परिणाम झाला होता. याचें कारण 'सहिष्णुता' हा गुण त्यांच्या ठिकाणीं प्रकर्षानें वसत होता. म्हणून विरुद्ध किंवा भिन्न मतप्रणालींच्या व्यक्तींनासुद्धां त्यांच्यासंबंधीं आदर वाटत असे.

**१० सहकार्य करण्याची तयारी** :—पुढारी म्हटला कीं त्याच्या ठिकाणीं मनुष्यांची पारख करण्याचा गुण असला पाहिजे. व्यक्तीव्यक्तींमध्यें निरनिराळे गुण असतात. त्यांना एका ध्येयप्राप्तिकरतां एकत्र आणून त्यांचा उपयोग करून घेणें यांत पुढाऱ्याची कुशलता आहे. निरनिराळया गुणांच्या माणसांनीं एकत्र येऊन एक साधारण ध्येयाकरतां प्रयत्न करणें याचें नांव सहकार्य. सहकारी चळवळीचा हा आत्मा आहे. नाना सहकारी चळवळी मध्यें व इतर बाबतींत यशस्वी झाले याचें कारण त्यांच्या ठिकाणीं हा गुण बद्धमूल झालेला होता.

सहिष्णुता विरोधीपक्षासंबंधीं जरूर असते. सहकार्य करणाऱ्या माणसामध्यें विरोध नसतो. आंधळयाच्या खांद्यावर लंगडया माणसानें बसून त्याच्या मार्गदर्शनानें दोघानीं मार्ग आक्रमण करणें हें सहकार्याचें उत्तम उदाहरण होय.

११. लोकशाहीच्या संरक्षणाकरितां **अखंड जागरूकता** याची साक्ष म्हणजे नानांचें सिव्हिल लिबर्टीज यूनियनमधलें कार्य. चौकशी खरीज कोणाही मनुष्याला प्रतिबंधांत टाकूं नये या करतां नानांची मरेपर्यंत धडपड चालू होती.

**१२. जातीयता व प्रांतीयता यांचा इवलाही लेप नसलेली वृत्ति** :—नानांच्या ठिकाणी जातीयता बिलकूल नव्हती हें पटविण्याला त्यांच्या चरित्रांतील खालील तीन प्रसंग पुरेसे आहेत.

**प्रसंग पहिला** :—एकदां मदनपुराभागांतील काही मजुराशीं इतर मजुरांनीं सहकार्य केलें त्यांत काहीं मुसलमान कामगार होते. कारखानदारांत मुसलमान होते. ते बडे शौकतअलीना भेटले. धर्माच्या नावानें शौकत अलीं करवीं संप फोडण्याचा त्यानों प्रयत्न केला.

"हा पगडीवाला ब्राह्मण ना. म. जोशी तुमचा पुढारी कसा?" बडे भाई कामगारांना म्हणाले.

"बडे भाई आम्हीं संपावर आहोंत. तुम्हीं आम्हाला मदत करा. तुम्हाला आम्हीं पुढारी मानूं. जोशी आम्हाला मदत करतात, आमची बाजू घेतात म्हणून त्यांना आम्हीं पुढारी मानतों" असें त्या कामगारांनीं बडे भाईना ऐकविलें.

**प्रसंग दुसरा**—१९३७ सालीं भारतीय प्रतिनिधि मंडळांत मुसलमानांच्याच अडचणीमुळें नाना मुसलमान प्रतिनिधि घेऊं शकले नाहींत. त्यावेळीं मजुरांच्या प्रतिनिधि मंडळांत एखाद्या मुसलमान कार्यकर्त्याचा समावेश करावा असे त्यावेळच्या व्हाइसरायनें सुचविलें. अल्पसंख्याकांच्या हक्काची आपणच तेवढी जपणूक करतों असें जणूं त्यांतून त्याला सुचवावयाचें असावें. दरवर्षी सल्लागार मंडळांत एक तरी अल्पसंख्यांकांचा प्रतिनिधि घेतला जात होता हें नानांनीं पुराव्यानिशीं सिद्ध करून व्हाइसरायला निरुत्तर केलें.

**प्रसंग तिसरा**—नानांचें धोरण सर्वांत खालच्या दर्जाच्या व प्रांतीच्या माणसाची बाजू घेणें हें असे व न्याय हक्कासाठीं चाललेल्या भांडणास त्यांचें पाठबळ असे. स्वतःच्या वर्गाचे हितसंबंध त्यावेळीं ते ओळखीत नसत. जोशीवतन बिलाला स्वतः वतनदार जोशी घराण्यांतील असूनही नानांनीं मनःपूर्वक पाठिंबा दिला होता

नानांच्या ठिकाणीं प्रांतीयतेचा लेप नव्हता इतकेंच नव्हे तर राष्ट्रीयत्वाचा फाजील अभिमानहि नव्हता, नाना आय. एल. ओच्या परिषदांना भारतीय मजूरांचे प्रतिनिधि म्हणून जात असत तरी ते स्वतःला केवळ भारतीय कामगारांचेच प्रतिनिधि समजत नसत. सर्व आशियायी व इतर परतंत्र देशांतील कामगारांचे प्रतिनिधि नसल्यानें कामगारांचा प्रतिनिधि म्हणून त्यांची स्थिति सुधारावी, त्यांच्या हक्कांचें रक्षण व्हावें यासाठीं सतत खटपट करणें हें आपलें कर्तव्य आहे असें ते समजत. यावरून त्यांच्या ठिकाणीं असलेल्या विश्वबंधुत्वाच्या भावनेची कल्पना येईल.

**१३. आढ्यतेचा अभाव** :—आढ्य म्हणजे श्रीमंत, मोठा, व आढ्यता म्हणजे त्या श्रीमंतीचा किंवा मोठेपणाचा ताठा नानांच्या ठिकाणीं मुळींच

नव्हता. ते गरीब होते व त्याची त्यांना जाणीव होती. म्हणूनच सरकारनें त्यांना देऊं केलेली 'सी. आय. ई.'ची पदवी त्यांनीं साभार नाकारली.

मध्यवर्ती विधिमंडळांतून १९४७ निवृत्त झाल्यानंतर एक सालीं त्यावेळच्या मुंबईच्या गव्हर्नर साहेबांनीं नानांना "तुम्ही मुंबईच्या शेरीफची जागा पत्कराल का ?" असें विचारलें. त्यावेळीं त्यांनीं गव्हर्नरसाहेबांना कळविलें, "शेरीफची जागा सांभाळण्याकरतां जी आर्थिक सुस्थिति मनुष्याजवळ असावी लागते ती माझ्याजवळ नसल्यानें, मला आपली विनंति स्वीकारता येत नाहीं." ह्या एकाच गोष्टीवरून नानांच्या ठिकाणीं आढ्यतेचा अभाव होता याचा प्रत्यय येतो.

**१४ निरहंकार** :—हें मी केलें अशी जाणीव नसणें याला निरहंकार म्हणतात. नानांच्या ठिकाणीं अहंकार हा दोष कधींच नव्हता. म्हणूनच ते आपल्या आयुष्यामध्यें यशस्वी व लोकप्रिय झाले. गरीब, श्रीमंत, विद्वान, अशिक्षित अशा लोकांपाशीं ते सारख्याच प्रेमळपणानें वागत.

# ना. म. जोशी यांच्या चरित्रांतील सनावलि.

५ जून १८७९ जन्म, गोरेगांव जिल्हा कुलाबा येथें.

१८९३ पुण्यास इंग्रजी शिक्षणाकरतां गेले.

१८९७ मॅट्रिक पास, विवाह.

१९०१ बी. ए. पास.

१९०१–१९०८ नगर, पुणें, मुंबई, रत्नागिरी येथें हायस्कुलांत नोकरी.

१९०९ भारत सेवक समाजाचे सभासद झाले.

१९११ मुंबईस आले. सोशल सर्व्हिस लीगची स्थापना, व तिचे जनरल सेक्रेटरी १९५३ पर्यंत, नंतर उपाध्यक्ष.

१९१७ हिंदी पत्रकारांचे प्रतिनिधि म्हणून मेसापोटेमियांत गेले.

१९१७–१९२९ सेक्रेटरी, बॉम्बे प्रेसिडेन्सी सोशल रिफॉर्म असोसिएशन.

१९१९ वॉशिंग्टन येथील पहिल्या जागतिक कामगार परिषदेचे हिंदुस्थान सरकारनें नेमलेले कामगार प्रतिनिधि. केसर–इ–हिंद सिल्व्हर मेडल.

१९१९–१९२३ मुंबई म्युनिसिपल कार्पोरेशनचे सरकारनियुक्त कामगार प्रतिनिधि.

१९१९ मध्यें ट्रेड यूनियन चळवळीला मिळाले व पहिल्या ट्रेड यूनियन कॉंग्रेसमध्यें प्रतिनिधि म्हणून काम केलें.

१९१९–१९२९ सेक्रेटरी, वेस्टर्न इंडिया नॅशनल लिबरल असोशिएशन.

१९२० आ. इं. ट्रे. यू. कॉंग्रेसची स्थापना.

१९२१–१९४७ सेंट्रल असेंब्लीचे सरकारनियुक्त कामगारप्रतिनिधि.
(with one year's break in 1946)

१९२२ आय. एल्. ओ. च्या गव्हर्निंग कौन्सिलचे डेप्युटी मेंबर निवडले गेले.

१९२५ आय. एल्. ओ चे सरकारनियुक्त कामगारप्रतिनिधि.

१९२५ ते १९२९ जनरल सेक्रेटरी ऑफ दी इंडिया ट्रेड यूनियन काँग्रेस. १९२९ त ती संस्था सोडून इंडियन ट्रेड यूनियन फेडरेशनच्या स्थापनेंत भाग घेतला.

१९२९ आय. एल्. ओचे सरकारनियुक्त कामगारप्रतिनिधि.

१९२९ प्रेसिडेंट रेल्वेमेन्स फेडरेशन.

१९२९, १९३० रॉयल कमिशन ऑफ इंडियन लेबरवर काम केलें.

१९३०, १९३१, १९३२ मध्यें भरलेल्या राऊंडटेबल कॉन्फरन्सना कामगार हितसंबंधाचे प्रतिनिधि म्हणून हिंदुस्थानचे प्रतिनिधि म्हणून हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची चर्चा करण्याकरतां हजर राहिले.

१९३३–३४ मध्यें गव्हर्मेंट ऑफ इंडिया बिलाच्या जाईंट पार्लमेंटरी कमिटीवर हिंदुस्थानच्या बाजूनें सभासद म्हणून काम केलें.

१९३४ आय. एल. ओचे सरकार नियुक्त कामगारप्रतिनिधि

१९३४–१९४४ आय. एल. ओच्या गव्हर्निंग कौन्सिलवर पूर्ण मेंबर म्हणून निवडून आले.

१९३५ आय. एल. ओचे सरकार नियुक्त कामगारप्रतिनिधि.

१९३६ ,, ,, ,, ,, ,, ,, ,,

१९३७ ,, ,, ,, ,, ,, ,, ,,

१९३७ इंडियन ट्रेड युनियन फेडरेशनचे प्रेसिडेंट म्हणून इंटक व इंडियन ट्रेड यूनियन फेडरेशन या दोन संस्थामध्यें सलोखा घडवून आणण्याचा प्रयत्न करून त्याचे संयुक्त सेक्रेटरी म्हणून १९४७ पर्यंत काम केलें. या संघटनेंतील कम्युनिस्ट व नॉन कम्युनिस्ट तटांमध्यें एकी रहाणें शक्य नाहीं असें आढळून आल्यावर A. I. T U. C. चा राजीनामा दिला.

९५४२

१९३८ मेंबर सेंट्रल पे कमिशन.

१९३८ प्रेसिडेंट, बॉम्बे सिव्हिल लिबर्टीज युनियन.

१९४० भारत सेवक समाजांतून निवृत्त.

१९४६ (पॅरिस) आय. एल्. ओचे सरकारनियुक्त कामगारप्रतिनिधि.

१९४६–१९४८ आय्. एल्. ओच्या गव्हर्निंग कौन्सिलचे पूर्ण मेंबर निवडून आले.

१९४७ (जिनीव्हा) आय. एल. ओचे सरकारनियुक्त कामगार प्रतिनिधि

१९४७ सेंट्रल असेंब्लीमधून निवृत्त.

१९४७ पासून बॉम्बे प्रेसिडेन्सी सोशल रिफॉर्म्स अॅसोसिएशनचे अध्यक्ष.

१९४८ आय्. एल्. ओमधून निवृत्त.

१९५१ Presided over the first Asian Regional Conference held in Karachi under the auspices of the International Confederation of Free Trade Unions.

३० मे १९५५ मृत्यु.

संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
22084 वि ...
954 नों: दि: 7.7.58.
REFBK-0009542